Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
वर्ष ३७, अंक २८७, ६ रुपये, शहर आवृत्ती, सहदैनिकासह पृष्ठे २०

पुणे, मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

पुणे, मुंबई, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

**अग्रलेख**

## किती मी राखू तुमची...

मोदींच्या अमेरिका भेटीच्या पार्श्वभूमीवर आपण आयात शुल्क सवलत दिली नसती तर ट्रम्प यांस खूश करण्याचा प्रयत्न आपण किती काळ करणार, हा प्रश्न पडला नसता.



**क्रीडा**
**प्रज्ञानंदला अजिंक्यपद**

नॅशनल एग कोऑर्डिनेशन कमिटी (बिगर-सरकारी सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट)
Vencobb — Vencobb No. 1 Tastiest Chicken
०४/०२/२०२५

| | |
|---|---|
| ब्रॉयलर चिकनचा दर* (पोल्ट्रीफार्मवर) | ८० रु. प्रति किग्रॅ |
| किरकोळ विक्रीचा दर* जिवंत कोंबडी | १०८ रु. प्रति किग्रॅ |
| ड्रेस्ड कोंबडी (स्किनसह) दर* | १३२ रु. प्रति किग्रॅ |
| अंडी किरकोळ विक्री दर* | ७० रु. प्रति १२ अंडी |

ग्राहकांच्या हितासाठी *अटी लागू

**तापमान**

कमाल ३५.०°से | किमान १६.०°से

**हवामानाचा अंदाज**
आकाश दुपारनंतर ढगाळ राहील.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी



हे इतके मोठे, काही लाख कोटींचे आकडे वाचले की आपला देश किती श्रीमंत आहे, या भावनेनं मला अभिमान वाटायला लागतो!!

# ‘वर्षवेध’चे आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**


**मुंबई :** आंतरजालावरील माहितीच्या माऱ्यात अचूक तपशील सापडणे सध्या कठीण बनले आहे. ‘चॅट जीपीटी’ तसेच ‘एआय’च्या गोंधळयुगात वर्षभराचा दस्तावेज माहितीरूपात पुरविणारे आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसह माहितीसंग्रहकांना उपयुक्त ठरणारे ‘लोकसत्ता’चे लोकप्रिय पुस्तक ‘वर्षवेध’ आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशित होईल.

Gravittus FOUNDATION
Towards a better world
An initiative by Usha Kakade
प्रस्तुत
लोकसत्ता २०२४ वर्षवेध
सहप्रस्तुती
LAXMII FOREX LTD. सिडको शहरांचे शिल्पकार

- मुख्य प्रायोजक : ग्रॅव्हिटस फाऊंडेशन
- सहप्रस्तुती : लक्ष्मी फॉरेक्स लिमिटेड आणि सिडको
- सहप्रायोजक : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बृहन्मुंबई, महानिर्मिती, रुणवाल रियल्टी, पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स प्रा. लि., तन्वी हर्बल, रावेतकर बिल्डर्स, टी जे एस बी सहकारी बँक लि., महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
- सहकार्य : केसरी टूर्स आणि जे प्राईम बिल्डकॉन
- पॉवर्ड बाय : दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., दोस्ती रियाल्टी, न्यू इंडिया एश्योरन्स, आर्केड डेव्हलपर्स लिमिटेड, व्ही. पी. बेडेकर अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड, जानकी ज्वेलर्स आणि ब्रह्मविद्या साधक संघ

सहप्रायोजक: झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बृहन्मुंबई | महानिर्मिती | RUNWAL REALTY | PNG JEWELLERS | Tanvi HERBALS तन्वीशता | Ravetkar
बँकिंग पार्टनर: टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड — Bharose ka Bank Bhavishya ka Bank
इकोफ्रेंडली पार्टनर: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

यंदा पूर्णपणे नव्या स्वरूपात अधिक माहिती तसेच अधिक तपशिलांनी सजविलेल्या या पुस्तकात २०२४ सालात घडलेल्या घटना, या वर्षाचे खास मानकरी अशी भरगच्च मजकुराची पर्वणी आहे. लेखक, पत्रकार, विश्लेषक, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे उमेदवार आणि माहिती संग्राहकांसाठी गेल्या *(पान ४ वर)*



केंद्रीय अर्थसंकल्प 2025 मध्यमवर्गासाठी सोयीचा!

# राज्याच्या निकालाचे संसदेत पडसाद

## निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर राहुल गांधींकडून शंका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालांचे पडसाद सोमवारी संसदेत उमटले. शिर्डीमध्ये एकाच इमारतीत ७ हजार नवे मतदार यादीमध्ये सामील केल्याचा दावा करत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निकालावर शंका उपस्थित केली. मतदार अचानक आले कुठून, असा प्रश्न विचारत त्यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर लोकसभेत सोमवारी चर्चा सुरू झाली. यावेळी गांधी यांनी देशातील निवडणूक प्रक्रियांबाबत साशंकता व्यक्त केली. ‘‘महाराष्ट्रामध्ये लोकसभा निवडणूक आम्ही (इंडिया आघाडी) जिंकलो. त्यानंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत ७० लाख नव्या मतदारांची नावे यादीमध्ये सामाविष्ट केली गेली. लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणुकांमध्ये इतक्या मोठ्या संख्येने अतिरिक्त मतदार कसे समाविष्ट केले जाऊ शकतात? हा सगळा प्रकारच गोलमाल आहे,’’



राज्यात एकाचवेळी ७० लाख मतदार वाढणे अशक्य आहे. जे पाच वर्षांतदेखील होऊ शकत नाही ते, अवघ्या पाच महिन्यांमध्ये कसे घडू शकते? हिमाचल प्रदेशची लोकसंख्या ७० लाख असून अख्ख्या हिमालच प्रदेशने महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान केले असे म्हणायचे काय?
**– राहुल गांधी**, विरोधी पक्षनेते, लोकसभा

### दिल्लीसाठी ईश्वर किंवा मोदीच!

दिल्लीचा विकास केवळ ईश्वर किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदीच करू शकतात असा दावा भाजपचे दक्षिण दिल्लीचे खासदार रामवीर सिंह बिधुरी यांनी सोमवारी केला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला सोमवारी लोकसभेत चर्चेला सुरुवात करताना बिधुरी यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर आम आदमी पक्षाच्या सरकारवर टीका केली. ‘आप’ सरकारने दिल्लीची लूट करून राष्ट्रीय राजधानीचा नरक करून टाकला असल्याचा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने दिल्लीकरांसाठी गृहनिर्माण, वाहतूक, आरोग्यसेवा आणि इतर योजना सुरु केल्याचे बिधुरी म्हणाले.

### ट्रम्प शपथविधीवरून टोलेबाजी

नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याचे पंतप्रधान मोदींना आमंत्रण नव्हते. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर त्यासाठी मध्यस्थी करण्याकरिता अमेरिकेला गेले होते, असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी लोकसभेत केला. यावर संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आक्षेप घेतला. तर जयशंकर यांनीही ‘एक्स’वरील संदेशात राहुल गांधींचा दावा फेटाळून लावला. - संबंधित वृत्त / ४

**संध्याकाळच्या मतदानाला न्यायालयात आव्हान / ९**

भाजपने जिंकलेल्या मतदारसंघांमध्ये मोठ्या संख्येने मतदार वाढल्याचा गंभीर आरोप गांधींनी केला.

**पंतप्रधानांवर टिप्पणी**

महाराष्ट्राच्या *(पान ४ वर)*

# व्यापारयुद्धाचे भारतालाही हादरे

## अर्थसंकल्पाच्या आनंदावर विरजण; रुपयाचा सर्वकालीन नीचांक

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तीन देशांवर लादलेल्या अतिरिक्त करबोजाचे हादरे सोमवारी जगभरातील भांडवली बाजारांना जाणवले. भारतीय बाजारांमध्येही सुरुवातीला भीतीदायी प्रतिबिंब उमटले असले तरी मोठ्या आपटीतून सावरून सेन्सेक्स दिवसअखेर ३१९ अंशांच्या म्हणजेच जवळपास अर्धा टक्क्यांच्या नुकसानीसह बंद झाला.




मात्र अर्थसंकल्पामुळे बाजारांमध्ये उत्साह राहील, ही अपेक्षा फोल ठरली. दुसरीकडे रुपयाच्या विनिमय दरात आणखी ५५ पैशांची घट होऊन सर्वकालीन नीचांकावर पोहोचला.

मेक्सिको आणि कॅनडातून येणाऱ्या बहुतेक वस्तूंवर २५ टक्के आणि चीनमधून येणाऱ्या वस्तूंवर १० टक्के अतिरिक्त कर लावण्याच्या ट्रम्प यांच्या आठवड्याच्या शेवटी दिलेल्या आदेशाचे प्रत्यक्ष परिणाम सोमवारी जगभरातील भांडवली बाजारात दिसून आले. या घडामोडीने जागतिक व्यापार बाधित होण्यासह, पुरवठा साखळीत व्यत्ययाने व्यावसायिक उलाढाली खर्चीक बनण्याची म्हणजेच कंपन्यांच्या नफ्याला फटका बसण्याची गुंतवणूकदारांमध्ये भीती निर्माण केली आहे. या पडझडीचे हादरे दलाल स्ट्रीटवर जाणवले. सकाळच्या सत्रात सेन्सेक्स ७०० अंशांनी गडगडला आणि निफ्टी २३,२५० अंशांखाली रोडावल्याचे दिसून आले. विक्रीच्या माऱ्यामुळे काही क्षणांच्या अवधीत गुंतवणूकदारांच्या मत्तेला तब्बल ५ लाख कोटी *(पान ४ वर)*

# जनगणना आणखी लांबणीवर?

## १२ हजार कोटींची गरज असताना केवळ ५७५ कोटींची तरतूद

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** जनगणनेसाठी १२ हजार कोटींची आवश्यकता असताना यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात केवळ ५७४ कोटी ८० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जनगणना लगेचच करण्याची मोदी सरकारची योजना नसल्याचेच यामुळे स्पष्ट झाले आहे.

दर दहा वर्षांनी होणारी जनगणना २०२१ मध्ये अपेक्षित होती. मात्र करोना साथीमुळे ती लांबणीवर टाकण्यात आली. त्यानंतर जनगणनेला अद्यापही मुहूर्त मिळालेला नाही. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर जनगणना केली जाईल, अशी शक्यता वर्तविली जात होती. तसे संकेतही दिले गेले होते. मात्र अजूनही सरकारची जनगणनेबाबतची मानसिकता झाली नसल्याचे चित्र आहे. जनगणनेची देशभर प्रक्रिया राबविण्याकरिता सुमारे १२ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. दोन दिवसांपूर्वी सादर *(पान ४ वर)*

### जनगणनेचे अंदाजपत्रक

- १२ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित
- २०१९ मध्ये ८,७५४ कोटी खर्चाला मंत्रिमंडळाची मान्यता
- राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी कार्यक्रमासाठी चार हजार कोटी मंजूर
- २०२१-२२च्या अर्थसंकल्पात ३,७६८ कोटी
- २०२२-२३च्या अर्थसंकल्पात ५७८ कोटी
- २०२४-२५च्या मूळ अर्थसंकल्पात १३०९ कोटी अपेक्षित
- सुधारित अर्थसंकल्पात केवळ ५७२ कोटींची तरतूद





### दिल्ली विधानसभेसाठी उद्या मतदान

**नवी दिल्ली :** दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सोमवारी सांगता झाली. प्रचाराच्या अखेरच्या दिवशी आप, भाजप व काँग्रेसच्या नेत्यांनी जाहीर सभा, रोड-शो, पदयात्रा, नुक्कड सभा, बाइक रॅली अशा विविध मार्गाने मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी धावपळ केली. उद्या, बुधवारी सर्व ७० जागांसाठी मतदान होणार असून शनिवारी मतमोजणी होईल. पान ४

**अंतरंग**

### मंत्रालय प्रवेशाचा बट्ट्याबोळ

**मुंबई :** चेहरा पडताळणी झाल्याशिवाय मंत्रालयात प्रवेश देण्याच्या निर्णयाच्या सक्तीच्या पहिल्याच दिवशी या योजनेचा बट्याबोळ झाला. अनेक सहसचिवांपासून कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यांची पडताळणी होऊ न शकल्याने त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. परिणामी मंत्रालयाच्या बाहेर सकाळी गोंधळाची स्थिती होती.

### जुन्या प्रकल्पांवरच रेल्वेचा भर

**मुंबई :** मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या प्रकल्पांतील ‘एमयूटीपी-३’ ला ८ डिसेंबर २०११ रोजी मंजुरी मिळाली होती. काँग्रेस सरकारच्या काळात मंजुरी मिळालेल्या प्रकल्पांना आता वेग येणार आहे. मुंबईसह महाराष्ट्रातील रेल्वे सेवेबाबत सोमवारी माहिती देताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पनवेल-कर्जत दुहेरी रेल्वे, विरार-डहाणू चौपदरीकरणाला गती देणार असल्याचे सांगितले. पान ९

### ‘परवानगीशिवाय वनक्षेत्र कमी करू नका’

**नवी दिल्ली :** आपल्या परवानगीशिवाय वनक्षेत्र कमी करणारी कोणतीही पावले उचलू नयेत, असे स्पष्ट आदेश सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना दिले. २०२३च्या वन संरक्षण कायद्यातील सुधारणांविरोधात दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे आदेश दिले. पान ४

# शिर्डीत साई संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांची हत्या

## एक जखमी; लूटमारीचा संशय, संशयित ताब्यात

**लोकसत्ता वार्ताहर**

**राहाता :** शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांवर लुटीच्या उद्देशाने मोटारसायकलवरून आलेल्या अनोळखी तरुणांनी धारदार शस्त्राने हल्ला करीत त्यांची निर्घृण हत्या केली. तर आणखी एका वयोवृद्धावर असाच हल्ला झाल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत. सोमवारी पहाटेच्या सुमारास या दोन्ही घटना घडल्या. याप्रकरणी शिर्डी व राहाता पोलिसांनी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करत एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

सुभाष घोडे व नितीन शेजूळ (दोघेही रा. शिर्डी) अशी मृत तरुणांची नावे आहेत. कृष्णा देहरकर असे गंभीर *(पान ४ वर)*

शिर्डीमधील या घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. येथे बाहेरचे गुन्हेगार येऊन अशा घटना करतात. शिर्डीची गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलण्यात येतील.
**– डॉ. सुजय विखे**, माजी खासदार

# शिवराज खरोखरच चीतपट झाला का?

## ‘महाराष्ट्र केसरी’ किताबी लढतीनंतर चर्चेचा ‘आखाडा’

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने पार पडलेल्या ६७व्या राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील महाराष्ट्र केसरी किताबाचा निकाल लागल्यानंतर २४ तासानंतरही दिवसभर गादी विभागातील अंतिम लढतीत शिवराज राक्षेला चीतपट देण्याच्या पंचांच्या निकालाची चर्चा सुरू होती. शिवराज खरोखरंच चीतपट झाला का, या प्रश्नावरून वेगळ्याच ‘आखाड्या’त चर्चेची कुस्ती रंगली.

या संदर्भात काका पवार यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी आपली भूमिका कायम ठेवली. ‘पृथ्वीराजकडून निराशेच्या भरात चूक झाली. त्याची शिक्षा म्हणून



त्याला तीन वर्षे निलंबित केले गेले. मग, पंच जर चूक असतील, तर त्यांना काय जन्मठेप देणार का,’ असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी संयुक्त आंतरराष्ट्रीय कुस्तीगीर महासंघाच्या (यूडब्ल्यूडब्ल्यू) नियमाचा हवाला देऊन प्रथम निर्णयाचे समर्थन केले. मात्र, ‘अजूनही शिवराजला पंचांच्या निर्णयाविषयी शंका असेल, तर त्याने कुस्तीगीर संघाकडे आक्षेप नोंदवावा. स्वतंत्र समिती नियुक्त करून आक्षेपाची दखल घेतली जाईल,’ असेही नंतर सांगितले.

‘शिवराज आणि महेंद्रच्या कृतीमुळे पंचांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले. यापुढे कुस्ती घेण्यासाठी पंचच उभे राहिले नाहीत, तर लढती कशा होतील, कुस्ती कशी पुढे जाणार, ही भीती या प्रसंगाने निर्माण झाली. त्यामुळे भविष्यात दुसऱ्या कुठल्या मल्लाने असे कृत्य करू नये म्हणून आम्ही दोन्ही मल्लांवर तीन वर्षे निलंबनाची कारवाई केली,’ असे भोंडवे म्हणाले.

### न्यायालयात जाण्याचा इशारा

अहिल्यानगर : महाराष्ट्र केसरी गटातील गादी विभागाच्या अंतिम लढतीत चीतपट ठरविण्याच्या पंचांच्या निर्णयाविरोधात कुस्तीपटू शिवराज राक्षेने न्यायालयात जाण्याचा इशारा दिला. ‘मी पराभूत झालो नाही, तर पराभूत केले गेले. लढतीचा रिव्ह्यू घेण्याची मागणी फेटाळण्यात आली. हा माझ्यावर अन्याय आहे. त्यामुळे मी न्यायालयात दाद मागणार आहे,’ असे शिवराजने सांगितले.

### चंद्रहार पाटलांची संतप्त प्रतिक्रिया

महाराष्ट्र केसरी किताबाचा दोनदा मानकरी ठरलेले सांगलीचे चंद्रहार पाटील यांनी शिवराजला चितपट ठरविण्याच्या निर्णयावर संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. ‘पंचांच्या चुकीमुळे मल्लाच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फेरले जाते. माझीही तिसऱ्या विजेतेपदाची संधी अशीच हुकली होती. पंचांवर वचक बसायलाच हवा,’ असे ते म्हणाले.

# देशभरातील व्याघ्र प्रकल्पांना शिकारीचा ‘रेड अलर्ट’

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** ‘बहेलिया’ शिकाऱ्यांनी तिसऱ्यांदा वाघांची शिकार करून महाराष्ट्राला हादरवून सोडले. यापूर्वीही २०१३ मध्ये राज्यात बहेलियांनी २२ ते २५ वाघांची शिकार केली होती. २०२३ मध्येही याच टोळीने केलेल्या शिकारी उघडकीस आल्या. या पार्श्वभूमीवर तपासासाठी चंद्रपुरात आलेल्या ‘डब्ल्यूसीसीबी’ (वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो) पथकाने देशातील सर्व व्याघ्रप्रकल्पांसाठी ‘रेड अलर्ट’ जाहीर केला आहे.

वाघाच्या शिकारी प्रकरणी २५ जानेवारीला ‘बहेलिया’ टोळीचा म्होरक्या अजित राजगोंड ऊर्फ अजित पारधी याला अटक करण्यात आली होती. आतापर्यंत बहेलियांनी वाघांच्या शिकारीत तब्बल दोन कोटी २० लाख रुपयांचा व्यवहार केल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाच्या तपासासाठीच नवी दिल्ली येथील ‘डब्ल्यूसीसीबी’चे वरिष्ठ अधिकारी आणि मध्यप्रदेश येथील ‘स्पेशल टायगर स्ट्राईक फोर्स’चे वरिष्ठ अधिकारी चंद्रपुरात दाखल झाले. त्यामुळे राजगोंडाच्या चौकशीतून आणखी माहिती बाहेर येण्याची शक्यता आहे. तसेच वाढत्या शिकारीच्या घटनांमुळे देशातील सर्व व्याघ्रप्रकल्पांसाठी ‘रेड अलर्ट’ही पथकाने दिला आहे.

**वाघांच्या शिकार प्रकरणाचा तपास करण्यासाठी ‘डब्ल्यूसीसीबी’चे पथक चंद्रपुरात दाखल झाले. वन्यजीव गुन्हे शोधून काढण्यात या पथकाचा हातखंडा आहे.**

### विशेष तपास पथक

- वाघांच्या शिकारीप्रकरणी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने विशेष तपास पथक गठित केले आहे. यात महाराष्ट्र वन खात्यासह नवी दिल्ली येथील ‘डब्ल्यूसीसीबी’ तसेच मध्य प्रदेशातील ‘स्पेशल टायगर स्ट्राईक फोर्स’चा समावेश आहे.



- प्राधिकरणाने आणखी गठित केलेल्या पाच पथकांपैकी एक पथक गुवाहाटी, शिलाँग येथे रवाना झाले आहे. या ठिकाणाहून आणखी एका आरोपीला अटक होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### संवेदनशील क्षेत्रांमध्ये देखरेख


भारतीय उंच पर्वतरांगा, पूर्व घाट, शिवालिक टेकड्या आणि गंगेच्या मैदानांसह अनेक प्रमुख संवर्धन क्षेत्रात ‘बहेलिया’ टोळीचा वावर आढळला आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प, पेंच व्याघ्रप्रकल्प, सातपुडा, जिम कार्बेट यासारखे प्रमुख व्याघ्रप्रकल्प हे बहेलियांसाठी ‘हॉटस्पॉट’ आहेत. त्यामुळे या ठिकाणच्या क्षेत्रसंचालकांना संवेदनशील क्षेत्रांमध्ये देखरेख वाढवण्यास सांगण्यात आले आहे.


# टोमॅटो, कोबीच्या दरांत घसरण

## घाऊक बाजारात अनुक्रमे पाच ते आठ रुपये किलोने विक्री

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे/लातूर :** मुंबई, ठाणे, पुण्यासह राज्याच्या विविध बाजारांत कोबीची आवक मोठ्या प्रमाणावर होत असल्याने दरात मोठी घट झाली. परिणामी घाऊक बाजारात एक किलो कोबीला सहा ते आठ रुपये दर मिळत आहे. एकीकडे कोबीच्या दरात घसरण झाली असताना, दोन महिन्यांपूर्वी बाजारपेठेत १०० रुपये किलो दराने विकल्या जाणाऱ्या टोमॅटोचे दरही पाच रुपये किलोपर्यंत घसरले आहेत. दरांतील या घसरणीमुळे शेतकरी मात्र हवालदिल झाला आहे.





**कोबी** (एक किलो)
घाऊक : ६ ते ८ रुपये
किरकोळ : १५ ते २५ रुपये
**टोमॅटो** (२५ किलो क्रेट) : १२० ते १५० रु.

जो भाव मिळेल त्या भावाने टोमॅटो विकणे शेतकऱ्याला भाग आहे. काही उत्पादन बंगळूरुला पाठवत असून काढणीचा खर्चही निघत नाही, अशी स्थिती आहे. वाहनामध्ये माल चढवण्यासाठी लागणारी मजुरी शेतकऱ्यालाच द्यावी लागते. त्यामुळे दर परडवत नाहीत.
**– नूर पटेल**, प्रतगिशील शेतकरी, वडवळ (लातूर)

सध्या पोषक वातावरणामुळे कोबीची लागवड चांगली झाली आहे. गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्रात कोबीची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मुंबई, पुण्यासह राज्यातील बाजार समित्यांच्या आवारात गेल्या आठवडाभरापासून कोबीची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. परिणामी दरात *(पान ४ वर)*

## वैद्यकीय महाविद्यालयांत खासगी भरतीला विरोध

**मुंबई :** नवीन वैद्यकीय महाविद्यालयांत खासगी संस्थांच्या माध्यमातून मनुष्यबळ भरण्याविषयीचा निर्णय राज्य सरकारने घेतला. मात्र, आता जुन्या वैद्यकीय महाविद्यालयांतही खासगी मनुष्यबळ भरले जात असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे. याविरोधात कर्मचाऱ्यांनी आरोग्य संचालनालय आयुक्तांकडे धाव घेतली. मात्र योग्य त्यानंतरही योग्य आश्वासन न मिळाल्याने चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी निर्णयाला विरोध दर्शवत बेमुदत उपोषण छेडले आहे.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखाली मुंबईतील जे.जे., सेंट जॉर्ज, कामा व आल्ब्लेस, जी.टी. रुग्णालय, नागरी स्वास्थ्य केंद्र (वांद्रे), पोद्दार आयुर्वेद रुग्णालय, दंत महाविद्यालय व रुग्णालय येथील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन पुकारले आहे.

## दिनदर्शिका

**मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५**
भारतीय सौर १५ माघ शके १९४६
मिती माघ शुक्लपक्ष
सप्तमी उत्तर रात्री ०२ : ३१ पर्यंत.
नक्षत्र ; अश्विनी २१ : ५० पर्यंत.
चंद्र : मेष
सूर्योदय : ०७ : १३
सूर्यास्त : १८ : ३२

- **मेष** : सुखाची दिनचर्या.
- **वृषभ** : दगदग करणे टाळा.
- **मिथुन** : मित्रांचे सहकार्य मिळेल.
- **कर्क** : ज्येष्ठांची कृपा राहील.
- **सिंह** : हक्काचे यश मिळेल.
- **कन्या** : भडक कृती टाळा.
- **तूळ** : जोडीदाराची साथ मिळेल.
- **वृश्चिक** : संवाद जपून करा.
- **धनू** : मुलांची प्रगती होईल.
- **मकर** : व्यवहाराला गती येईल.
- **कुंभ** : पाहुणे मंडळी येतील.
- **मीन** : मंगल कार्य घडेल.

**शुभ राशी : मेष, सिंह**

# साहित्य संमेलनात वाढीव निधीच्या घोषणेची शक्यता

## ‘जेएनयू’तील मराठी अध्यासनाला मोदींची उपस्थिती पावणार !

**शफी पठाण, लोकसत्ता**

**नागपूर :** मागच्या १८ वर्षांपासून प्रलंबित असलेला दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) मराठी भाषेच्या अध्यासन केंद्राचा विषय मार्गी लागण्याची शक्यता आहे. दिल्लीत आयोजित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनीय सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत वाढीव निधीच्या घोषणेसंदर्भात हालचाली सुरू असल्याचे कळते.

जेएनयूमध्ये मराठी साहित्यावरील संशोधन आणि विकासाला गती मिळावी यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात प्रयत्न सुरू झाले. राज्य आणि केंद्रात काँग्रेसचे सरकार असल्यामुळे या विषयाला लगेच मान्यताही मिळाली. त्यासाठी राज्य सरकारने एक कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला. परंतु, पुढे वाढीव निधीच्या मागणीवरून अध्यासनाचा विषय रखडला. आता या अध्यासनासाठी किमान १० कोटी रुपये मिळावे, अशी जेएनयूची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे, तामिळ, उडिया, ओडिशा या राज्यांनी आपआपल्या भाषांच्या अध्यासनाचा विषय मार्गी लागावा यासाठी जेएनयूला तत्परतेने निधी पुरवला. महाराष्ट्र सरकारने मात्र अशी तत्परता न दाखवल्याने मागच्या सुमारे १८ वर्षांपासून अध्यासन सुरू होऊ शकलेले नाही.

केवळ तीन दिवसांच्या, करमणूक प्रधान, उत्सवी, व्यासपीठीय अशा सरकारी विश्व साहित्य संमेलनावर १० कोटींचा खर्च करणाऱ्या राज्य सरकारकडे आपल्या भाषेच्या अध्यासनासाठी निधी का नाही, असा प्रश्न साहित्य वर्तुळातून विचारला जाऊ लागल्यानंतर सरकार वाढीव निधी देण्याबाबत गंभीरपणे विचार करीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दिल्लीतील संमेलन २१ ते २३ फेब्रुवारी या काळात होत आहे आणि २७ फेब्रुवारीला ‘मराठी भाषा गौरव दिन’ आहे. या पार्श्वभूमीवर निधी देतानाच त्याचे राजकीय श्रेयही मिळावे, यासाठी पंतप्रधान मोदी यांच्या उपस्थितीत दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या उद्घाटनीय सत्रात घोषणा करण्याचे नियोजन सुरू असल्याचे कळते. दरम्यान, याबाबत प्रतिक्रिया मिळवण्यासाठी मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

### कुसुमाग्रजांचे नाव प्रस्तावित

मराठीला ज्ञानभाषा म्हणून ओळख निर्माण करून देण्यासाठी कुसुमाग्रज यांनी बरेच श्रम खर्ची घातले. त्यांनी आपल्या कवितेतून समाज जागृत करणाऱ्या महापुरुषांचे दर्शन घडवले. त्यामुळे प्रस्तावित मराठी अध्यासनाला कुसुमाग्रजांचे नाव देण्याबाबत सरकारचा विचार सुरू आहे.

महाराष्ट्र सरकारजवळ १८ वर्षांपासून साडेआठ कोटी रुपये नाहीत असे होऊच शकत नाही. दिल्लीच्या विद्यापीठात मराठी भाषा अध्यासन होऊच नये म्हणून कोणीतरी शासनात, प्रशासनात प्रयत्नशील असले पाहिजे, असा याचा अर्थ होऊ शकतो.
**– श्रीपाद भालचंद्र जोशी**, पूर्वाध्यक्ष, अ. भा. म. साहित्य महामंडळ.

## जयपूर साहित्य महोत्सवाची यशस्वी सांगता

# सुजाण साहित्यप्रेमींचा उत्तम प्रतिसाद

**लता दाभोळकर, लोकसत्ता**

**जयपूर :** गेले पाच दिवस रंगलेल्या १८ व्या जयपूर साहित्य महोत्सवाची सोमवारी सांगता झाली. शेवटच्या दिवशीही वक्त्यांना ऐकण्यासाठी रसिकांनी गर्दी केली होती. त्यातही शनिवार-रविवारची सुट्टी साहित्यप्रेमींनी सत्कारणी लावल्यानं ‘क्लार्क्स आमेर हॉटेल’च्या प्रांगणात अधिकच उत्साही वातावरण दिसले.

एक चर्चासत्र संपल्यानंतर दुसऱ्या चर्चासत्राला पोहोचण्यासाठी गर्दीतून वाट काढणं कठीण होत होतं. दोन दिवस या महोत्सवाला येणाऱ्यांमध्ये शाळकरी मुले, कॉलेजमधील युवा-युवतींची संख्या मोठी होती, साहित्य महोत्सवात दोन दिवसांतली युवा वर्गाने केलेली गर्दी कौतुकास्पद होती. भले ही मुले इथे नेमके काय चालले आहे, कोणकोण वक्ते आहेत हे पाहण्यासाठी कुतूहलापोटी आले असतील, परंतु साहित्य महोत्सवात युवा पिढीने सहभागी होणे ही बाब खूपच महत्त्वाची. हल्लीची युवापिढी वाचत नाही ही ओरड सुरू असताना तरुणांनी आपल्या भवतालात साहित्य, वैचारिक विश्वात डोकावून पाहणे हेही नसे थोडके. मुलांनी पुस्तकांच्या स्टॉलवर केलेली हे एक आशादायी चित्र. मुलांना पुस्तकं हाताळण्याचं, ती चाळण्याचं मिळणार स्वातंत्र्य... इथल्या स्टॉल्सवरही विविध कलाविष्कार पाहायला मिळाले. काही जणांनी स्वतः वाद्य तयार करून इथे विक्रीस ठेवली होती, काहींनी छानशा छुटुल्या बाहुल्या केलेल्या... या वस्तू तुलनेत महागड्या असल्या तरी त्या पाहणंही आनंददायी अनुभव होता.



### अनुवाद हा रियाजासारखा - शांता गोखले

अनुवाद हा संगीतातील रियाजासारखा... तुम्ही गाण्याचा रियाज जसजसा करत जाता तसतसे तुमचे गाणे अधिकाधिक पक्के होत जाते. अनुवादाचेही नेमके तसेच आहे. एकदा का तुम्ही अनुवादाच्या दालनात शिरलात की तुमचे पुढील काम तुम्हाला अधिक समृद्ध करत जाते. अनुवादाची हीच गंमत आहे, असे मनोगत प्रसिद्ध लेखिका आणि अनुवादक शांता गोखले यांनी जयपूर साहित्य महोत्सवात व्यक्त केले. आपल्या सकस अनुवादातून वाचकांसाठी मराठी आणि इंग्रजी साहित्याचे आकाश व्यापक करण्याच्या त्यांच्या कामाचा सन्मान म्हणून वाणी फाउंडेशनचा अनुवादासाठीचा ‘वाणी प्रकाशन पुरस्कार’ त्यांना प्रदान करण्यात आला. नॉर्वेच्या भारतातील राजदूत मे- एलिन स्टेनर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# संशोधनासाठी ‘सिम्बायोसिस’चा पुढाकार

## इंग्लंडमधील विद्यापीठाबरोबर अकादमी स्थापन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** उद्योग, सामाजिक क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ आणि बर्मिंगहॅम येथील अॅस्टन विद्यापीठ यांच्या वतीने ‘सिम्बायोसिस अॅस्टन रिसर्च अकादमी’ (सारा) स्थापन करण्यात येणार आहे.

या अकादमीच्या माध्यमातून परिणामकारक संशोधनाला चालना देण्यासाठी पीएच.डी., तसेच पोस्ट डॉक अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. सिम्बायोसिसच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, अॅस्टन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अॅलेक्स सुबिक यांनी याबाबत सोमवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रामाकृष्णन रमण, डॉ. राजीव येरवडेकर, ‘एमसीसीआयए’चे महासंचालक प्रशांत गिरबने या वेळी उपस्थित होते. अकादमीसाठी दोन विद्यापीठांमध्ये करार करण्यात आला. ‘आयआयटी मोनाश मॉडेल’पासून प्रेरणा घेऊन अकादमी स्थापन करण्यात येत आहे.

प्रा. सुबिक म्हणाले, ‘बर्मिंगहॅम हे इंग्लंडमधील उत्पादनाचे केंद्र आहे. अॅस्टन विद्यापीठाने तेथील उद्योग क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्या धर्तीवर उद्योग केंद्र असलेल्या पुण्यात या अकादमीच्या माध्यमातून उपयोजित संशोधन केले जाणार आहे. अकादमीच्या दोन्ही केंद्रांमध्ये (भारत, इंग्लंड) विद्यार्थी दोन्ही विद्यापीठांनी तयार केलेल्या शिक्षण प्रक्रियेतून शिकतील. ही अकादमी प्रायोजित संशोधन, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि व्यापारीकरणासाठी उद्योग भागीदारांशी संवाद साधेल.’

‘अकादमीत उच्च दर्जाच्या पायाभूत आणि शैक्षणिक सुविधा पुरवल्या जातील. तसेच पुणे परिसरातील उद्योग क्षेत्रातील समस्या समजून त्यानुसार संशोधनावर भर दिला जाणार आहे. सिम्बायोसिस विद्यापीठात बजाज, इन्फोसिस, सिरम इन्स्टिट्यूट अशा मोठ्या उद्योगांच्या प्रयोगशाळा कार्यरत आहेत. आता या नव्या प्रयोगशाळेमुळे संशोधनाला अधिक चालना मिळणार आहे. संशोधनासाठी विद्यापीठांसह कंपन्या, सरकारकडूनही निधी उपलब्ध होऊ शकतो,’ असे डॉ. येरवडेकर यांनी सांगितले.

‘पुण्यात वाहन, उत्पादन, औषधनिर्माण अशा वेगवेगळ्या उद्योग क्षेत्रांतील कंपन्या आहेत. या उद्योगांना भेडसावणारी आव्हाने समजून ती सोडवण्यासाठीचे संशोधन, परिसंस्था विकसित होणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या सुविधांचा उद्योगांना नक्कीच फायदा होईल,’ असे गिरबने यांनी नमूद केले.

## ‘साथरोग कायद्याची कठोर अंमलबजावणी करा’

**मुंबई :** साथीचे रोग नियंत्रणात राहावे यासाठी साथरोग कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी. तसेच साथरोग कायद्यात सुधारणा करण्याच्या सूचना देत रिक्त पदांचा व प्रतीक्षा यादिवरील जागा तत्काळ भरण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर मंत्रालयात झालेल्या बैठकीत सांगितले.

साथीचे आजार नियंत्रण करण्यासाठी कठोर पावले उचलावी. पूर्व खबरदारी घेण्यासाठी काय उपाय योजना करता येतील यासाठी संबंधित विभागाने गांभीर्याने काम करावे. जीबीएस सारखा आजार हा अशुद्ध पाण्यामुळे होत आहे. डेंग्यू, झिका,मलेरिया इतर आजार दूषित पाण्यामुळे होत आहेत. या सर्व बाबीवर गांभीर्याने लक्ष द्यावे असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

# आरोग्य सल्ल्यांसाठी समाजमाध्यम योग्य पर्याय नव्हे

## डॉ. शिव सरीन यांचे परखड मत

**जयपूर :** समाजमाध्यमांवरील आरोग्याविषयी सल्ले वाचून, ऐकून त्यांचे अंधानुकरण करणे म्हणजे तुम्ही तुमच्या शरीरावर करीत असलेला अन्याय आहे. तुमच्या शरीराविषयी कोणतीही गोष्ट करताना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या, समाजमाध्यमांवरील सल्ल्यांच्या नादी लागू नका, असे परखड मत ‘ओन युवर बॉडी’ या पुस्तकाचे लेखक डॉ. शिव सरीन यांनी केले. काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी या पुस्तकाविषयी त्यांच्याशी संवाद साधला. योग्य आहार, व्यायाम हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली असल्याचे ते म्हणाले.

हल्ली अनेक लोकांना निवांत झोप लागत नसल्याच्या तक्रारी आहेत. यासाठी तुम्ही योग्य तेच खा, मोजकेच पण सकस अन्न घ्या, व्यायाम करा, म्हणजे तुमचे आरोग्य उत्तम राहील. आपल्या वाहनात किंवा घरातील कुठल्याही तांत्रिक उपकरणात जराही बिघाड झाला की, संबधित तज्ज्ञाला बोलावून ते दुरुस्त करून घेतो, परंतु इतक्या सजगपणे आपण आपल्या शरीरातील बिघाडांकडे पाहात नाही आणि आपल्या मागे डॉक्टर लावून घेतो. त्यामुळे तुमच्या शरीरात जराही बदल जाणवल्यास वेळीच डॉक्टरांकडे जा आणि योग्य त्या तपासण्या करून घ्या, असा सल्लाही त्यांनी दिला.

### ‘मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावणे गरजेचेच’

नवनवीन विषाणू, आजारांपासून मुलांना दूर ठेवायचे असेल तर त्यांना लहानपणापासूनच स्वच्छतेच्या सवयी लावणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ‘इनोव्हेटिंग हेल्थ : क्रिएटिंग सस्टेनेबल कम्युनिटीज’ या चर्सासत्रात सहभागी झालेल्या वक्त्यांनी केले. या चर्चासत्रात वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे प्रा. जे. लेमरी, रवी भटनागर, इंदिरा चक्रवर्ती, सोनाली खान सहभागी झाले होते. अंबिका सिंग यांनी त्यांच्याशी संवाद साधला. अशा प्रकारच्या चर्सासत्राला प्रेक्षकांची गर्दी पाहून या चर्चेची फलनिष्पत्ती होईल असा विश्वास वक्त्यांनी व्यक्त केला.


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत
लोकसत्ता यशस्वी भव! २२९





## इयत्ता दहावी, एस.एस.सी. बोर्ड सराव कृतिपत्रिका

**ACTIVITY SHEET FOR PRACTICE**
**Sub : MATHEMATICS – 1**

TIME: 2 HOURS — MARKS : 40

**Q.1. (A) Choose the correct answer and write the alphabet of it. (4)**

1) Which of the following is not a quadratic equation?
A) $x^2 + 4x = 11 + x^2$  B) $x^2 = 4x$
C) $5x^2 = 90$  D) $2x - x^2 = x^2 + 5$
2) What is the sum of first 10 natural numbers?
A) 20  B) 65  C) 55  D) 11
3) For simultaneous equations in variables $x$ and $y$, $D_x = 49$, $D_y = -63$, $D = 7$, then what is the value of $y$?
A) 9  B) -9  C) -7  D) 7
4) What is the class mark of the class 36 - 40?
A) 36  B) 40  C) 2  D) 38

**Q.1. (B) Solve the following questions: (4)**

1) Determine whether 2 is a root of the equation $2m^2 - 5m = 0$ or not.
2) Find the value of $x + y$, if $15x + 17y = 21$ and $17x + 15y = 11$
3) On certain article if rate of CGST is 9% then what is the rate of GST?
4) Find the value of $b^2 - 4ac$, if a = 1, b = -2, c = - 4.

**Q.2. (A) Complete and write *any two* activities from the following: (4)**


1) Complete the following activity to find the value of $x$.
**Activity:**

$$\begin{array}{r} 3x + 2y = 29 \\ +\ 10x - 2y = 36 \\ \hline \square\, x = \square \end{array}$$

$\therefore x = \dfrac{\square}{13}$

$\therefore x = \square$

2) Observe the following frequency polygon and complete the activity:




a) Class $\square$ has the maximum number of students.
b) Class mark of the class having frequency of 50 students is $\square$ .
c) There are $\square$ students in the class 80-90.
d) The class $\square$ have frequency of 35 students.

3) Find the amount received when 300 shares of FV Rs. 100, were sold at a discount of Rs.30.
Complete the given activity to get the answer.
**Activity:** FV = Rs.100, Discount = Rs.30
$\therefore$ MV = FV - $\square$
= $\square$ - 30
$\therefore$ MV = Rs.70
Amount received by selling 300 shares
= Number of shares × MV
= $\square$ × 70
= Rs. $\square$

**B) Solve any four sub questions: (8)**

1) Find the median from the following information:
L = 40, $f$ = 24, $cf$ = 26, h = 10, N = 100.
2) If $\begin{vmatrix} 5 & 3 \\ 7 & m \end{vmatrix} = 24$, then find the value of m.
3) Two coins are tossed simultaneously. Find the probability of the event of getting at least one head.
4) Mr. Kapil purchased 50 shares of Face Value Rs.100 when the MV of the share was Rs.80. Company had given 20% dividend. Find the rate of return on investment.
5) Solve the given quadratic equation by factorisation:
$x^2 + 8x - 48 = 0$


**Q.3.(A) Complete and write any one activity from the following: (3)**

1) A two-digit number is to be formed from the digits 0, 1, 2. Repetition of the digits is allowed. Complete the following activity to find the probability that the number so formed is multiple of 5.
**Activity:** Let S be the Sample space.
$\therefore$ S = {10, 11, 12, 20, 21, $\square$ }
$\therefore$ n (S) = $\square$
Event A: The number so formed is multiple of 5.
$\therefore$ A = {10, $\square$ }
$\therefore$ n(A) = 2
$\therefore P(A) = \dfrac{\square}{n(S)}$ ......Formula
$\therefore P(A) = \dfrac{2}{\square}$
$\therefore$ P (A) = $\square$

2) Complete the following activity to find the number of natural numbers between 1 to 140 which are divisible by 4.
**Activity:**
The natural numbers between 1 to 140 divisible by 4 are
↓
4,8,12, ..., 136
↓
This is an A.P. a = $\square$, d = $\square$, $t_n$ = $\square$
↓
$t_n$ = $\square$ + (n-1) d
↓
136 = 4 + (n-1) x $\square$
↓
$\therefore$ n = $\square$

**(B) Attempt any two sub questions: (6)**

1) When 1 is added to both the numerator and the denominator of a fraction, it becomes $\frac{1}{2}$ and when 1 is subtracted from both the numerator and the denominator, it becomes $\frac{1}{3}$. Find the fraction.
2) A balloon vendor has 2 red, 3 blue and 4 green balloons. She wants to choose one of them at random to give it to Anjali. What is the probability of the event that Anjali gets,
(a) a red balloon? (b) a green balloon?
3) Prepare Business to Business (B2B) Tax Invoice as per the details given below. Write the name of the supplier, address, date, invoice number, GSTIN etc. as per your choice.
Supplier – Name, Address, State, GSTIN, Invoice Number, Date
Recipient – Name, Address, State, GSTIN,
Items: (1) Pencil boxes 50, HSN - 3924,
Rate – Rs. 20, GST – 12%
(2) Jigsaw puzzles 25, HSN – 9503,
Rate – Rs.100, GST – 12%
4) The proportions of different workers in a town are shown in the given pie diagram. Answer the following questions with its help.




(a) If the total number of workers are 10,000; how many of them are in the field of Construction?
(b) How many workers are working in the Agriculture?
(c) What is the percentage of workers in the Administration?

**Q.4) Solve the following sub-questions: (Any 2) (8)**

1) The sum of the areas of two squares is 400 sq.m. If the difference between their perimeters is 16m, find the sides of the two squares.
2) A large water tank begins to leak at the rate of 25 litres per hour. The amount of water escaping is 25 litres more than each hour than the previous hour, till the leak remains undetected. When the leak was eventually discovered, the rate of leakage was 900 litres per hour. For how long had the tank been leaking? What was the total amount of water lost between the beginning of the leakage and the time of discovery?
3) Among the group of students, 10% scored marks below 20, 20% scored marks between 20 and 40, 35% scored marks between 40 and 60, 20% scored marks between 60 and 80. The remaining 30 students scored marks between 80 and 100.
i) Prepare frequency distribution table from the above information.
ii) Draw histogram.

**Q.5) Solve the following sub - question: *(Any 1)* (3)**

1) The sum of two-digit number and the number obtained by interchanging its digits is 55. Find the pair of numbers. Is it possible to have more than one such pair? If yes, write all the pairs.
2) Is it possible to design a rectangular park of perimeter 80m and area $80m^2$? If so, find its length and breadth.


लेखक : अमित रमेश पालव
पार्ले टिळक विद्यालय इंग्लिश मीडियम स्कूल
समन्वयक : सी. डी. वडके


उद्याचा विषय : Mathematics Part -II

# पुणे-नाशिक मार्ग रेल्वेकडूनच

## ‘महारेल’चा डीपीआर व आधी केलेल्या भूसंपादनाबाबत मात्र संभ्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वे प्रकल्पाचे काम रेल्वे विभागाकडूनच करण्यात येणार असल्याचे मध्य रेल्वेच्या पुणे विभागाचे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा यांनी सोमवारी स्पष्ट केले. त्यामुळे ‘महारेल’ने केलेल्या जुन्या सविस्तर प्रकल्प अहवालाला (डीपीआर) बाहेरचा रस्ता दाखविला गेला का, असा प्रश्न उपस्थित झाला असून, ‘नवीन डीपीआरबाबत माझ्याकडे माहिती नाही,’ असेही वर्मा यांनी नमूद केल्याने संभ्रम वाढला आहे.

रेल्वे अर्थसंकल्पात देशांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदींसंदर्भात रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे पत्रकार परिषद घेतली. त्यानंतर वर्मा यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी, महाराष्ट्रातील विविध योजनांची माहिती देताना पुणे-नाशिक नवीन द्रुतगती मार्गिकेबाबत उल्लेख झाला नसल्याने वर्मा यांना प्रश्न विचारण्यात आला. या वेळी त्यांनी याबाबत सविस्तर माहिती नसल्याचे सांगितले. पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वेमार्गामध्ये जुन्नर तालुक्यातील खोडद गावातील जायंट मीटरव्हेव रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) हा सर्वांत मोठा दुर्बिण संशोधन प्रकल्प अडथळा ठरत असल्याने रेल्वेमंत्री वैष्णव यांनी या मार्गावरून रेल्वे प्रकल्प उचित ठरणार नाही, असे जाहीर केले. तसेच, जीएमआरटी प्रकल्पाला धक्का न लावता पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक या नवीन रेल्वे मार्गाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे आदेशही दिले. मात्र, स्थानिक आणि लोकप्रतिनिधींचा नवीन रेल्वे मार्गाला विरोध आहे.

### ‘महारेल’च्या अहवालाचे पुढे काय?

या द्रुतगती प्रकल्पासाठी वेळेत निधी प्राप्त होत नसल्याने भूसंपादन थांबविण्यात आले होते. मेट्रो कायद्याच्या धर्तीवर प्रकल्पाची अंमलबजावणी केल्यास भूसंपादनासह प्रकल्पाची प्रत्यक्ष कामे विनाअडथळा होऊ शकतील. प्रकल्पाला गती मिळेल, प्रशासकीय परवानग्या, मंजुरी तातडीने मिळू शकतील, म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०२२ मध्ये मेट्रो कायद्यानुसार ‘महारेल’च्या माध्यमातून हा मार्ग पूर्ण करण्याबाबत निर्णय घेतला होता. त्यानुसार ‘महारेल’कडून प्रस्ताव सादर करण्यात आला. मात्र, वैष्णव यांनी नवीन रेल्वे मार्गिकेसाठी नव्याने डीपीआर तयार करण्याच्या सूचना दिल्याने ‘महारेल’ने केलेला अहवाल डावलण्यात आला असल्याचे स्पष्ट झाले आहे. खेड, हवेली, तसेच नगर जिल्ह्यातील संगमनेर, नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना मोबदलादेखील वितरित करण्यात आला असून, या जमिनींचे काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे-नाशिक द्रुतगती नवीन रेल्वे मार्गिकेचा डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे. हा प्रकल्प रेल्वे विभागाकडूनच करण्यात येईल.
**– राजेशकुमार वर्मा,** व्यवस्थापक, मध्य रेल्वे, पुणे विभाग

# वीजबिल भरूनही नागरिक अंधारात

## पुरेशा देखभाल-दुरुस्तीअभावी वेळ येत असल्याचा सजग नागरिक मंचाचा आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** ‘पुरेशा देखभाल दुरुस्तीअभावी वीजयंत्रणा सातत्याने अपयशी ठरत आहे. त्यामुळे वीजबिल भरूनही ग्राहकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे,’ असा आरोप सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी सोमवारी केला.

‘देखभाल-दुरुस्तीवरील खर्च संचलन व देखभाल यासाठी मान्य खर्चाच्या २० टक्क्यांपेक्षा कमी झाला, तर त्यातून वाचलेले पैसे अन्य कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाहीत, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. याचा मूळ उद्देश नागरिकांना विनाव्यत्य वीजपुरवठा मिळण्यासाठी महावितरणने देखभाल-दुरुस्तीवर पुरेसा खर्च करावा, असा आहे. मात्र, महावितरणने राज्य वीज नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या पुढील पाच वर्षांसाठीच्या वीजदर प्रस्तावात नमूद केले आहे, की २०२२-२३ मध्ये देखभाल-दुरुस्तीसाठी २० टक्क्यांऐवजी १३.६ टक्केच आहे, तर २०२३-२४ मध्ये तो १५.५ टक्के आहे. याचा अर्थ या दोन वर्षांत महावितरणने देखभाल-दुरुस्तीवर केलेला खर्च आवश्यकतेपेक्षा जवळपास एक हजार कोटी रुपयांनी कमी आहे, ज्याचा फटका ग्राहकांना बसला आहे,’ असे वेलणकर यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘देखभाल-दुरुस्ती आणि नैसर्गिक आपत्तीमुळे बंद ठेवलेल्या वीजपुरवठ्याव्यतिरिक्तही वीज खंडित झाल्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. महावितरणनेच याबाबतची आकडेवारी संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार, राज्यातील ग्राहकांना ऑगस्ट २०२४ मध्ये वीजपुरवठा खंडित होण्याच्या ७१,८८५ घटनांमुळे ४७,१३८ तास, सप्टेंबरमध्ये ९६,५२८ घटनांमुळे ५७,३९२ तास, ऑक्टोबरमध्ये १,०७,०८८ घटनांमुळे ६७,८१५ तास, तर नोव्हेंबरमध्ये १,०२,९८८ घटनांमुळे ५१,८७५ तास अंधाराचा सामना करावा लागला.’

या संदर्भात आयोगाशी चर्चा सुरू असल्याने अधिकृतपणे काही सांगता येणार नाही, असे महावितरणने स्पष्ट केले.

महावितरणने दर महिन्याला त्यांच्या संकेतस्थळावर वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांची माहिती प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. याला विश्वासार्हतेचे निर्देशांक म्हणतात. मात्र, महावितरण ही माहिती नियमितपणे देत नाही. याबाबत तक्रार केल्यावर एकदम २-३ महिन्यांची माहिती जाहीर केली जाते. महावितरणच्या संकेतस्थळावर विश्वासार्हतेच्या निर्देशांकाबाबत उपलब्ध असलेली माहिती गंभीर स्वरूपाची आहे.
**– विवेक वेलणकर,** सजग नागरिक मंच

## गोध्रा हत्याकांडातील आरोपीच्या टोळीकडून लूट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** ग्रोधा हत्याकांडात जन्मठेप झालेला मुख्य आरोपी सलीम उर्फ सलमान युसूफ जर्दा याने संचित रजा (पॅरोल) मिळवून कारागृहातून बाहेर आल्यावर टोळी तयार केली. या टोळीकरवी त्याने पुणे आणि नाशिक जिल्ह्यात वाहनचालकांना अडवून लुटमारीचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून, याप्रकरणी आळेफाटा पोलिसांनी जर्दा याच्यासह पाच जणांना अटक केली.

जर्दा याच्यासह साहिल हनीफ पठाण (वय २१), सुफियान सिकंदर चाँदकी (वय २३,) अयुब इसाक सुनठिया (वय २९), इरफान अब्दुलहमीद दुर्वेश (वय ४१, सर्व रा. गोध्रा, गुजरात) यांना अटक करण्यात आली. ‘सलीम जर्दा याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. संचित रजा (पॅरोल) मिळवून तो कारागृहातून बाहेर पडला. त्यानंतर तो कारागृहात परतला नाही. त्याने साथीदारांच्या मदतीने घरफोडीचे गुन्हे करण्यास सुरुवात केली. आळेफाटा परिसरात या टोळीने एका टेम्पोचालकाला लुटले होते. टेम्पोतील टायर ट्यूब चोरून आरोपी पसार झाले होते. या टोळीविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांत १६ गुन्हे दाखल आहेत,’ अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

# सिंहगड रस्ता परिसरातील १९ खासगी जलशुद्धीकरण प्रकल्पांतील पाणी दूषित

## प्रकल्पचालकांवर कारवाईचा महापालिका आयुक्तांचा आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील ज्या परिसरात गुईलेन बॅरे सिंड्रोमचे (जीबीएस) संशयित रुग्ण वाढत आहेत. त्या भागात पाणीपुरवठा करणाऱ्या ३० खासगी जल शुद्धीकरण प्रकल्पांपैकी (आरओ प्लांट) १९ प्रकल्पांतील पाणी दूषित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत खासगी टँकर, तसेच ‘आरओ’च्या प्रकल्पांवर कडक कारवाई करण्याचा आदेश पाणीपुरवठा विभागास दिला आहे.

दरम्यान, खडकवाला, किरकिटवाडी आणि आजूबाजूच्या परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या खासगी टँकरमधील पाणी दूषित असल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले होते.

सिंहगड रोड परिसरातील खडकवासला, नांदेड, किरकिटवाडी, नांदोशी, धायरी, डीएसके विश्व, आंबेगाव या गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून जीबीएस रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ होत असल्याचे समोर आले आहे. या भागात रुग्णांची संख्या वाढत असल्याने राज्य, तसेच केंद्राच्या पथकांनीदेखील या भागाला भेट देऊन आवश्यक ती उपाययोजना करण्याचा आदेश महापालिका आणि जिल्हा प्रशासनाला दिला आहे. या भागातील नागरिकांना ज्या विहिरीतून पाणी दिले जाते, त्या विहिरीच्या पाण्याची तपासणी केली होती. मात्र, हे पाणी दूषित आढळले नाही. त्यानंतर महापालिकेच्या वतीने या भागातील खासगी टँकर पॉइंटमधील पाण्याची तपासणी करण्यात आली होती.

या तपासणीमध्ये संबंधित पाण्यात ई-कोलाय व अन्य जीवाणू असल्याचे आढळले होते. हे पाणी दूषित असल्याचा अहवाल आल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून संबंधित टँकर भरणा केंद्र, तसेच खासगी टँकरमालकांना केवळ लेखी पत्र देण्यात आले होते. तसेच त्यांना पाणी शुद्धीकरणासाठी ब्लिचिंग पावडर नेण्याचे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले होते. मात्र, कुठल्याही प्रकारची कडक कारवाई करण्याचे धाडस पाणीपुरवठा विभागाने दाखविले नव्हते. या गावांमध्ये खासगी जलशुद्धीकरण प्रकल्प चालकांकडून पिण्यासाठी पाणी दिले जात होते. या पाण्याचे नमुनेही तपासणीसाठी घेण्यात आले होते. या भागातील ३० प्रकल्पांतील नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांपैकी १९ प्रकल्पांमधील पाणी दूषित असल्याचा अहवाल महापालिकेकडे आला आहे.

सिंहगड रस्त्यावरील ‘जीबीएस’चे रुग्ण सापडलेल्या परिसरातील खासगी जलशुद्धीकरण प्रकल्प चालविणाऱ्यांच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. त्यातील १९ प्रकल्पांतील पाणी दूषित असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्यावर कारवाई करण्याचा आदेश पाणीपुरवठा विभागास दिला आहे.
**– डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त


**दि लक्ष्मी को-ऑप. बँक लि., सोलापूर.**
**अवसायनात**
३१९ दक्षिण कसबा, सोलापूर.
संदर्भ : ई-निविदा नोटीस दि. १६/०१/२०२५

**दुसरी ई-निविदा नोटीस (मुदतवाढ)**

उपरोक्त संदर्भीय नोटीसीद्वारे, दि लक्ष्मी को ऑप बँक लि. सोलापूर (अवसायानात) या बँकेची मालकीची होटगी रोड, सोलापूर येथील मालमत्ता हस्तांतरण/विक्री साठी ई-निविदा दाखल करण्यासाठी दि. ११ / ०२ / २०२५ सकाळी ११ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.
अटी व शर्ती मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. अधिक माहिती करिता www.mahatenders.gov.in या संकेत स्थळाला भेट द्यावी.

**अवसायक**
**दि लक्ष्मी को-ऑप. बँक लि., सोलापूर.**
**(अवसायनात)**


## ‘मिसिंग लिंक’साठी ८०० कोटींची आवश्यकता!

**पुणे :** शहरातील वाहतुकीची कोंडी सुटण्यासाठी ‘मिसिंग लिंक’ जोडावी लागणार असून, ८०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यापैकी ५० टक्के निधी राज्य सरकारने द्यावा, यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे कोथरुडचे आमदार आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

कोथरूड विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न आणि शहरातील रस्त्याच्या मिसिंग लिंक संदर्भात चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी महापालिकेत बैठक घेतली. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह महापालिकेचे विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी तसेच भाजपचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना पाटील म्हणाले, ‘शहरात वाहतुकीचा प्रश्न गंभीर होत असून, वाहनांच्या संख्येतही वाढ होत आहे. यासाठी अर्धवट राहिलेल्या मिसिंग लिंकची कामे झाल्यास वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेला निधी महापालिकेला द्यावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.’


**MILITARY HOSPITAL, KHADKI**
**VENDOR REGISTRATION FOR LOCAL PURCHASE OF MEDICAL STORES FOR THE FINANCIAL YEAR 2025-26**

1. Military Hospital, Range Hills, Khadki Pune-411020 invites applications for creation of vendor database for local purchase of Medical Stores (Medicines, injectables, anaesthetic agents and narcotic drugs, surgical consumables and OT items, ENT hearing aids, ocular lenses, medical gases, orthopaedic implants for trauma, arthroscopic and arthroplasty surgeries, lab reagents, chemicals and sterilizing agents, sale of hypowaste) for local purchase. Financially sound and reliable vendors only are to apply. GeM registration is mandatory for sellers. Vendors who are already registered with this hospital are also required to renew registration, fill the application and submit the documents as mentioned in the application form.

2. Application form, eligibility criteria and terms & conditions are available on request from the MSPC at MH Khadki to be forwarded in a standard format (available in MSPC Cell at MH Khadki). For further details contact telephone No 29952773 & 2995771/e-mail dglpmhk@gmail.com.

3. Applications for registration along with supporting documents are to be forwarded to OIC MSPC, Military Hospital, Khadki by registered post/ courier so as to reach within **21 days** from the date of appearance of **advertisement** in news paper.

**Commandant**
**Military Hospital Khadki**
**Pune : 411020**


# पुण्यातील ‘जीबीएस’वरच आता लक्ष

## शीघ्र प्रतिसाद पथकाचा निर्वाळा; राज्यात इतरत्र रुग्णांची संख्या नेहमीएवढीच

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**पुणे :** ‘राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णसंख्येतील वाढ केवळ पुण्यापुरती मर्यादित आहे. पुण्यातही सिंहगड रस्ता परिसरातच या आजाराचा उद्रेक दिसून येत आहे. राज्यात इतरत्र जीबीएस रुग्णांची संख्या नेहमीएवढीच असून, त्यात वाढ झालेली नाही. यामुळे पुढील काळात पुण्यातील जीबीएस व्यवस्थापनावर अधिकाधिक भर देण्यात येणार आहे,’ असे शीघ्र प्रतिसाद पथकाने सोमवारी स्पष्ट केले.

पुण्यात जीबीएसचा उद्रेक झाल्यानंतर राज्याच्या आरोग्य विभागाने शीघ्र प्रतिसाद पथकाची स्थापना केली. या पथकाची बैठक सोमवारी झाली. या बैठकीत राज्यातील जीबीएसच्या रुग्णसंख्येचा आढावा घेण्यात आला. या वेळी पुणे वगळता राज्यात इतरत्र जीबीएस रुग्णसंख्येत गेल्या काही वर्षांच्या तुलनेत वाढ नोंदविण्यात आली नसल्याचे समोर आले. पुण्यातही केवळ सिंहगड रस्ता परिसरात रुग्णसंख्येत जास्त वाढ झाली आहे. त्यामुळे पुण्याबाहेरील रुग्ण आणि त्यांची तपासणी करण्याऐवजी पुण्यातील आजार व्यवस्थापनावर लक्ष देण्यावर बैठकीत भर देण्यात आला, अशी माहिती सूत्रांनी दिली.

राज्यात जीबीएसचे १६३ संशयित रुग्ण आढळले आहेत. त्यातील १२७ जणांचे जीबीएसचे निदान झाले आहे. त्यात पुणे महापालिकेच्या हद्दीतील ३२, महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील ८६, पिंपरी-चिंचवड महापालिका १८, पुणे ग्रामीण १९ आणि इतर जिल्ह्यांतील ८ रुग्ण आहेत. सध्या ४७ रुग्णांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, २१ जण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यात आतापर्यंत ४७ रुग्ण रुग्णालयातून बरे होऊन घरी गेले आहेत.

### पालिका रुग्णालयात फिजिओथेरपिस्ट

‘महापालिकेच्या मुरलीधर पांडुरंग लायगुडे रुग्णालयात रुग्णांवरील उपचारासाठी दोन फिजिओथेरपिस्ट नेमण्यात आले आहेत. जीबीएस रुग्ण बरे झाल्यानंतर त्यांना पायावर उभे राहून चालण्यास ३ ते ६ महिन्यांचा कालावधी लागतो. अशा रुग्णांना त्यांच्या पायावर लवकर उभे करण्यास फिजोओथेरपिस्ट महत्त्वाची भूमिका बजावितात. त्यामुळे महापालिकेने हा निर्णय घेतला आहे,’ अशी माहिती महापालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिली.


### जीबीएस रुग्णसंख्या

| वयोगट | रुग्ण |
|---|---|
| ० ते ९ | २४ |
| १० ते १९ | २२ |
| २० ते २९ | ३५ |
| ३० ते ३९ | २० |
| ४० ते ४९ | १८ |
| ५० ते ५९ | २५ |
| ६० ते ६९ | १४ |
| ७० ते ७९ | २ |
| ८० ते ८९ | ३ |
| एकूण | १६३ |








अधिक माहितीसाठी संपर्क : पुणे - ● हडपसर, धनकवडी, कोंढवा, पद्मावती : अमित कांबळे - ९१४५०७५६५ ● डेक्कन, स्टेशन, पेठ एरिया : प्रविण कदम - ९७६४१७३२७६ ● पिंपरी, चिंचवड, काळेवाडी, भोसरी, निगडी : सुधीर मराठे - ८३०८३६६८७१ ● कोथरूड, कर्वे नगर, वारजे, भुसारी कॉलनी : किशोर अमराळे - ९८८१६४२३२३ ● नळ स्टॉप, पानमळा, धायरी : संतोष लिंगायत - ९६८९८२४१७२ ● युनिर्व्हसिटी, बाणेर, सांगवी, बोपोडी : किरण पासलकर - ९०११०३००८३ ● स्वारगेट, क्वार्टरगेट, अरोरा टॉवर्स : अविनाथ शिंदे - ७७४१९८०१२८ ● येरवडा, चंदननगर, विश्रांतवाडी : संभाजी सोलगे - ९९२१६०७७२२ ● पुणे जिल्हा आणि सोलापूर : चंद्रकांत वाघ - ८३९०९०३०७९ ● सांगली आणि कोल्हापूर : संदीप गिरीगोसावी - ९६५७२५५२७७ ● सातारा : मकरंद भेडसगावकर - ९६५७३०९१६०.

## व्यापारयुद्धाचे भारतालाही हादरे

*(पान १ वरून)* रुपयांचा फटका बसला. दिवसअखेर मात्र या नुकसानीला आवर घालत निफ्टी निर्देशांक १२१.१० अंशांच्या नुकसानीने २३,३६१.०५ पातळीवर बंद झाला. तर सेन्सेक्स ३१९.२२ अंशांच्या तोट्यासह ७७,१८६.७४ वर स्थिरावला. दुसरीकडे जागतिक प्रतिकूलतेपायी रुपया सोमवारच्या सत्रात तब्बल ०.७ टक्के अर्थात ५५ पैशांनी गडगडून प्रति डॉलर ८७.२८ या विक्रमी नीचांकावर ढासळला. रुपयातील तीव्र घसरण पाहता, भारतीय बाजारांकडे पाठ करून माघारी परतत असलेले परकीय गुंतवणूकदार पुन्हा लवकर परततील ही आशा धूसर होत चालली आहे. रुपयातील घसरण सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेचा हस्तक्षेपही ढळत चालल्याने चलन बाजारातील नकारात्मकता वाढीला लागल्याचे चित्र आहे.

### जगभरातील बाजारांत थरकाप

आशियाई बाजारांमध्ये कोस्पी (कोरिया) २.५ टक्के, निक्केई २२५ (जपान) ७ टक्के आणि हँगसेंग (हाँगकाँग) ०.1 टक्के या प्रमुख बाजारांमध्ये घसरणीचे पडसाद उमटले. चीनच्या बाजारांत सार्वजनिक सुट्टीमुळे सोमवारी व्यवहार झाले नाहीत. दुपारनंतर खुले झालेल्या युरोपीय बाजारांनीही मोठ्या घसरगुंडीचा प्रत्यय दिला. फ्रान्सचा ‘कॅक’ ४०, जर्मनीचा ‘डॅक्स’ आणि ब्रिटनचा“फुट्सी १००’ या प्रमुख निर्देशांकांत जवळपास दीड टक्क्यांच्या आपटीने प्रारंभिक व्यवहार सुरू झाले. अमेरिकेतील शेअर बाजारही घसरले. सोमवारी वॉल स्ट्रीटवरील व्यवहारप्रमुख निर्देशांकांतील २ टक्क्यांच्या आपटीनेच सुरू झाले. शुक्रवारी ‘एस ॲण्ड पी ५००’मध्ये ४ टक्के घसरण झाली, जी मागील चार महिन्यांतील सर्वांत अधिक आहे.

# युरोपीय महासंघावरही आयातशुल्क?

## ट्रम्प यांचा इशारा; ‘ईयू’चे सबुरीचे धोरण

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, ब्रसेल्स**

**मेक्सिको, कॅनडा** आणि चीनवर आयातशुल्क लागू करण्याच्या निर्णयानंतर, युरोपीय महासंघावरही (ईयू) आयातशुल्क लादले जाईल असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी सूचित केले. फ्लोरिडा येथे एका कार्यक्रमात त्यांनी ‘ईयू’ला तसा इशारा दिला. मात्र, हे आयातशुल्क कधी लादणार ते ट्रम्प यांनी स्पष्ट केले नाही. दुसरीकडे, अशा कोणत्याही निर्णयाविरोधात लढा दिला जाईल असे उत्तर युरोपच्या नेत्यांनी सोमवारी दिले.

अमेरिका हा ‘ईयू’चा सर्वात मोठा व्यापार आणि गुंतवणूक भागीदार आहे. अमेरिका ‘ईयू’ला जितका माल निर्यात करते त्यापेक्षा जास्त माल सातत्याने आयात करत आहे. ‘युरोस्टॅट’ डेटानुसार, २०२३मध्ये अमेरिका आणि ‘ईयू’दरम्यानची व्यापारी तूट १६१.६ अब्ज डॉलर इतकी होती. मात्र, सेवा क्षेत्रात अमेरिकेची ‘ईयू’ला होणारी निर्यात अधिक असून ती जवळपास १०६.८८ अब्ज डॉलर इतकी आहे.

फ्लोरिडा येथे एका कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, ‘‘युरोपीय देश आपल्या कार विकत घेत नाहीत, ते आपली कृषी उत्पादने घेत नाहीत. ते आपल्याकडून काहीही घेत नाहीत आणि आपण त्यांच्याकडून प्रत्येक गोष्ट विकत घेतो.’’

ट्रम्प यांच्या धमकीनंतर, अशा कोणत्याही निर्णयाविरोधात युरोप लढा देईल असे ‘ईयू’च्या नेत्यांनी सांगितले. गरज पडली तर आम्हीही अमेरिकेवर आयातशुल्क लादू, पण दोन्ही बाजूंची व्यापारावर काही सहमती झाली तर ते अधिक चांगले असेल अशी प्रतिक्रिया जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शोल्झ यांनी व्यक्त केली. जर्मनी ‘ईयू’ची सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून ते मोठ्या प्रमाणात निर्यातीवर अवलंबून आहेत. अमेरिका व ‘ईयू’दरम्यान व्यापारयुद्ध सुरू झाल्यास दोन्ही बाजूंचे नुकसान होऊन केवळ चीनचा फायदा होईल असा इशारा ‘ईयू’च्या परराष्ट्र धोरण प्रमुख काजा कल्लास यांनी दिला.



ईयूच्या अनौपचारिक बैठकीसाठी उपस्थित असलेले युरोपीय परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ

### अमेरिकेला प्रत्युत्तर देण्याचा इशारा

तैपेई : चीनचे वैध हक्क आणि हितसंबंध यांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ते प्रतिउपाय केले जातील असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी जाहीर केले. नेमकी कोणती उपाययोजना केली जाईल हे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केलेले नाही. मात्र, अमेरिकेने आपले चुकीचे निर्णय मागे घ्यावेत आणि अंमली पदार्थांविरोधातील सहकार्य यापुढेही सुरू ठेवावे असे आवाहन चीनकडून करण्यात आले.

युरोपीय महासंघाच्या आर्थिक हितसंबंधांवर हल्ला केला तर, आम्ही स्वतःचा मान राखू आणि त्याप्रमाणे उत्तर देऊ. अमेरिकेच्या या पवित्र्याने युरोप अधिक मजबूत होईल आणि आमचे ऐक्य वृद्धिंगत होईल.

**- इमॅन्युएल मॅक्राँ,** अध्यक्ष, फ्रान्स

### दक्षिण आफ्रिकेच्या मदतीत कपात

केप टाऊन : दक्षिण आफ्रिकेमध्ये नवीन जमीन अधिग्रहण कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान मोठ्या प्रमाणात मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. त्या देशाची मदत थांबवण्याचे आणि त्यांच्या धोरणांची चौकशी करण्याचे त्यांनी जाहीर केले.

### निर्णयाचे पडसाद

- जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याच्या निर्णयावर अमेरिकेने फेरविचार करावा यासाठी जागतिक नेत्यांनी त्यांच्यावर दबाव आणावा असे ‘डब्ल्यूएचओ’च्या प्रमुखांचे आवाहन
- आंतरराष्ट्रीय विकासासाठी कार्यरत असलेला ‘यूएसएड’ विभाग बंद करण्याचे ट्रम्प यांनी मान्य केल्याचे एलॉन मस्क यांची माहिती
- एलॉन मस्क प्रमुख असलेल्या ‘डिपार्टमेंट ऑफ गव्हर्नमेंट एफिशियन्सी’च्या सदस्यांना गोपनीय माहिती प्राप्त

# राहुल गांधी यांची फटकेबाजी


## लोकसभेत विविध मुद्द्यांवरून सरकारवर टीका; सत्ताधारी खासदार संतप्त

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे नवनियुक्त अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींची निमंत्रणाअभावी गैरहजेरी, चीनने लडाखमध्ये बळकावलेला कथित भूभाग, ‘मेक इन इंडिया’चे अपयश, सरसंघचालकांचे स्वातंत्र्यासंदर्भातील वादग्रस्त विधान, भाजपमधील ओबीसी खासदारांची कोंडी अशा तमाम मुद्द्यांवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी सोमवारी सभागृहात केंद्र सरकारला चहुबाजूंनी घेरले.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभाराच्या चर्चेदरम्यान बोलताना राहुल गांधी चौफेर फटकेबाजी करत असताना, पंतप्रधान मोदी सभागृहात हजर होते. त्यामुळे सत्ताधारी सदस्य कमालीचे अस्वस्थ झाले होते.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे मोदींच्या वतीने मध्यस्थी करण्यासाठी गेले होते, असा आरोप राहुल गांधींनी केला. मात्र, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनीही ‘एक्स’वरून राहुल यांचा आरोप फेटाळला.



आपण आर्थिकदृष्ट्या सक्षम असतो तर, मोदींना आमंत्रण मिळावे यासाठी केंद्र सरकारला जयशंकर यांना अमेरिकेला पाठवावे लागले नसते. उलट, अमेरिकेच्या अध्यक्षांनीच भारतात येऊन मोदींना शपथविधी सोहळ्याचे आमंत्रण दिले असते.

**- राहुल गांधी,** विरोधी पक्षनेता, लोकसभा

राहुल गांधी खोटे दावे करून जगभरात भारताची प्रतिमा मलिन करत आहेत. २०२४मधील अमेरिकेतील दौऱ्यामध्ये मोदींच्या आमंत्रणासंदर्भात कोणतीही चर्चा झाली नाही. मोदी अशा कार्यक्रमांना उपस्थित राहात नाहीत हे सर्वांना माहिती आहे.

**- एस जयशंकर,** परराष्ट्रमंत्री

### भाजपमधील ओबीसींची कोंडी!

भाजपमध्येही ओबीसी खासदार आहेत पण, त्यांना बोलण्याची मुभा नाही. भाजपच्या राज्यामध्ये ओबीसींना संधी मिळत नाही असा आरोप राहुल यांनी केला. त्यावर, ‘पंतप्रधान स्वतः ओबीसी असून तुम्हाला ते दिसत नाहीत का’, असा प्रतिसवाल भाजपच्या सदस्यांनी केला. संविधानाच्या मुद्द्यावरून राहुल गांधींनी सरसंघचालक मोहन भागवत यांच्यावरही टीका केली.

### खरगेंच्या विधानामुळे गदारोळ



महाकुंभमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत हजारो भाविकांचा बळी गेल्याचा दावा राज्यसभेतील विरोधीपक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी सभागृहात केला. या वादग्रस्त विधानावर सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी आक्षेप घेत सभागृहात प्रचंड गदारोळ केला. सभापती जगदीप धनखड यांनी खरगेंना त्यांचे विधान मागे घेण्याची विनंती केली. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेतील भाषणामध्ये खरगेंनी कुंभमेळ्यातील मृतांचा आकडा केंद्र सरकार लपवत असल्याचा अप्रत्यक्ष आरोप केला. या चेंगराचेंगरीमध्ये हजारो लोकांचा मृत्यू झाला असावा असा माझा अंदाज आहे. माझे म्हणणे चुकीचे असेल तर केंद्र सरकारने मृतांचा नेमका आकडा प्रसिद्ध करावा असे खरगे म्हणाले. “विरोधी पक्षनेत्यांनी हजारोंचा आकडा दिला आहे. तुम्ही सभागृहात जे बोलता ते अत्यंत महत्त्वाचे असते. तुमच्या बोलण्याने सर्वांना धक्का बसला आहे,” असे सभापती धनखड म्हणाले.

# राज्याच्या निकालाचे संसदेत पडसाद

*(पान १ वरून)*

निवडणुकीच्या मुद्द्यावरून राहुल गांधी केंद्रीय निवडणूक आयोगावर शरसंधान साधत असताना लोकसभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीही उपस्थित होते. निवडणुकीचे निकाल भाजपसाठी अडचणी असल्याचे सूचित करत, ‘बघा, पंतप्रधान मोदी माझ्याकडे बघतदेखील नाहीत’, असा टोमणा राहुल गांधींनी लगावला. या टिप्पणीवर सभागृहात भाजपचे सदस्य आक्रमक झाले.

**निवडणूक आयोगावर टीका**

राज्यात अचानक इतके मतदार कसे वाढले, याची शहानिशा करण्यासाठी आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मतदारांची नावे, पत्ता आणि मतदान केंद्र याची माहिती मागितली होती. काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) व राष्ट्रवादी (शरद पवार) गट हे ‘इंडिया’ आघाडीतील घटक पक्ष ही माहिती तपासून पाहतील, असे सांगितले होते. मात्र, आयोग आम्हाला माहिती देणार नाही याची खात्री असल्याची उपहासात्मक टिप्पणी गांधी यांनी केली.

**आयुक्त निवडीवर सवाल**

केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या निवडीमध्ये केंद्र सरकार मनमानी करत असल्यामुळे मतदानाची तारीख बदलली जाते, निवडणुका लांबणीवर टाकल्या जातात, असा आरोप राहुल गांधींनी केला. ‘‘आधी निवड समितीच्या सदस्यांमध्ये सरन्यायाधीशांचा समावेश होता. मात्र सरकारने सरन्यायाधीशांना काढून टाकले. आता पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि विरोधी पक्षनेता म्हणून मी असे समितीमध्ये आहोत. मोदी आणि शहा बहुमताने निर्णय घेणार आणि मला त्यांचा निर्णय मान्य करावा लागणार. सरन्यायाधीश सदस्य असते तर समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली असती. आता मी या समितीच्या बैठकीला कशासाठी जायचे हा मला प्रश्न पडला आहे,’’ असे ते म्हणाले.

# ‘वर्षवेध’चे आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

*(पान १ वरून)* दशकभरापासून ‘लोकसत्ता’च्या माध्यमातून ‘वर्षवेध’ पुस्तकाचा उपक्रम राबविला जातो. पहिल्या वर्षापासूनच प्रचंड प्रतिसादामुळे या पुस्तकाचे अनेक वेळा पुनर्मुद्रण केले जाते. वर्षातील प्रत्येक महत्त्वपूर्ण गोष्टीची इत्थंभूत खबरबात या अंकामध्ये सापडेल.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण...**

अमेरिकी आणि भारतीय निवडणूक, पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे आत्तापर्यंतचे सर्वात उष्ण ठरलेले वर्ष, वाळवंटात पडलेला मुसळधार पाऊस, आखाती देशातील पूर आदींचे सचित्र तपशील अंकात आहेत. आंतरराष्ट्रीय घडामोडींसह राष्ट्रीय व राज्य पातळीवरील संपूर्ण वर्षभरातील महत्त्वपूर्ण घटना यात अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

**खास आकर्षण..**

अशक्य स्थितीतून अमेरिकेच्या अध्यक्षपदावर पुन्हा विराजमान झालेले डोनाल्ड ट्रम्प आणि राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर पुन्हा आलेले देवेन्द्र फडणवीस, पर्यावरणाच्या कामासाठी जागतिक सन्मान मिळविणारे माधव गाडगीळ, बुद्धिबळात अगदी लहान वयात जगज्जेता बनलेला गुकेश, जागतिक चित्रपट विश्व गाजवणारी भारतीय दिग्दर्शिका पायल कपाडिया हे २०२४ सालाचे खरेखुरे मानकरी. मान्यवर लेखकांनी त्यांचा घेतलेला वेध यंदा ‘वर्षवेध’चे खास आकर्षण असेल.

# शिर्डीत साई संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांची हत्या

*(पान १ वरून)* जखमी वृद्धाचे नाव आहे. सुभाष व नितीन पहाटे साई संस्थानमध्ये कामावर जात असताना त्यांची दुचाकी अनोळखी तरुणांनी अडवून त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी झाले. वेळेवर मदत न मिळाल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाल्याचे समजते. तर कृष्णा देहरकर हे वयोवृद्ध आपल्या मुलाला शिर्डीतील बस स्थानकावर पोहचवून परतताना शिर्डी-साकुरी शिवारात त्याच अनोळखींनी धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने लोणी येथील प्रवरा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मोटारसायकलवरील तरुणांनी चोरीच्या उद्देशाने या तिघांना वेगवेगळ्या वेळेत अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली. हल्ल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. पोलिसांनी किरण सदाफुले याला संशयावरून ताब्यात घेतले आहे तर राजू माळी हा दुसरा संशयित तरुण आहे. पोलिसांनी विविध पथक तैनात करून त्याचा शोध सुरू केला आहे. साकुरी-राहाता रस्त्यावर अनोळखी व्यक्तींनी लुटमार करण्याच्या उद्देशाने धारदार हत्याराने दोघांची हत्या केली. याबाबत गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे असे राहात्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांनी सांगितले.

# दिल्लीमधील प्रचार समाप्त

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सोमवारी सांगता झाली. प्रचाराच्या अखेरच्या दिवशी आप, भाजप व काँग्रेसच्या नेत्यांनी जाहीर सभा, रोड-शो, पदयात्रा, नुक्कड सभा, बाइक रॅली अशा विविध मार्गांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी धावपळ केली.

दिल्लीतील ७० जागांसाठी बुधवारी ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. आपचे सर्वेसर्वा व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी महिला मतदारांना मते देण्याचे आवाहन केले. ‘‘माझ्या अंदाजानुसार, आम आदमी पक्षाला ५५ जागा मिळतील पण महिलांनी आणखी प्रयत्न केले तर जास्त जागा मिळवू शकते,’’ असे ते म्हणाले.

केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, जे. पी. नड्डा यांच्यासह भाजपच्या तमाम नेत्यांनी घरोघरी जाऊन प्रचार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आप सरकारच्या शैक्षणिक धोरणावर टीका केली. अमित शहांनी जंगपुरा मतदारसंघामध्ये माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या विरोधात मतदान करण्याचे आवाहन केले. काँग्रेसचे नेते राहुल गांधी व प्रियंका गांधी-वढेरा यांच्याही वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये प्रचारसभा झाल्या.



**तिरंगी लढत**

दिल्लीमध्ये दीड कोटी मतदार असून २०२४ मध्ये आपला ६२ जागा मिळाल्या होत्या. यावेळी मात्र आप, भाजप व काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होत आहे. आपने भाजपला गालीगलोच पार्टी, भारतीय झुठी पार्टी असल्याची दूषणे दिली तर भाजपने केजरीवालांना घोषणामंत्री म्हटले. मोदींनी आप म्हणजे आपदा असल्याची टीका केली.

# परवानगीशिवाय वनक्षेत्र कमी करू नका!

## सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र आणि राज्य सरकारांना आदेश

**पीटीआय, नवी दिल्ली**

**परवानगीशिवाय वनक्षेत्र** कमी करणारी कोणतीही पावले उचलू नयेत, असे स्पष्ट आदेश सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना दिले. न्या. भूषण रा. गवई आणि न्या. कृष्णन विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर २०२३च्या वन संरक्षण कायद्यातील सुधारणांविरोधात दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी सुरू असताना, न्यायालयाने हे आदेश दिले.

खंडपीठाने सांगितले की, ‘‘वनक्षेत्र कमी होईल, अशा कोणत्याही गोष्टींना आम्ही परवानगी देणार नाही. पुढील आदेश येईपर्यंत, भरपाईची जमीन उपलब्ध करून दिल्याशिवाय केंद्र आणि कोणत्याही राज्याकडून वनजमिनी कमी होण्यास कारणीभूत ठरणारी पावले उचलली जाणार नाहीत, असे आदेश आम्ही देतो.’’ त्यावर केंद्र सरकारतर्फे हजर असलेल्या अतिरिक्त महान्यायअभिकर्ता ऐश्वर्या भाटी यांनी याप्रकरणी दाखल केलेल्या अर्जांना तीन आठवड्यांत उत्तर देणार असल्याचे खंडपीठाला सांगितले. तसेच पुढील सुनावणीपूर्वी स्थितीजन्य अहवाल न्यायालयासमोर सादर केला जाईल, असेही त्या म्हणाल्या.

दरम्यान, युक्तिवाद पूर्ण झाला असून, याचिकांमध्ये उपस्थित केलेला मुद्दा वन संरक्षण कायदा २०२३ च्या दुरुस्तीशी संबंधित असल्याचे खटल्यावेळी उपस्थित वकिलाने सांगितले. पुढील सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे.

### यापूर्वीच्या सुनावणीत काय?



- गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने २०२३ च्या संवर्धन कायद्याअंतर्गत जंगलाच्या व्याख्येनुसार सुमारे १.९९ लाख चौरस किलोमीटर वनजमीन ‘वन’ कक्षेतून वगळून ती इतर कारणांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्याची दखल घेतली होती.
- प्राणिसंग्रहालय किंवा जंगल सफारी सुरू करण्याच्या कोणत्याही प्रस्तावाला सर्वोच्च न्यायालयाची मंजुरी आवश्यक असेल, असे खंडपीठाने म्हटले होते. त्यानंतर ३१ मार्च २०२४पर्यंत राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील वनजमिनींचा तपशील केंद्राला देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते.
- पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी दिलेल्या जंगल क्षेत्र, अवर्गीकृत वनजमीन आणि सामुदायिक वन जमीन आदींचे सर्व तपशील आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले होते.

# करोनानंतर अमेरिकेत तरुणांच्या मृत्यूदरात वाढ

**पीटीआय, नवी दिल्ली**

**अमेरिकी तरुणांमध्ये** ‘कोविड-१९’नंतरच्या काळात तरुण व्यक्तींचा मृत्यूदर अपेक्षेपेक्षा अधिक असल्याचे एका संशोधनात आढळले आहे. ‘जर्नल ऑफ द अमेरिकन मेडिकल असोसिएशनने (जेएएमए) नेटवर्क ओपन’मध्ये यासंबंधीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. या संशोधकांनी १९९९ ते २०२३ या कालावधी मरण पावलेल्या २५ ते ४४ या वयोगटातील ३३ लाख व्यक्तींच्या मृत्यूचे विश्लेषण करून हा निष्कर्ष काढला आहे.

तरुणांचा मृत्यूदर वाढला असतानाच त्यांच्या मृत्यूची कारणे एकमेकांपासून बरीच भिन्न आहेत. त्यामध्ये अमली पदार्थ व मद्यामुळे ओढवणारे मृत्यू, हृदयविकार, मधुमेह, साखरेचे वाढलेले प्रमाण, पक्षघात, उच्च रक्तदाब, अतिचरबी यासारख्या विविध कारणांबरोबरच वाढत्या अपघाती मृत्यूंचाही समावेश आहे. त्यामुळे करोना महासाथीच्या सध्या होत असलेल्या परिणामांवर अधिक संशोधन करण्याची गरज असल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. अमेरिकेतील ‘युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटा’च्या संशोधकांनी या अभ्यासात सहभाग घेतला. करोना महासाथीदरम्यान तरुणांचा मृत्यूदर मोठ्या प्रमाणात वाढला होता आणि महासाथीनंतरही तो अपेक्षेपेक्षा जास्त राहिला आहे असे संशोधकांना अभ्यासात आढळले. याचा परिणाम लोकसांख्यिकीवर होण्याची शक्यता आहे असे संशोधकांनी नमूद केले.

तरुणांमधील मृत्यूदर कमी करण्यासाठी त्यांना अधिकाधिक पोषक आहार उपलब्ध करून देणे, सामाजिक सेवा योजना अधिक बळकट करणे आणि सार्वजनिक जीवनावर परिणाम करणाऱ्या उद्योगांचे अधिक नियमन करणे असे काही उपाय अभ्यासकांनी सुचवले आहेत.

अमेरिकेत २०१०च्या सुमाराला तरुणांचा मृत्यूदर कमी व्हायला लागला होता, तो करोनापश्चात वाढला आहे. महासाथीपूर्वीच्या एका दशकभराची तुलना करता, २०२३ या वर्षात २५ ते ४४ या वयोगटातील मरण पावलेल्या तरुणांची संख्या तब्बल ७० टक्क्यांनी वाढल्याचे संशोधन अभ्यासात म्हटले आहे. त्यातही २०२३ची आकडेवारी २०१०च्या आकडेवारीपेक्षा २० टक्क्यांनी जास्त आहे. जगभरात करोना महासाथीला २०१९च्या अखेरीस सुरुवात झाली होती.

**करोनानंतर तरुणांचा मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे अमेरिकी संशोधकांना आढळले आहे. लोकांवर करोनाचे सध्या कोणते परिणाम होत आहेत यावर अधिक संशोधनाची गरज असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे.**

### अचानक मृत्यूंचे वाढते प्रमाण



भारतामध्येही गेल्या काही वर्षांमध्ये तरुणांमध्ये अचानक मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. जिम्नॅशियममध्ये व्यायाम करताना, खेळ खेळताना हृदयविकाराच्या धक्क्याने तरुण मरण पावण्याच्या घटना वाढत आहेत. त्यामध्ये निरोगी आणि स्वस्थ असलेल्या तरुणांचा समावेश दिसत असून त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

तरुणांमध्ये विविध कारणांमुळे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढण्याची आम्हाला अपेक्षा नव्हती. ही कारणे अगदी वेगवेगळी आहेत. त्यामुळे ही पटकन उपाय सापडेल अशी साधी समस्या नाही, तर त्याचे स्वरूप अधिक व्यापक आहे.

**- एलिझाबेथ रिग्ले-फिल्ड,** संशोधक, ‘युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटा’

## जनगणना आणखी लांबणीवर?

*(पान १ वरून)*

झालेल्या अर्थसंकल्पात २०२५-२६ या वर्षाकरिता जनगणनेसाठी फक्त ५७५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. जनगणना लांबल्याने विविध योजनांच्या विस्तारीकरणालाही खीळ बसली आहे. २०२६ मध्ये मतदारसंघांची पुनर्रचना अपेक्षित आहे. लोकसभा व राज्यांच्या विधानसभा मतदारसंघांची संख्या वाढविण्यात येणार आहे. मात्र जनगणना लांबणीवर पडल्यास मतदारसंघांची पुनर्रचनाही पुढे जाऊ शकते. जातनिहाय जनगणना करावी अशी मागणी काँग्रेससह विविध राजकीय पक्षांनी केली आहे. भाजपने आधी जातनिहाय जनगणनेला विरोध केला होता. मात्र आता याबाबत सावध भूमिका घेतली जात आहे.

# टोमॅटो, कोबीच्या दरांत घसरण

*(पान १ वरून)*

घसरण होऊन, घाऊक बाजारात प्रतवारीनुसार एक किलो कोबीला सहा ते आठ रुपये भाव मिळात आहे. किरकोळ बाजारात हाच दर २० ते २५ रुपये इतका असल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

उत्पादन, तसेच वाहतूक खर्च न मिळाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. दोन महिन्यांपूर्वी कोबीला घाऊक बाजारात प्रतवारीनुसार २० ते २५ रुपये किलो भाव मिळाला होता. चांगले भाव मिळाल्याने पुणे, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सातारा, तसेच नाशिक विभागातील शेतकऱ्यांनी कोबीची मोठ्या प्रमाणावर लागवड केली होती. दरम्यान, राज्यात कोबीला भाव मिळत नसल्याने परराज्यांतील शेतकऱ्यांकडून होणारी कोबीची आवक येत्या काही दिवसांत कमी होण्याची शक्यता आहे.

टोमॅटोला किरकोळ बाजारात १० ते १५ रुपये दर

लातूर : दोन महिन्यांपूर्वी किलोला शंभरी गाठलेल्या टोमॅटोचे दर ठोक बाजारात पाच रुपयांवर आले आहेत. किरकोळ बाजारपेठेत हा दर १० ते १५ रुपये इतका आहे. दक्षिणेत बंगळुरू, महाराष्ट्रात लातूर, सांगली, पुणे परिसरात, गुजरात प्रांतात व अगदी श्रीनगरमध्येही टोमॅटोचे पीक घेतले जाते. वातावरण बदलामुळे कुठे फटका बसला की भाव चढतात व आवक वाढली आणि बाजारपेठेत माल अधिक आला तर भाव पडतात. सध्या दर घसरल्याने टोमॅटोचे काय करावे, असा शेतकऱ्यांसमोर प्रश्न निर्माण झाला आहे.

# नियमित व्यायाम कर्करोगग्रस्तांसाठी फलदायी

आरोग्य वार्ता

**मुंबई :** निरोगी जीवनशैली आणि योग्य व्यायामामुळे केवळ कर्करोगाचा धोका कमी होत नाही, तर संपूर्ण जीवनमान सुधारते. वैद्यकीय सल्ल्यानुसार नियमित व्यायाम केल्यास कर्करोगग्रस्त रुग्णांचे जीवन अधिक आनंदी आणि निरोगी होऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

संशोधनानुसार, निरोगी फुप्फुसे आणि मजबूत स्नायू असलेल्या रुग्णांचा मृत्यू धोका ११ टक्क्यांनी कमी होतो. 'एचसीजी' कॅन्सर हॉस्पिटल, बोरिवली येथील कन्सल्टंट मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. दर्शना राणे यांनी सांगितले की, फुप्फुस आणि स्नायू निरोगी ठेवल्यास कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येते.

नियमित व्यायाम, जिने चढणे, वेगाने चालणे यामुळे ३१-४६ टक्क्यांपर्यंत मृत्यूदर कमी होतो. तसेच, दररोज फक्त तीन ते चार मिनिटे व्यायाम केल्यास कर्करोगाचा धोका २० टक्के आणि कमी शारीरिक हालचालींमुळे होणाऱ्या कर्करोगाचा धोका ३१ टक्क्यांनी कमी होतो. स्नायू-मजबुतीकरण व्यायाम स्तनाचा कर्करोग, कोलन कर्करोग आणि फुप्फुसाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो, असे संशोधनानुसार स्पष्ट झाले आहे.

केमोथेरपी किंवा रेडिएशन घेत असलेल्या रुग्णांसाठी व्यायामामुळे शारीरिक थकवा आणि इच्छाशक्ती कमी होण्याचा त्रास टाळता येतो. व्हीओ-२ मॅक्स चाचण्या किंवा चालण्याच्या चाचण्यांमधून मिळालेल्या उच्चस्तराच्या कार्डिओ फिटनेसमुळे फुप्फुसाचा कर्करोग असलेल्या रुग्णांना ४६ टक्के संरक्षण मिळते, असे अभ्यासक सांगतात.

कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!
स्मॉल बिझनेस लोन
किफायतशीर व्याजदर 9%*
₹ १ कोटीपर्यंत कर्ज उपलब्ध*
प्रोसेसिंग चार्जेस नाहीत.*
Toll Free No.: 1800 233 0234
*अटी लागू (ROI p.a.)

# 'नामदेव शास्त्रींनी माफी मागावी'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'भगवानगडाचे महंत ह. भ. प. नामदेव महाराज शास्त्री यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरण, खंडणी आणि वाल्मीक कराड गँगशी संबंध यावरून अडचणीत आलेले मंत्री धनंजय मुंडे यांची पाठराखण करणारी भूमिका मांडली असून, ही बाब सगळ्या वारकरी संप्रदायासाठी लाजिरवाणी आहे. त्यांनी याबाबत लवकरात लवकर वारकरी संप्रदायाची माफी न मागितल्यास राज्यभरात आंदोलन करू,' असा इशारा राष्ट्रवादी (शरद पवार) वारकरी आघाडीचे राज्यप्रमुख हभप विठ्ठल आबा मोरे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिला.

'संतोष देशमुख यांची हत्या ज्यांनी केली त्यांची मानसिकता अशी का बनली हे देखील पाहिले पाहिजे, असे विधान नामदेव शास्त्री यांनी केले होते. त्यावरून शास्त्री हत्येचे समर्थन करतात का? दोन समाजांना समोरासमोर लढा, असे सांगणे भगवानगडाच्या महंताला शोभते का,' असा सवाल मोरे यांनी उपस्थित केला.




# अनधिकृत संस्थांवर कारवाई करा

## राज्य महिला आयोगाच्या सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** 'बाहेरगावहून येऊन आळंदीत अनधिकृत वारकरी शिक्षण संस्था चालविल्या जात आहेत. वसतिगृहासाठी समाजकल्याण व बालविकास खात्याची परवानगी घेतली जात नाही. संस्थांची धर्मादाय आयुक्तालयाच्या माध्यमातून महिला व बालविकास विभागाकडे नोंदणी झालेली नाही. ज्या संस्थांना धर्मादाय आयुक्तांची परवानगी आहे. परंतु, नियमावलीचे पालन केले जात नाही, अशा संस्थांवर दोन दिवसांत कारवाई करून अहवाल पाठवावा,' अशी सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी केली.

आळंदी परिसरातील एका अनधिकृत वसतिगृहात अनैसर्गिक लैंगिक शोषण झाल्याबाबत आळंदीकर ग्रामस्थांनी महिला आयोगाकडे तक्रार केली होती. त्यानंतर चाकणकर यांनी सोमवारी आळंदीत ग्रामस्थ, पोलीस अधिकारी, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, उपविभागीय अधिकारी अनिल धोंडे, आयोगाच्या सदस्या नंदिनी आवडे, बालहक्क संरक्षण आयोगाच्या जयश्री पालवे, डी. डी. भोसले या वेळी उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या, 'वारकरी शिक्षण संस्था या नावाने अल्पवयीन शालेय विद्यार्थ्यांकडून वार्षिक शुल्क घेऊन उत्पन्नाचे साधन म्हणून व्यावसायिक तत्त्वावर अनधिकृत वसतिगृहं चालविली जातात. शासनाच्या निकषांचे पालन केले जात नाही. अनेक संस्थांमध्ये भोजन व्यवस्था नाही, स्वयंपाकगृह नाही, स्वच्छ पाणी नाही, प्रतिविद्यार्थी निवासी जागेची व्यवस्था नाही,

शौचालये नाहीत, सुरक्षितता नाही. मिरवणुकीसाठी पैसे घेऊन भाडेतत्त्वावर मुले दिली जातात. पैसे घेऊन मुलांना तासन् तास कीर्तनासाठी उभे केले जाते. भोजनाचा खर्च वाचविण्यासाठी वारकरी वेश परिधान करून विद्यार्थ्यांना लग्न, सप्ताहाच्या पंगतीत पाठविले जाते. अत्याचाराची प्रकरणे आपसांत मिटवली जातात. वसतिगृहासाठी समाजकल्याण व बालविकास खात्याची परवानगी घेतली जात नाही, अशा तक्रारी आहेत. अनधिकृत वारकरी शिक्षण संस्थांवर कारवाईसाठी समाजकल्याण व बालविकास खात्याला दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे.'

ADVERTORIAL




असं म्हणतात की कर्करोग हा एक आजार नसून अनेक विकारांचा आणि अगणित समस्यांचा संच आहे. प्रत्येक कर्करोगाचा रुग्ण, त्याच्या आजाराचं, एका किंवा अनेक समाविष्ट अवयवांचं, बिघाड झालेल्या पेशींमधील जनुकांचं, कर्करोग निर्माण करणाऱ्या कारणांचं आणि आजाराशी लढत असताना रुग्णाच्या सभोवतालच्या परिस्थितीचं वैशिष्ट्यपूर्ण मात्र अद्वितीय किंवा दुर्मिळ असं स्वरुप राखून असतो. म्हणुनच कदाचित 'एव्हरी कॅन्सर इज यूनीक' असं म्हटलं जातं.

अशा असंख्य कर्करोगींच्या असंख्य समस्यांना एकत्रितपणे सामोरं जाणं, प्रत्येकाच्या वेगळ्या अनुभवातून दुसऱ्या रुग्णाने काहीतरी बोध घेऊन आपल्या विशिष्ठ समस्यांवर तोडगा शोधणं, डॉक्टर्स, इतर वैद्यकीय वा अवैद्यकिय सहकारी, मित्रपरिवार सर्वांनी एकमेकांना सहाय्य करीत कर्करोगाला मात देण्याचा निश्चय करणं या भावनेतून या वर्षी जागतिक कर्करोग दिनाची संकल्पना 'यूनाइटेड बाय यूनीक' अशी मांडण्यात आलेली आहे.

कर्करोगाने दुखावलेले, खचलेले, त्याला भिडलेले, त्यातुन सावरलेले आणि बचावलेले किंवा काही वेळा त्याच्यापुढे हात टेकलेले असे अनेक चांगले वाईट अनुभव गाठीशी बांधुन समाजातील प्रत्येक स्तरात या आजाराबद्दल समज व जागरुकता निर्माण करणं; कर्करोगाचे लवकरच्या टप्प्यात निदान आणि प्रतिबंध होण्यासाठी प्रयत्नशील असणं, तसेच रूग्णांना आणि त्यांच्या कुटुंबियांना जमेल तशी, जमेल त्या स्वरूपाची मदत करणं याकरता पुढील प्रत्येकाने आपले मोलाचे योगदान द्यायला हवे.

**रुग्ण आणि सर्वायावर:**

- तुमचा प्रवास इतरांना प्रेरणादायी आणि दिशादायी ठरू शकतो. त्यामुळे शक्य तितक्या लोकांना मोकळेपणे आपले अनुभव सांगा. तुमच्या अनुभवांमधून समाजात अधिक सकारात्मक दृष्टिकोन तयार होऊ शकतो.

**परिचारक आणि कुटुंबिय:**

- तुमचे प्रेम आणि सहकार्य हे रुग्णांसाठी खूप महत्त्वाचे असते. त्यांना मानसिक आणि भावनिक आधार द्या, कारण तुमची उपस्थिती त्यांच्यासाठी मोठा आधार असते.

**सामाजिक, आरोग्यविषयक आणि धर्मादाय संस्था:**

- आपण समाजात कर्करोगाबद्दल जनजागृती करून लोकांना सावध करणं, त्यांना स्क्रीनिंगमार्फत लवकर निदान आणि प्रतिबंध तसेच बचाव करण्यासाठी प्रवृत्त करणं हेदेखील महत्त्वाचं आहे.
- आपण पात्र रूग्णांना शक्य तितकी आर्थिक आणि इतर मदत दिल्यास त्यांना उपचार पूर्ण करण्यास येणार अडथळे दूर होतील.

**सरकारी संस्था:**

आपण कर्करोग निदान आणि उपचारसुविधा अधिकाधिक प्रमाणात, शहरी तसेच दुर्गम परिसरात आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध केल्यास त्याचा समाजाला कॅन्सर विरुद्धच्या लढाईत उपयोग होऊ शकतो.

वैश्विक परिस्थितीचा अभ्यास करता असं लक्षात येतं की भारतातील कर्करोगासंबंधीचे प्रश्न अधिक जटिल स्वरूपाचे आहेत. सद्य परिस्थितीचं उदाहरण द्यायचं झालं तर, भारतात आजही स्तन आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचं निदान उशीराच्या टप्प्यात होतं कारण स्क्रीनिंग चाचण्या करून घेणं याबाबतीत आजही समाजात अज्ञान आणि गैरसमज आहेत. बऱ्याच भागांमध्ये स्क्रीनिंगच्या सुविधांचं उपलब्ध नसणं किंवा सामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर असणं ही एक शोकांतिका आहे. विशेषत: ग्रामीण भागातील स्त्रीया त्यांच्या लैंगिक स्वास्थ्य आणि गुप्तांगांच्या समस्यांबद्दल मोकळेपणे बोलणं पसंत करीत नाहीत किंवा आर्थिक अडचणींच्या अनुषंगाने आपली प्राथमिक लक्षणं दुर्लक्षीत किंवा लपऊन ठेवतात.

प्रत्येक कर्करोग हा यूनीक असला तरी त्याविरुद्ध लढाईसाठी करायचे एकत्रित प्रयत्न हे एका इष्ट परिस्थितीनुसार शक्य आहेत. ती परिस्थिती निर्माण करताना इतर उपायांसोबत प्रत्येकानं आपली मानसिकता बदलणं गरजेचं आहे. कर्करोगाला शह द्यायचा असेल तर पुढील महत्वाच्या गोष्टी करणे आवश्यक आहे.

१. कर्करोगाबद्दल अधिकाधिक माहिती करून घ्या. इतरांनाही सांगा.
२. योग्य वयात कर्करोग स्क्रीनिंग चाचण्या करून घ्या.
३. आपल्या मुलांना योग्य वयात HPV ही प्रतिबंधात्मक लस द्या.
४. शरीरातील अनपेक्षित बदल दुर्लक्ष न करता कॅन्सरची लक्षणं नसल्याची खात्री करून घ्या.
५. तंबाखू आणि मद्य या व्यसनापासून स्वत:ला दूर ठेवा.

लक्षात ठेवा, कर्करोगाविरुद्ध एकत्रित येऊन लढण्यासाठी सतर्क आणि सक्षम रहाणे हाच 'यूनाइटेड बाय यूनीक' या मंत्राचा मतितार्थ.

**डॉ. मंगेश मेखा**
एमडी, डीएम, डीएनबी
कर्करोगतज्ञ, एम । ओ । सी शिवाजीनगर

M | O | C कॅन्सर केयर अँड रिसर्च सेंटर
एम । ओ । सी शिवाजीनगर
माणिकचंद गॅलेरिया, कार्यालय क्रमांक १, मॉडल कॉलोनी, पुणे, महाराष्ट्र - ४११ ०१६
९७६९७ ७१५९५ / ७३५९५
www.mocindia.co.in

Issued in public interest for the purpose of cancer education by M | O | C Cancer Care & Research Centre.

ADVERTORIAL

# वैद्यकीय विज्ञानातील विकास, करू कर्करोगाला हरविण्याचा ध्यास




**डॉ. मिहिर चितळे**
सिनियर कन्सल्टंट,
ॲडव्हान्स्ड मिनिमल इनवेसिव अँड कॅन्सर सर्जरी
फेलोशिप इन डायजेस्टिव्ह अँड एंडोक्राइन सर्जरी (फ्रान्स)
फेलोशिप इन रोबोटिक सर्जरी (केंब्रिज, यूके)


गेल्या दशकभरात वैद्यकीय विज्ञानातील प्रगती आणि जगभरात सुरू असलेल्या नवीन संशोधन प्रकल्पांमुळे कर्करोगाच्या रुग्णांसाठी सर्वोत्तम उपचार उपलब्ध करून देण्यात आम्हाला मोठे यश मिळाले आहे. कर्करोगाच्या शस्त्रक्रियेच्या सध्याच्या परिस्थितीत मिनिमल इनवेसिव शस्त्रक्रिया आणि रोबोटिक शस्त्रक्रियांना प्राधान्य दिले जात आहे.

सर्जिकल ऑन्कोलॉजीमधील मिनिमल इनवेसिव सर्जरी (MIS) दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया लहान स्कोप, कॅमेरे आणि उपकरणांसह केली जाते. पारंपरिक शस्त्रक्रियेमध्ये मोठे कट, मोठ्या चिरांच्या ऐवजी MIS मध्ये कमीतकमी किंवा खूप लहान कट व चिरे आवश्यक असतात. MIS नंतर रुग्णांची पुनर्प्राप्तीही अभूतपूर्व आहे, ज्यात कमीतकमी वेदना होतात आणि ऊतींचे कमी नुकसान, कमी जंतू प्रादुर्भाव आणि कमी रक्तस्राव होतो. दुर्बिणीने शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेनंतरही दुसऱ्या दिवशी उठून चालता येते आणि लवकर डिस्चार्ज मिळू शकतो. यामध्ये पुरेशा मार्जिनसह कॅन्सरच्या ऊतींचे क्लिअरन्स किंवा पूर्ण काढून टाकणे हे पारंपरिक शस्त्रक्रियेइतकेच चांगले असते. त्यामुळे कर्करोगासाठी दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया रुग्णांसाठी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे सिद्ध झाले आहे. 3D/4K सिस्टीम आणि रोबोटिक सिस्टीम्स सारख्या अलीकडील प्रगतीमुळे सर्जनना रुग्णांसाठी

DR MIHIR CHITALE
Caring with compassion since 3 generations
ADVANCED MINIMAL INVASIVE & ROBOTIC SURGERY
CANCER SURGERY
DIGESTIVE AND ENDOCRINE SURGERY

शस्त्रक्रियेचे परिणाम सुधारण्यास मदत झाली आहे. 3D कॅमेरे आणि प्रतिमांमध्ये उत्कृष्ट स्पष्टतेसह 4K कॅमेरे कुशल सर्जनला शस्त्रक्रिया अधिक काळजीपूर्वक करण्यास मदत करतात. विशिष्ट कॅमेऱ्यांसह इंडो सायनाइन ग्रीन (ICG) डाई वापरून आम्ही लसिका ग्रंथी अचूक मॅप करू शकतो आणि सेंटिनेल लिम्फ नोड मॅपिंग देखील करू शकतो. कॅमेरा ICG मोडवर स्विच केल्यावर लसिका ग्रंथी प्रकाशित होतात. शस्त्रक्रियेनंतर अवयवांचा रक्त पुरवठा तपासण्यासाठी आणि शरीरशास्त्राच्या स्पष्ट वर्णनासाठी ICG चा वापर केला जाऊ शकतो. आम्ही ऑप्टिमल क्लियरन्स मिळवू शकतो आणि रुग्णांचा त्रास कमी करू शकतो. ICG स्त्रीरोगविषयक कर्करोगातील कर्करोगाच्या विविध शस्त्रक्रियांमध्ये वापरली जाऊ शकते - Ca endometrium ca cervix; (गर्भाशयाचा कर्करोग) स्तनांच्या कर्करोगात; इनग्वॉयनल आणि पेल्विक लिम्फ नोड (लसिका ग्रंथी) यांच्या विच्छेदनामध्ये; आतड्याच्या कर्करोगात, तोंडाचा कर्करोग इ. इन्फ्रारेड इल्युमिनेशन सिस्टीम (IRIS) ही युरेटरला दुखापत होण्याचा धोका कमी करण्यासाठी कठीण आणि गुंतागुंतीच्या श्रोणी शस्त्रक्रियांमध्ये वापरल्या जाणाऱ्या नवीन पद्धतींपैकी एक आहे. मूत्रवाहिनीमध्ये ठेवलेला ऑप्टिक इन्फ्रारेड फायबर IRIS मोडमध्ये प्रकाशित होतो. रोबोटिक शस्त्रक्रिया कर्करोगाच्या शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात ही एक मोठी प्रगती आहे. कारण, नवीन उत्कृष्ट मशीन विकसित केल्या जात आहेत आणि त्यावर संशोधन केले जात आहे. सर्जन पूर्णपणे रोबोटिक प्रणाली नियंत्रित करतो. हे अधिक अचूकता देते आणि कुशलतेमुळे रोबोटिक उपकरणे शस्त्रक्रियेदरम्यान कठीण प्रवेश असलेल्या भागात पोहोचू शकतात. रोबोटिक सिस्टीम वापरून मोठ्या शस्त्रक्रिया सहजरित्या केल्या जाऊ शकतात. काही वेळा लॅपरोस्कोपी आणि रोबोटिक शस्त्रक्रिया वापरून संकरित दृष्टिकोन देखील पसंत केला जातो. प्रोस्ट्रेट कॅन्सर, अन्ननलिकेचा कर्करोग, पेल्विक शस्त्रक्रिया इत्यादींच्या शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणात रोबोटिक पद्धतीने केल्या जातात. थोरॅकोस्कोपिक शस्त्रक्रिया- ही वक्षस्थळाच्या पोकळीतील (छातीच्या पोकळीतील) गाठी / विकारांची शस्त्रक्रिया आहे. यामध्ये प्रामुख्याने फुफ्फुसाच्या गाठी, थायमोमॉज, मेडियास्टिनल ट्यूमर आणि लिम्फ नोड विच्छेदन, अन्ननलिकेचा कर्करोग इत्यादींचा समावेश होतो. नॉन- कॅव्हिटरी शस्त्रक्रिया- ही अलीकडील प्रगती आहे, जी अलीकडेपर्यंत जवळजवळ अशक्य मानली जात होती. मिनिमल इनवेसिव आणि लॅपरोस्कोपिक सर्जनच्या कौशल्यांमध्ये प्रगती आणि एंडोस्कोपिक टेक्निक्समुळे हे एक आशादायक डोमेन बनले आहे, ज्यामुळे रुग्णांना फायदा होतो. थोडक्यात काय तर मिनिमल इनवेसिव शस्त्रक्रिया (MIS) ही कर्करोगाच्या रुग्णांसाठी सुरक्षित आहे.















drmihirchitale@gmail.com | www.drmihirchitale.com | 9930599474

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### रेल्वे आता सेवा नव्हे उद्योग

‘‘**मधुबनी’में** लोकशाही...’ हा अग्रलेख (३ फेब्रुवारी) वाचला. समाजातील सर्व वर्गांचे लक्ष अर्थसंकल्पाकडे लागलेले असते, कारण तो सर्वांच्या जगण्याशी संबंधित विषय आहे. आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प हा जवळपास सर्वच वर्गांना दिलासा देणारा आहे. ठेवींवरील टीडीएस मर्यादा ५० हजारांवरून एक लाख करण्यात आल्याने सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या व्याजावर टीडीएस सवलतीची मर्यादा वाढली आहे तर नोकरदार वर्गाच्या १२ लाख रुपयांच्या उत्पन्नावर कर लागणार नाही, ही सवलत फक्त नवीन कर प्रणालीकडे आकर्षित करण्यासाठीच आहे. घरभाड्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर लागणाऱ्या कराच्या टीडीएस सवलतीची मर्यादा वाढवली आहे. आरोग्यासाठी ९६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. एआयसाठी पाचशे कोटींची तरतूद करण्यात आली आहे, ती वाढविणे आवश्यक होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिहारला झुकते माप देण्यात आले आहे. ‘राष्ट्रीय उत्पादन अभियान’ रोजगार निर्मितीसाठी मोलाचे ठरेल. मुंबई मेट्रोसाठी बाराशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढली ही स्वागतार्ह बाब असली, तरी यामुळे शेतकरी अधिक कर्ज घेऊन अधिक कर्जबाजारी तर होणार नाही ना, अशी भीती वाटते. काही वर्षांपासून रेल्वे ही सेवा राहिली नसून उद्योग झाला आहे. लवकरच नवीन कर विधेयक संसदेत मांडले जाईल. त्याचबरोबर अर्थसंकल्पाबाबत अनेक सूची मांडल्या जातात त्या मांडल्यानंतर स्पष्टता येईल.

■ **अनंत बोरसे,** शहापूर (ठाणे)

### अर्थसंकल्पात निवृत्तिवेतनधारक उपेक्षितच

‘**मेरे पास** मिडल क्लास है’ ही बातमी (लोकसत्ता- २ फेब्रुवारी) वाचली. परंतु या मध्यमवर्गीयांचे पगार वेतन आयोग वा मालक व कर्मचारी यांच्या द्विपक्ष करारानुसार वेळोवेळी वाढत असतात. त्यानुसार सरकारी बँक कर्मचारी आणि इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) यांच्यात वेळोवेळी द्विपक्षीय करार होत असतात. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीला असलेल्या वेतनानुसार त्याला निवृत्तिवेतन दिले जाते, परंतु आता आठवा वेतन आयोग जाहीर झाला आहे. त्यानुसार जे सरकारी कर्मचारी पूर्वी निवृत्त झाले आहेत त्यांच्या मूळ निवृत्तिवेतनात वेळोवेळी वाढ होत असते. सरकारी बँक कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हे घडत नाही, त्यामुळे गेल्या ३० वर्षांत जे बँक कर्मचारी/अधिकारी निवृत्त झाले त्यांच्या मूळ निवृत्तिवेतनात एका रुपयाही वाढ झालेली नाही. परिणामी बँकेतून निवृत्त झालेला शिपाई जे निवृत्तिवेतन घेतो ते २५-३० वर्षांपूर्वी निवृत्त झालेल्या सीनिअर मॅनेजरपेक्षा जास्त असते, कारण त्या ज्येष्ठाच्या मूळ निवृत्तिवेतनात वाढच झालेली नाही. त्यामुळे हा मध्यमवर्गीय बँकर ज्याने सरकारी बँकेत असताना अनेक महत्त्वाच्या सरकारी जनकल्याण योजना राबवल्या तो मात्र त्याच्या सेवानिवृत्तिवेतनात वाढ न झाल्याने वंचित राहिला आहे. मूळ निवृत्तिवेतनवाढ सरकारला तिजोरीतून द्यायचीच नसून कर्मचाऱ्यांनी जमा केलेल्या पेन्शन फंडातूनच द्यायची आहे. त्यामुळे अर्थमंत्र्यांनी हा प्रश्न लवकरात लवकर सोडविणे गरजेचे आहे.

■ **सुधीर देशपांडे,** ठाणे

### ही वाट अराजकाकडे नेणारी

‘**दिल्ली भाजपसाठी** आणखी प्रतिष्ठेची!’ हा महेश सरलष्कर यांचा ‘लाल किल्ला’ सदरातील लेख (३ फेब्रुवारी) वाचला. दिल्ली हे एक छोटे राज्य काबीज करण्यासाठी भाजपसारख्या मोठ्या पक्षाला, मध्यमवर्गीय करदात्यांना १२ लाखांपर्यंत सूट द्यावी लागत असेल व त्यापोटी एक लाख कोटींवर पाणी सोडावे लागत असेल, तर तो भाजपबरोबरच अर्थशास्त्राचा आणि करनिर्धारणशास्त्राचा पराभव मानावा लागेल. एवढ्या सुटीची अपेक्षा कोणीही केली नव्हती. परंतु या तुघलकी निर्णयामुळे आधीच रोडावलेल्या सरकारच्या आर्थिक स्रोतांत अधिक मोठा खड्डा पडेल त्याचे काय? परंतु ‘पुढचे पुढे’ या वृत्तीमुळे या प्रश्नाचा कोणीही गांभीर्याने विचार करताना दिसत नाही. काहीही करून ‘निवडणूक जिंकणे हाच एक पुरुषार्थ’ हा जिथे सर्वपक्षीय अजेंडा होऊन बसतो, तिथे अपेक्षा तरी कोणाकडून करावी? परंतु ही वाट निसरडी व अराजकाकडे नेणारी आहे, हे सुज्ञांनी तरी ओरडून सांगायला नको का?

■ **अरविंद करंदीकर,** तळेगाव दाभाडे

### विरोधकांचा दुबळेपणा अधिक ठळक

‘**दिल्ली भाजपसाठी** आणखी प्रतिष्ठेची!’ हा लेख वाचला. निवडणूक, मग ती देशातल्या एखाद्या राज्याची असो अथवा महापालिकेची, भारतीय जनता पक्ष ती प्रतिष्ठेची करतो आणि आपली सारी शक्ती पणाला लावतो, असा अनुभव आहे. राजकारणात, युद्धात व प्रेमात सारे काही क्षम्य असते या धारणेवर या पक्षाचा विश्वास बसलेला दिसतो व त्यातूनच त्याने देशातील मोठ्या प्रदेशाची सत्ता संपादन केल्याचे दिसते. वास्तविक एव्हाना विरोधकांनी भाजपशासित प्रदेशांचे वास्तव जनतेसमोर आणणे आवश्यक होते. परंतु विरोधी पक्षांचा दुबळेपणा सरकारच्या अपयशापेक्षा उठून दिसतो. विरोधकांच्या मर्यादा समजल्यावर एखाद्या पक्षाने प्रत्येक निवडणूक प्रतिष्ठेची न केली, तरच नवल.

■ **शैलेश पुरोहित,** मुंबई

### भाडेवाढ हा एकच उपाय आहे?

‘**एस.टी. भाडेवाढ** अपरिहार्य होती का?’ हे ‘विश्लेषण’ (लोकसत्ता ३ फेब्रुवारी) वाचले. ‘लालपरी’चे मारेकरी!’ या संपादकीयातील (लोकसत्ता- १ नोव्हेंबर २०२१) ‘सरकारी मदतीचे भान नसणे आणि सरकारी मदत मिळते म्हणून परिवहन चालकांना येणारा माज ही कारणे लालपरीच्या ऱ्हासास कारणीभूत आहेत’ हे वाक्य आठवले. ‘महाकार्गो’ ही मालवाहतुकीची गाडी कुठे अडली? रस्त्यावर धावणाऱ्या एका एसटीमागे आठ कर्मचारी (गरजेच्या दुप्पट) असतील तर कमी खर्चात जास्त कार्यक्षमता असंभव आहे. लांब पल्ल्याचे किफायतशीर मार्ग, खड्डेमुक्त रस्ते, चालक-वाहकांची कार्यक्षम व जरूर तेवढीच कुमक, ‘एशियाड’ ‘शिवनेरी’सारख्या गाड्या विनावाहक धावणे, देखभालीसाठी सुसज्ज कार्यशाळा, गाड्यांचे सुटे भाग योग्य वेळीच बदलण्यावर वरिष्ठांचा भर, त्यांच्या खरेदीतील पारदर्शकता, अनुदानाचा तारतम्याने यथायोग्य वापर, चालकांवर जीपीएसद्वारे लक्ष इत्यादी प्रयत्न आवश्यक आहेत. केवळ सरकारी मदतीच्या कुबड्या आणि अधिकाऱ्यांच्या मनात आले की भाडेवाढ हे कायमचे उपाय नाहीत. फायद्यात असलेल्या इतर राज्यांच्या परिवहन मंडळांच्या कारभाराचा अभ्यास केला पाहिजे.

■ **श्रीपाद कुलकर्णी,** बिबवेवाडी (पुणे)

### ...तर आखातात ‘इराणोदय’ होईल

‘**अरबांची जरब...**’ हा ‘अन्वयार्थ’ (३ फेब्रुवारी) वाचला. इलॉन मस्कचे नाव शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी समोर येणे आणि त्याच वेळी इस्रायल-पॅलेस्टाइन संघर्ष आणि रशिया-युक्रेन युद्ध संपवून आपल्यालाही तो पुरस्कार मिळावा अशी मनीषा ट्रम्प महाशयांनी बाळगणे हा खचितच योगायोग नसावा. ट्रम्प यांच्या मते १५ लाख पॅलेस्टिनींना इजिप्त आणि जॉर्डनने सामावून घ्यावे. पण स्वतःच्या देशातून स्थलांतरितांना हाकलून लावणारे ट्रम्प आम्हाला हा शहाणपणा कोणत्या आधारावर सांगत आहेत हाही प्रश्न या दोन देशांनी ट्रम्प यांना खडसावून विचारला पाहिजे. आखाताचा इतिहास, भूगोल आणि वर्तमान राजकीय परिस्थितीचा गंध नसलेल्या ट्रम्प यांना अरब देशांनी आरसा दाखवला. ही एकजूट पुढेही कायम राहिल्यास गाझावासीयांबाबत सर्वमान्य तोडगा निघेल.

अमेरिकेचे सौदी अरेबियावरील तेल-अवलंबित्व संपले आहे. तर इजिप्तच्या सुएझ कालव्याबाबतही थोड्याफार फरकाने तीच परिस्थिती आहे. जॉर्डनसोबत मुळातच व्यापार कमी आहे. एकंदरीत अमेरिकेचे या देशांवाचून फारसे काहीच अडत नाही. दुसरीकडे, ट्रम्प हे इस्रायल आणि पर्यायाने नेतान्याहु यांची बाजू घेताना दिसतात याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिकेत ज्यूंची असलेली प्रचंड मोठी आणि ताकदवान लॉबी! ही लॉबी शासन, प्रशासन, राजकारण अशा सर्वच ठिकाणी कार्यरत आहे. त्यामुळे त्यांना इस्रायलविरोधात जाता येत नाही. व्यावसायिक असलेल्या ट्रम्प यांना पॅलेस्टाइनची तळी उचलण्यात वैयक्तिक हित दिसत नाही, नाहीतर त्यांनी तेही केले असते. अशा विवेकशून्य, विचारशून्य व्यक्तीसाठी देशहित नाही तर स्वहित प्रथम आहे. स्थलांतराचा प्रश्न जगभर रौद्ररूप धारण करत असताना त्यावर शाश्वत, सर्वमान्य तोडगा काढण्याऐवजी तात्पुरती मलमपट्टी करण्यात ट्रम्प महाशय धन्यता मानत आहेत. ब्रिक्स समूह आणि कॅनडा, मेक्सिको, चीन, रशिया या अमेरिकेच्या विरोधात जाणाऱ्या देशांच्या यादीत लवकरच आखातातील सर्वच देशांचा समावेश झाल्यास आश्चर्य वाटणार नाही. आखातात अमेरिकाविरोधाची धार वाढल्यास त्याच क्षितिजावर ‘इराणोदय’ होईल हे नक्की.

■ **संकेत पांडे,** नांदेड

# स्वस्त विजेच्या दिशेने वाटचाल...

**महिन्याकाठी १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण राज्यात ७५ टक्के आहे. या ग्राहकांसाठी सध्या असलेला प्रति युनिट ८ रुपये १४ पैसे हा दर १ एप्रिलपासून ७ रुपये ६५ पैसे इतका कमी करण्याचा प्रस्ताव महावितरणने ठेवला आहे. अन्य ग्राहकांना लागू असलेले दरही टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे नियोजन आहे...**



पहिली बाजू

**विश्वास पाठक**
महावितरणचे स्वतंत्र संचालक

**घरगुती, औद्योगिक,** व्यावसायिक आणि कृषी अशा राज्यातील सर्व ग्राहकांना वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वीजदर वाढविण्यासाठी नव्हे तर आम्हाला दर कमी करू द्या, म्हणून ऐतिहासिक याचिका सादर केली आहे. महावितरण ही सरकारी कंपनी ग्राहकांना वीज देऊन बिले वसूल करत असली तरी या कंपनीला विजेचा दर ठरविण्याचा अधिकार नाही. कायदेशीर तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग राज्यातील वीजनिर्मिती, वहन आणि वितरण करणाऱ्या सरकारी व खासगी कंपन्यांचे दर ठरवितो. त्यानुसार दर पाच वर्षांनी महावितरण आयोगासमोर आपला जमाखर्च सादर करून विजेचा दर ठरविण्यासाठी याचिका सादर करते. आयोग जनसुनावणी करून निर्णय देतो. आयोगाने ठरविलेला विजेचा दर लागू होतो. दरवेळी महावितरण वीजदरात वाढ करण्यासाठी याचिका दाखल करते, पण यावेळी प्रथमच आम्हाला वीजदर कमी करू द्या, म्हणून याचिका दाखल झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा चमत्कार घडला आहे.

विजेच्या दरात पाच वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने कपात, घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या वीजवापरासाठी प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपये अतिरिक्त सवलत आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणे ही महावितरणच्या यावेळच्या याचिकेची तीन ठळक वैशिष्ट्ये आहेत. या बाबी राज्यातील सर्वसामान्य लोकांना दिलासा देण्यासोबतच राज्याच्या आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या आहेत. महावितरणच्या प्रस्तावाला आयोगाने मान्यता दिल्यानंतर १ एप्रिलपासून हे लाभ मिळू लागतील.

राज्यातील घरगुती वीज ग्राहकांमध्ये महिना १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण ७५ टक्के आहे. महावितरणच्या प्रस्तावानुसार या ग्राहकांना सध्या असलेला प्रति युनिट ८ रुपये १४ पैसे हा दर २०२५-२६ या आगामी आर्थिक वर्षात म्हणजे १ एप्रिलपासून ७ रुपये ६५ पैसे इतका कमी करण्यात येईल. पुढे हा दर आणखी कमी करण्यात येईल. पाच वर्षांच्या कालावधीत या ग्राहकांसाठीचा विजेचा दर ५ रुपये ८७ पैसे प्रति युनिट या पातळीपर्यंत येईल. अर्थात या ग्राहकांसाठीचा वीजदर पाच वर्षांत २३ टक्के कमी होईल.

दरमहा १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण २२.४ टक्के इतके आहे. या ग्राहकांसाठीचा सध्याचा प्रति युनिट वीजदर १३ रुपये २४ पैसे इतका आहे. आगामी आर्थिक वर्षात तो प्रति युनिट २५ पैशांनी वाढवून १३ रुपये ४९ पैसे करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, नंतरच्या वर्षांमध्ये हा दर घसरत जाऊन पाचव्या वर्षी ११ रुपये ८२ पैसे होईल. या वर्गासाठी पाच वर्षांत विजेचा दर १२ टक्के कमी होईल. महिना ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण एकूण घरगुती ग्राहकांमध्ये सुमारे ९८ टक्के आहे व त्यांना दिलासा देण्यात आला आहे.



**दिवसा वीज वापरा, सवलत मिळवा**

घरगुती ग्राहकांसाठी आणखी एक महत्त्वाची भेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महावितरण या सरकारी कंपनीने देऊ केली आहे. घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या विजेच्या दरात अतिरिक्त सवलत देण्यात येईल. आगामी २०२५-२६ या आर्थिक वर्षात प्रति युनिट ८० पैसे, त्यानंतरच्या चार वर्षांमध्ये दरवर्षी अनुक्रमे ८५ पैसे, ९० पैसे, ९५ पैसे आणि १ रुपया अशी सवलत मिळेल.

कोणत्या वेळेला वीज वापरली त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला तांत्रिक भाषेत टीओडी (टाइम ऑफ डे) म्हणतात. टीओडीची सवलत आतापर्यंत केवळ उद्योगांना होती. आता ती घरगुती ग्राहकांनाही देण्यात येणार आहे. या सवलतीचा वापर करण्यासाठी कोणत्या वेळी किती वीज वापरली याची नोंद ठेवणारे टीओडी मीटर बसविणे आवश्यक असते. महावितरण हे मीटर ग्राहकांना मोफत बसवून देत आहे. त्यामुळे जे ग्राहक हे मीटर बसवून घेतील, त्यांना १ एप्रिलपासून वीजदरात आणखी सवलत मिळविता येईल. १ एप्रिलनंतर दिवसा ८० पैसे प्रति युनिट सवलतीचा वापर करून १०० ते ३०० युनिट वीज वापरणारे ग्राहक त्यांच्यासाठीच्या दरातील २५ पैशांच्या वाढीवर मात करू शकतात.

**उद्योगांसाठीचे स्वप्न साकारले**

राज्यात महावितरण शेतकऱ्यांना सरासरी वीजदराच्या तुलनेत ८२ टक्के सवलतीने वीज पुरविते. शेतकऱ्यांना वीजदरात सवलत देण्यासाठी उद्योगांच्या वीजदरात वाढ करून भरपाई केली जाते. त्याला क्रॉस सबसिडी म्हणतात. यामुळे उद्योगांसाठीच्या वीजदरात वाढ होते. क्रॉस सबसिडीचा बोजा हटवावा, अशी उद्योगांची अनेक दशकांची मागणी आहे. राज्यात उद्योगधंद्यांची वाढ होऊन रोजगार व संपत्तीची निर्मिती होण्यासाठी हे आवश्यकही आहे. अखेरीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उद्योगांवरील क्रॉस सबसिडी हटविण्याचे स्वप्न साकारले आहे.

आगामी आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून म्हणजेच १ एप्रिलपासून उद्योगांना सरासरी वीजपुरवठा दरानुसार दर आकारण्याचा महावितरणचा प्रस्ताव आहे. त्यामुळे इतिहासात पहिल्यांदाच उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्यात यश आले आहे. अनेक वर्षे स्वप्न पाहिलेले अटल सेतू, मुंबईचा कोस्टल रोड, नागपूर मुंबई समृद्धी महामार्ग हे अशक्य वाटणारे प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात साकारले आहेत. त्याच पद्धतीने उद्योगांवरील क्रॉस सबसिडी हटविण्याचे स्वप्न साकारत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने उद्योगांच्या बाबतीत आणखी एक यश मिळविले आहे. आगामी पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने उद्योगांच्या वीजदरात कपात करण्याचा प्रस्ताव महावितरणने मांडला आहे. त्यासोबतच डेटा सेंटर, सेमीकंडक्टर अशा सनशाइन इंडस्ट्रीसाठी हरित ऊर्जा कोणताही अतिरिक्त आकार न देता उपलब्ध करण्याचाही प्रस्ताव महावितरणने मांडला आहे.

**हा चमत्कार कसा झाला?**

शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी पाच वर्षे मोफत वीज, त्यांना दिवसा आणि भरवशाचा वीजपुरवठा करणार, घरगुती ग्राहकांच्या वीजदरात पाच वर्षांत टप्प्याटप्प्यांनी कपात करणार, घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरण्यास अतिरिक्त टीओडी सवलत देणार, औद्योगिक ग्राहकांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणार, उद्योगांचा वीजदर कमी करणार... हा वीज क्षेत्रातील चमत्कार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा चमत्कार कसा झाला, हे समजून घेणे आवश्यक आहे.

गेली अडीच वर्षे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने सौरऊर्जेसह अपारंपरिक ऊर्जेच्या वापरावर भर दिला आहे. आगामी काळात २०३५ पर्यंतची विजेची गरज भागविण्यासाठी ४२,००० मेगावॉटच्या वीजखरेदीचे करार करण्यात आले आहेत. यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या १६ हजार मेगावॉट क्षमतेच्या सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पाचा समावेश आहे. याखेरीज पंप स्टोरेज या आधुनिक जलविद्युत तंत्रासह, बॅटरी स्टोरेज, पवन ऊर्जा यांच्या माध्यमातूनही वीज मिळणार आहे. ही सर्व वीज पारंपरिक विजेपेक्षा खूप स्वस्तात मिळणार आहे. सौरऊर्जेसह अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यामुळे आगामी पाच वर्षांत महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी काळाची पावले ओळखून अपारंपरिक ऊर्जावापरावर भर दिल्यामुळे ही बचत होणार आहे. परिणामी, वर उल्लेख केल्याप्रमाणे वीज क्षेत्रातील चमत्कार होणार आहे. याचा सर्वात मोठा लाभार्थी राज्यातील सर्वसामान्य घरगुती ग्राहक, शेतकरी, उद्योजक आणि व्यावसायिक असेल. राज्याला एक ट्रिलिअन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्यासाठीचे हे ऐतिहासिक पाऊल आहे.

## कुतूहल

# युरेनिनाइट आणि मोनाझाइट

**अणुभट्टीसाठी लागणारे** इंधन हे युरेनियम आणि थोरियम या मूलद्रव्यांच्या खनिजापासून तयार केले जाते. अणुऊर्जेच्या निर्मितीसाठी त्यांची आवश्यकता भासते. या दोहोंपैकी युरेनियमच्या ऑक्साइडच्या रूपातल्या खनिजाचे नाव युरेनिनाइट आहे. किंवा त्याला पिचब्लेंड असेही म्हणतात. गेल्या ६० वर्षांपासून मुख्यतः हेच खनिज वापरून युरेनियमचे उत्पादन केले जाते. वास्तविक युरेनियमचे साठे अग्निजन्य (इग्निअस), अवसादी (सेडिमेंटरी) आणि रूपांतरित (मेटॅमॉर्फिक) अशा तिन्ही प्रकारच्या खडकांमध्ये आणि तेही विविध स्वरूपाच्या खनिजांमध्ये मिळतात. शिवाय ते निरनिराळ्या भूवैज्ञानिक कालखंडात निर्माण झालेल्या खडकांमध्ये मिळतात.



युरेनिनाइट

परंतु यातले सर्वच साठे खाणकाम करावे अशा गुणवत्तेचे नसतात. कुठल्याही खनिजाचे खाणकाम करावे की नाही, हे खनिजाचा दर्जा कसा आहे, तो साठा किती समृद्ध आहे आणि व्यवसायक्षेत्रात त्या खनिजाला किती मागणी आहे, या बाबींवर अवलंबून असते.

जगातल्या सर्व युरेनियमच्या साठ्यांचा आढावा आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संघटना (इंटरनॅशनल अटॉमिक एनर्जी एजन्सी) नियमितपणे घेत असते. अद्ययावत् आढाव्यानुसार, युरेनियमचे खाणकाम करण्यायोग्य साठे हे ५५ देशांत मिळून ७९ लाख टनांचे आहेत. यांपैकी निम्म्याहून अधिक साठे ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि कझाखस्तान या तीन देशांमध्ये आढळतात. साहजिकच युरेनियमचे सर्वांत जास्त उत्पादन या तीन देशांतच होते. जगात ऊर्जानिर्मितीसाठी ३१ देशांत मिळून ४४० अणुभट्ट्या कार्यरत आहेत. त्या साऱ्या मिळून फार मोठ्या प्रमाणात विद्युतनिर्मिती करतात. त्यासाठी प्रतिवर्षी ६७,५०० टन युरेनियमची आवश्यकता असते.

भारतात युरेनियमच्या साठ्यांचा शोध घेण्यासाठीचे सर्वेक्षण १९५० पासून सुरू झाले. आतापर्यंत सुमारे २,२०,९०० टन युरेनियमच्या साठ्यांचा शोध लागला आहे, त्यापैकी ५६ टक्के साठे आंध्र प्रदेशात, २५ टक्के साठे झारखंडमध्ये, तर सात टक्के साठे मेघालयात आहेत. तथापि आघाडीच्या उत्पादक देशांच्या तुलनेत भारतातले बहुतेक साठे कमी प्रतवारीचे आणि लहान आहेत.

युरेनियमच्या मानाने थोरियमला मागणी कमी आहे. थोरियमचे साठे मोनाझाइट नावाच्या खनिजाच्या स्वरूपात सापडतात. तसे पाहिले, तर मोनाझाइट स्वतंत्र खनिज नसून तो खनिजांचा गट आहे. काही मूलद्रव्ये अतिशय दुर्मीळ आहेत. त्या मूलद्रव्यांना दुर्मीळ मृत्तिकांचा समूह म्हणतात आणि त्यांच्या फॉस्फेट स्वरूपात आढळणारा खनिजांचा गट म्हणजे मोनाझाइट गट. त्या गटात दुर्मीळ मृत्तिका. थोरियम आणि अल्प प्रमाणात युरेनियम ही मूलद्रव्ये असतात. त्यात थोरियमच्या ऑक्साइडचे प्रमाण साधारणपणे ८-१० टक्के असते. मोनाझाइटचे साठे किनारपट्टीच्या पुळणीमध्ये, भारी खनिजयुक्त वाळूच्या स्वरूपात आढळतात. भारत थोरियमच्या बाबतीत खूप समृद्ध आहे.

**– अरविंद आवटी**
**मराठी विज्ञान परिषद**
**ईमेल :** office@mavipa.org
**संकेतस्थळ :** www.mavipa.org

## उलटा चष्मा

# मोक्ष मिळवून दिला जाईल!

***नेहमीप्रमाणे भरलेला** भक्तांचा दरबार ऐन भरात असताना एक शिष्य लगबगीने येऊन बाबा बागेश्वरांच्या कानात कुजबुजला. ‘दिल्लीहून चाणक्यांच्या कार्यालयातून फोन आहे’ हे ऐकताच बाबा ताडकन उठले. यांच्याच सांगण्यावरून आपण चेंगराचेंगरीत मेलेल्यांना मोक्ष मिळाल्याचे वक्तव्य केले. त्यावर या अविमुक्तेश्वरानंदांनी थेट आव्हानच दिले. या गंगेत, मारतो धक्का व मोक्ष मिळवून देतो म्हणून. आता यावर हे चाणक्य पुन्हा कामाला लावणार असे म्हणत त्यांनी फोन घेतला. ‘ये देखो बाबा, हा जो कुणी अविबाबा आहे, तो सतत आपल्या विरोधात गरळ ओकत असतो. बाकी सारे साधूसंत आपल्या बाजूने झालेत. हाच जरा वाकडा चालतोय. आता याला सरळ करण्याची नामी संधी आलीय. तुम्ही फक्त त्याचे आव्हान स्वीकारा. बाकी घाटावरचे आम्ही बघून घेऊ.’ हे ऐकताच बागेश्वरांचे डोळे चमकले. त्यांनी लगेच आजूबाजूला घुटमळत असलेल्या दांडकेश्वरांना बोलावून आव्हान स्वीकारल्याचे जाहीर केले.*

*वृत्त प्रसारित होताच वाहिन्यांवर बातम्यांचा भडिमार सुरू झाला. मोक्ष म्हणजे काय यावर अनेक साधू एका सुरात बोलू लागले. साहजिकच मृत्यूच्या तांडवाचा मुद्दा मागे पडला. आव्हान स्वीकारण्याची तारीख जशी जवळ येऊ लागली, तशी बाबाच्या आश्रमात नव्या चेहऱ्यांच्या भक्तांची गर्दी जमू लागली. ‘त्यांनी धक्का देण्यास माझी काही हरकत नाही. त्यानंतरही मी पाण्यात पडलो नाही तर आमचे भक्त त्यांना धक्का देतील. या लढाईत खरोखर कुणाचा कपाळमोक्ष होईल ते जनतेला लवकरच कळेल,’ असे बाबा म्हणू लागले तर त्याला प्रत्युत्तर देताना अविबाबांनी ‘मृत्यू हा सरकारप्रणीत असू शकतो, पण मोक्ष मिळवून देण्याचे काम सरकारचे नाही. त्यामुळे या वादापासून यंत्रणेने दूर राहावे. लुडबुड करू नये’ असे आवाहन करण्यास सुरुवात केली. यावर चिडलेल्या बागेश्वरांनी ‘सध्याचे सरकार सर्वशक्तिशाली आहे. त्यांच्याकडे असलेली शक्ती जन्ममृत्यूचा फेरा पुसून टाकेल एवढी आहे. त्यामुळेच ३० भाविकांना मोक्ष मिळाला या मतावर मी ठाम आहे. सरकारशिवाय इतर कुणीही साधूसंत मोक्ष मिळवून देऊ शकत नाहीत, हे सिद्ध करण्यासाठीच आम्ही घाटावर येणार आहोत. सरकारचे समर्थन करणाऱ्याला साधा धक्का देण्याची हिंमत आज कुणात नाही. जो ती करेल तो मृत्यूच्या दाढेत जाईल. मोक्षाचा विचारही त्याने करू नये’ असे प्रत्युत्तर देऊन वाकयुद्धात रंगत आणली.*

*हे ऐकल्यावर अविबाबा थोडे चिंतेत पडले. या आव्हानाच्या आडून आपला ‘गेम’ करण्याचा सरकारचा विचार तर नसेल या शंकेने त्यांना ग्रासले. आता काहीही झाले तरी मागे हटायचे नाही, असा निर्धार करून त्यांनी पिठातील समर्थकांना गोळा केले व मी मृत्यू तसेच सत्तेला घाबरणारा नाही, असे जाहीर केले. मग तो दिवस उजाडला. पहाटे चारपासूनच दोन्ही बाजूंचे भक्त ‘धक्कास्थळी’ जमू लागले. बागेश्वरांच्या भोवती पाचशे पोलिसांचे कडे होते तर अविबाबा त्यांच्या मोजक्या समर्थकांसह हजर झाले. ठरलेल्या मुहूर्तावर अविबाबांनी बागेश्वरांना धक्का देताच ते जसे पाण्यात पडले तसे पोलिसांनी त्यांना बाहेर काढले. इथे पोलीस कशाला असे अविबाबांनी विचारताच बागेश्वर भक्त त्यांच्यावर तुटून पडले. ते बघून पोलीस बागेश्वरांना सोडून तिकडे धावले. तसा शंभरेक जणांचा एक समूह अचानक समोर आला व त्यांनी ‘थांबा तुम्हाला मोक्ष दाखवतो’ असे म्हणत बागेश्वरांना पाण्यात बुडवायला सुरुवात केली. जिवाच्या भीतीने ते ‘बचाओ’ म्हणून ओरडू लागले. कशीबशी त्यांची सुटका केल्यावर पोलिसांनी त्या समूहाला ताब्यात घेऊन विचारणा केली तेव्हा कळले की त्यातले सारे चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांचे आप्त होते.*

## तर्कतीर्थ विचार

# कम्युनिस्ट क्रांतीचा कारागीर

**सोव्हिएत रशियाचे** १९२८ ते १९५३ असे २५ वर्षे राष्ट्राध्यक्षपद भूषविणाऱ्या स्टॅलिनचे ६ मार्च, १९५३ रोजी निधन झाले. त्यानिमित्ताने स्टॅलिनच्या कार्य आणि योगदानाचा आलेख चित्रित करणारा श्रद्धांजलीपर लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ‘नवभारत’ मासिकाच्या मे, १९५३ च्या अंकात लिहिला होता. या लेखाचा पूर्वार्ध स्टॅलिनच्या क्रांतिकारी कार्याचे गौरवीकरण करतो, तर उत्तरार्ध या कार्याची समीक्षा करणारा आहे. तर्कतीर्थ एकाच लेखात परस्परविरोधी मते व्यक्त करतात, असे सहसा दिसून येत नाही. हा लेख त्यास अपवाद होय.

पूर्वार्धात तर्कतीर्थ कार्ल जॅस्पर्स या जर्मन-स्वीस मानसोपचारतज्ज्ञ व धर्मशास्त्र तत्त्वज्ञ असलेल्या विचारवंतांचे उद्धरण उद्धृत करून आपले विवेचन सुरू करतात. त्यानुसार, ‘मानवी आंदोलनास जेव्हा उच्चतम उद्रेकाचे स्वरूप प्राप्त होते, बहुतेक तेव्हाच सत्याचा गंभीर आविष्कार होतो.’ रशियाच्या उद्रेकातून निर्माण झालेले व्यक्तिमत्त्व म्हणजे जोसेफ स्टॅलिन (१८७९ - १९५३). असे तर्कतीर्थांना येथे सुचवायचे आहे. ‘कम्युनिझमने उत्पन्न केलेल्या प्रश्नांचा निकाल लावणे, हेच विद्यमान विश्वव्यापी मानवतावादी आंदोलनाचे उद्दिष्ट आहे,’ हे तर्कतीर्थांचे विधान रशियात झालेल्या कम्युनिस्ट क्रांतीसंदर्भात आहे, ज्याच्या यशाचे श्रेय इतिहास लेनिन आणि स्टॅलिनला देत आला आहे. माणसावरील आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक सत्ता नष्ट कशी करता येईल व समतेचे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे जीवन माणसास कसे निर्माण करता येईल, या ध्येयातून खरे तर रशियन कम्युनिस्ट क्रांती जन्माला आली. तिचा कारागीर स्टॅलिन होता, हे या लेखाचे सूत्र होय. स्टॅलिनचे जीवन क्रांतिकारकाचे होते. १९०२ ते १९१७ पर्यंत सतत १५ वर्षे भडकलेल्या आगीत झारच्या प्रचंड सत्तेशी लढा देत तो उभा होता. अद्भुतरम्य साहसाने भरलेल्या रोमांचकारी लढ्याचा इतिहास असेच स्टॅलिनच्या चरित्राचे स्वरूप या लेखात वर्णिले आहे. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर रशियात अनागोंदी निर्माण होईल, अशी शंका असताना प्रत्यक्षात रशियात असे काही घडले नाही, याचे श्रेय स्टॅलिनने आपल्या हयातीत निर्माण केलेल्या यंत्रणेस द्यावे लागेल.

स्टॅलिन ही या शतकाची (विसाव्या) अद्वितीय राजकीय विभूती होय, असे गौरवीकरण लेखात तर्कतीर्थांनी केले आहे. त्याने रशियात आपले विरोधक रॅडिक, सिनॉचिव्ह, बुखारिन, कॅमेनेव्ह, क्रॉसिन, रॅकोवस्की, स्ट्रॉटस्की प्रभृतींचे शिरकांड केले. हे अर्थातच हुकूमशाहीचे कृत्य होते. त्याचे समर्थन करत तर्कतीर्थ लेखात म्हणतात की, ‘हुकूमशाही कठोर नसावी हे म्हणणे म्हणजे तलवारीला धार नसावी असे म्हणण्याइतके अनुचित आहे. क्रांतिकारकांना बळी देणे हे क्रांतीचे ऐतिहासिक कार्य आहे. ‘क्रांती ही पुत्रभक्षक माता आहे,’ ही म्हण ध्यानात ठेवली पाहिजे. स्टॅलिनला कर्तव्य पार पाडणे अपरिहार्य होते. ‘भगवद्गीते’चा आदेश प्रमाण मानणाऱ्या स्टॅलिनचे कृत्य गर्ह्य (निंदनीय) वाटणार नाही. ‘आडवा आलेला गर्भ कापावा लागतो. कापणाऱ्याला कोणीच दोषी ठरवीत नाही, असे स्टॅलिनचे समर्थन होऊ शकते.’ म्हणत तर्कतीर्थ सहमती व्यक्त करतात, याचेही आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही.

लेखाचा उत्तरार्ध मात्र उपरोक्त कथनाचा व्यत्यास ठरतो. त्यानुसार, ‘सोविएत युनियनच्या स्तुतिपाठाच्या पोथ्या पाठ करीत आधुनिक कम्युनिस्ट श्रद्धाजड बनला आहे. एकतृतीयांश मानवजातीत जो कम्युनिझमचा प्रयोग सुरू आहे, त्याच्यात मूलभूत मानवी मूल्यांना मूर्तिमंत स्वरूप देण्याचा प्रयत्न सफल होत असता तर पाश्चात्त्य राष्ट्रांच्या नागरिकांनी त्याचे सौहार्दाने स्वागत केले असते. आज भांडवलशाही अर्थव्यवस्थेची अब्रू कुठेच शिल्लक नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांतील भांडवलशाहीच्या नावाने खडे फोडणे, हेसुद्धा अंधपरंपरेचे लक्षण आहे. प्रयोगात आलेला कम्युनिझम मानवात बंधमुक्तीची आशा निर्माण करू शकत नाही. कम्युनिझमच्या पलीकडे गेले पाहिजे. कारण कम्युनिझमने मानवतावादी मूल्यांना दुय्यम स्थान दिले आहे. स्टॅलिनने कम्युनिझमला व्यवहारी आणि मूर्तिमंत स्वरूप दिले, हेच त्याचे जागतिक इतिहासातील अद्वितीय कार्य आहे. त्याच्या कार्याची नीट समीक्षा करून माणसाने पुढे जावे, असा इशारा त्याचा अस्त देत आहे.’

लेखाच्या शेवटी तर्कतीर्थ मानवतावादी मूल्यांना दुय्यम स्थान देण्याच्या कम्युनिस्ट वृत्तीस दूषणे देत असले, तरी लेखाचा भर स्टॅलिनच्या गौरवीकरणावर आहे.

**– डॉ. सुनीलकुमार लवटे**
drsklawate@gmail.com

# किती मी राखू तुमची...

## मोदींच्या अमेरिका भेटीच्या पार्श्वभूमीवर आपण आयात शुल्क सवलत दिली नसती तर ट्रम्प यांस खूश करण्याचा प्रयत्न आपण किती काळ करणार, हा प्रश्न पडला नसता.

**अमेरिकेचे अध्यक्ष** डोनाल्ड ट्रम्प वक्री जाऊ नयेत यासाठीच्या आपल्या धडपडीचे अधिक कौतुक करावे की आपल्याविषयीचे अंदाज तंतोतंत खरे ठरावेत यासाठी ट्रम्प अध्यक्षपदी आल्यापासून आपण अहोरात्र करत असलेल्या प्रयत्नांचे अधिक, हे ठरवणे अवघड. अमेरिकी वाहनांवर आपल्या देशात लावल्या जाणाऱ्या कराविषयी ट्रम्प रागावलेले आहेत. हा राग त्यांनी अनेकदा जाहीरपणे व्यक्त केलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिकी दौरा सुरू होण्यासाठी या मुद्द्यावर ट्रम्प यांस 'शांत' करणे गरजेचे. त्यातूनच ताज्या अर्थसंकल्पात हे आयात शुल्क तब्बल ५० टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून हे आयात शुल्क आता १२५ टक्क्यांवरून ७० टक्के इतके कमी होईल. याचा अर्थ केवळ 'हार्ले डेव्हिडसन' दुचाकीच नव्हे तर इलॉन मस्क यांची 'टेस्ला' वीज कारही भारतात स्वस्त होऊ शकेल. हे अर्थातच ट्रम्प यांस खूश करण्यासाठी. त्यात पंतप्रधानांचा संभाव्य अमेरिका दौरा. या पार्श्वभूमीवर आपण अमेरिकेसमोर असे कंबरेत वाकत असताना ट्रम्प यांनी ताज्या तलवारबाजीत त्यांच्या शेजारील मेक्सिको, कॅनडा आणि दूरवरील चीन या देशांवर अतिरिक्त कर लागू केले. शेजारील मेक्सिको, कॅनडा यासाठी ते २५ टक्के इतके असतील तर चीनसाठी १० टक्के. म्हणजे या तीन देशांची उत्पादने अमेरिकेत इतक्या टक्क्यांनी महाग होतील आणि अमेरिकेच्या मोटारी, दुचाक्या यांच्या किमती भारतात तितक्या टक्क्यांनी कमी होतील. हे दोन्ही एकाच दिवशी झाले. यावरून या निर्णयाचे महत्त्व जसे लक्षात येते तसेच हे असे निर्णय घेणाऱ्यांची मानसिकताही दाखवून देते. ट्रम्प यांनी जे केले त्याचे वर्णन जागतिक स्तरावर 'व्यापारयुद्धाचे रणशिंग', 'नव्या व्यापारयुद्धास सुरुवात' आदी शब्दांत केले जाते. ते योग्यच. तथापि त्यावर भाष्य करताना एक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे तो म्हणजे, आपले काय होणार?

याचे कारण ट्रम्प चीनविरोधात फोडत असलेल्या डरकाळ्यांमुळे आपल्याकडे एका वर्गास होत असलेल्या गुदगुल्या. आपल्या शत्रूचा काटा परस्पर काढला जात असेल तर ते कोणास आवडणार नाही? पण चीनविषयी ट्रम्प यांच्या भूमिकेकडे इतक्या कोत्या नजरेने पाहणे हेच आपल्यासाठी अयोग्य असू शकते, हे सत्य लक्षात घेणे महत्त्वाचे. याचा अर्थ असा की ट्रम्प जितके चीनविरोधात डरकाळ्या फोडत आहेत तितके ते खरोखरच त्या देशाविरोधात जाऊ इच्छितात का हा प्रश्न. तशी त्यांची खरोखरच इच्छा असती तर त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांस जातीने स्वतःच्या अध्यक्षावरोहणाचे निमंत्रण दिले नसते. ट्रम्प यांनी ज्यांना वैयक्तिक निमंत्रणे दिली त्यात क्षी वरच्या यादीत आहेत, ही बाब विसरता नये. तसेच त्यांनी कोणास तसे निमंत्रण दिले नाही याकडेही दुर्लक्ष करता नये. ट्रम्प हे केवळ जिनपिंग यांस शपथविधी सोहळ्यास निमंत्रण देण्यावरच थांबलेले नाहीत, ही आपल्यासाठी आणखी गंभीर बाब. अध्यक्षपदी आरूढ

**...पण अनधिकृत भारतीयांच्या परतीची कबुली, अधिक तेल खरेदीची घोषणा, अणुकरार पुनर्जीवित करण्याची भाषा आणि 'हार्ले डेव्हिडसन'सह 'टेस्ला'वरील आयात शुल्क आपणहून कमी करणे, याचा अर्थ कसा लावणार?**

झाल्यावर ट्रम्प यांनी काही जागतिक नेत्यांस स्वतः जातीने फोन केले आणि आगामी वाटचालीची चर्चा केली. त्यातही चीनचे जिनपिंग यांचा समावेश होता. ट्रम्प यांनी स्वतःहून असा फोनसंपर्क कोणाशी साधला नाही, हे सांगण्याची गरज नाही. जिनपिंग यांच्याशी तो साधला ही बाब अधिक महत्त्वाची. असे असताना चीनविरोधात ट्रम्प किती टोकाला जातील, या प्रश्नाचा विचार गांभीर्याने करायला हवा. कारण या प्रश्नाच्या प्रामाणिक उत्तरावर आपण आणि चीन तसेच अमेरिका आणि आपण यांचे भावी संबंध अवलंबून आहेत.

ट्रम्प यांच्या आधीचे डेमॉक्रॅट्स जो बायडेन आपल्याकडे चीनच्या नजरेतून पाहत. म्हणजे चीन या साम्यवादी, हुकूमशाही देशास पर्याय म्हणून त्यांच्या नजरेतून भारताची उपयुक्तता होती. त्यामुळे चीनचे नाक खाजवण्यासाठी, त्या देशास इशारा देण्यासाठी वा चीनविरोधातील प्यादे या अर्थाने डेमॉक्रॅट्सच्या नजरेत भारताचे महत्त्व होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय निर्बंध लादलेल्या रशियाशी असलेल्या आपल्या संबंधांकडे अमेरिकेने काणाडोळा केला. ट्रम्प यांची रिपब्लिकन नजर यापेक्षा वेगळी आहे. ते थेट चीनशी चीन म्हणूनच व्यवहार करू पाहतात. त्यांना चीनला पर्याय म्हणून कोणी एक साथीदार राखलेला बरा, असे वाटत नाही. या त्यांच्या दृष्टिकोनाची तुलना शीतयुद्धाच्या काळात अमेरिकी नेतृत्वाने अखेर त्यांचा तेव्हाचा कडवा शत्रू असलेल्या सोविएत युनियनच्या नेतृत्वाशी थेट संधान साधले, या घटनेशी करता येईल. सोविएत रशियाचे अध्यक्ष ब्रेझनेव्ह हे या काळात 'व्हाइट हाऊस'चा पाहुणचार घेऊन आले होते. त्या वेळी असा प्रयत्न अमेरिका आणि सोविएत युनियन या दोघांनीही करण्यामागील एक कारण या शत्रुत्वाचा फायदा उठवण्याचा अन्य देशांकडून होणारा प्रयत्न; हे होते. त्याचप्रमाणे चीन आणि अमेरिका सध्याही करू पाहतात किंवा काय, हा प्रश्न. तो पडतो कारण ट्रम्प जितक्या तीव्रतेने मेक्सिको, कॅनडा आदी देशांवर धावून जातात ती त्यांची आक्रमकता चीनविरोधात दिसत नाही. हे 'घर में घुस के मारेंगे'चे स्मरण करून देणारे असू शकते. आज चीन हा अमेरिकेचा सर्वात मोठा धनको आहे. अमेरिकी रोखे, डॉलर्समधील गुंतवणूक आणि अमेरिकी कंपन्यांची उत्पादन केंद्रे चीनमध्ये आहेत. त्यामुळे अशा देशाशी थेट दोन हात करण्यापेक्षा सामोपचाराने मतभेद मिटवता आल्यास बरे, असा विचार ट्रम्प यांनी केला नसेलच, असे नाही. शेवटी त्यांचा उजवा हात असलेल्या मस्क याचा सगळ्यात मोठा 'टेस्ला' कारखानादेखील चीनमध्येच आहे, हे कसे विसरणार? याचा अर्थ हे पडद्यामागील चातुर्य प्रत्यक्षात येत असेल तर आपणासाठी ती स्पष्ट धोक्याची घंटा ठरते. कारण यापुढे आपण चीनचा बागुलबुवा सतत पुढे करत अमेरिकेकडून आपणास हवे ते काढून घेऊ शकणार नाही. म्हणून ट्रम्प हे भारताचा उल्लेख अमेरिकेच्या व्यापारशत्रूंच्या यादीत करतात, ही बाब दुर्लक्ष करू नये अशी. त्याचा अर्थ ''चीनचे मी काय ते बघतो, आधी तुम्ही सरळ व्हा'' असा सूर ट्रम्प लावणारच नाहीत याची खात्री नाही. किंबहुना ट्रम्प यांची कसलीच खात्री देता येत नाही, हीच तर खरी अडचण.

त्यामुळे ट्रम्प यांस खूश करण्याचा प्रयत्न आपण किती काळ करणार, हा मुद्दा! मोदींच्या अमेरिका भेटीच्या पार्श्वभूमीवर ऐन अर्थसंकल्पात आपण ही आयात शुल्क सवलत दिली नसती तर तो कदाचित पडला नसता. पण ट्रम्प यांच्या शपथविधीप्रसंगी आपण अमेरिकेतील १८ हजार अनधिकृत भारतीयांस परत मायदेशी आणण्याची कबुली देतो, आपले सरकार आता आम्ही अमेरिकेकडून अधिक तेल/ नैसर्गिक वायू खरेदी करू अशी स्वतःहून घोषणा करते, आपला अर्थसंकल्प अमेरिकेबरोबरचा अणुकरार पुनर्जीवित करण्यासाठी पावले उचलण्याची भाषा करतो आणि ट्रम्प यांनी डोळे वटारायच्या आत आपण 'हार्ले डेव्हिडसन'सह 'टेस्ला'वरील आयात शुल्क आपणहून कमी करतो, या सगळ्याचा अर्थ कसा लावणार? कोणत्याही नजरेतून पाहिले तरी या सगळ्याचा अर्थ आपण ट्रम्प यांच्यासमोर लोटांगण घालतो किंवा काय, असाच होईल. हे असे मनमोहन सिंग अथवा विरोधी पक्षीय सरकारने केले असते तर विद्यमान सत्ताधाऱ्यांची प्रतिक्रिया काय असली असती असा राजकीय प्रश्न न विचारतादेखील ट्रम्प यांची मर्जी आपण किती राखणार या प्रश्नास भिडावे लागेल.

---

लेख

# 'शुद्ध हवा' नावडे दिल्लीकरांना...

योगेंद्र यादव
'जय किसान आंदोलन' आणि 'स्वराज इंडिया'चे संस्थापक
yyopinion@gmail.com

**हवेच्या प्रदूषणामुळे दिल्लीकरांचा श्वास कोंडला जाणं ही नित्याची बाब झाली आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला हा मुद्दा उचलावासा वाटत नाहीच, पण मतदारांनाही तो लावून धरावासा वाटत नाही. उद्या दिल्लीत होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठीच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर चर्चा...**

**वायू प्रदूषण** हा दिल्ली निवडणुकीतला प्रमुख मुद्दा का नाही, हा प्रश्न नेहमी उत्सुकतेतून नाही तर उद्वेगातून विचारला जातो. राजकीय दोषारोपाच्या धुरक्यामध्ये याची उत्तरे विरून गेली आहेत. वायू प्रदूषणाच्या महत्त्वाच्या मुद्द्याला स्पर्श न करता दिल्ली निवडणुकीचा प्रचार आटोपला. किमान आता तरी या मूलभूत प्रश्नाला भिडायला हवं. या गंभीर प्रश्नाच्या उत्तरातूनच लोकशाहीच्या सिद्धांताच्या मुळाशी जाता येईल.

निवडणुकीतील सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा वायू प्रदूषणाचा नसला तरी दिल्लीसाठी हा सर्वात कळीचा मुद्दा आहे, याला काही कारणं आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षित शुद्ध हवेच्या पातळीच्या तब्बल २० पट अधिक वायू प्रदूषण दिल्लीमध्ये आहे. लाहोरनंतर सर्वाधिक प्रदूषित असलेले शहर म्हणजे दिल्ली. वायू प्रदूषणामुळे सर्वसामान्य दिल्लीकराचे आयुर्मान सरासरी ८ ते १२ वर्षांनी घटते. आयुर्मान कमी होण्याचे प्रमाण किमान ७.८ वर्षे इतके जरी गृहीत धरले तरी जगण्याची अब्जावधी वर्षे केवळ या एका शहराने हिरावून घेतली आहेत, हे लक्षात येईल. यामुळे असे वाटू शकते की दिल्लीकर या प्रदूषित हवेला जबाबदार असलेल्या राज्यकर्त्यांना धडा शिकवतील, त्यांना सत्तेतून पायउतार करतील आणि वायू प्रदूषणावर चांगला उपाय सुचवणाऱ्या पक्षाला मतदान करतील.

दिल्लीच्या या निवडणुकीत असं काहीही होणार नाही. मी आता हा लेख लिहीत असतानाच आम आदमी पक्षाने नवीन १५ आश्वासने दिली आहेत. आधीच्या सहा योजना सुरूच ठेवल्या आहेत. या लांबलचक यादीमध्ये वायू प्रदूषणावरील उपायांचा उल्लेखच नाही. अगदी २०२० च्या घोषणापत्रात वायू प्रदूषण एकतृतीयांश प्रमाणात कमी करू, अशी पठडेबाज घोषणा केली होती. यंदा ती घोषणाही नाही. लोकप्रियता गमावत असलेल्या आम आदमी पक्षाला पुन्हा निवडून येण्यासाठी शुद्ध हवा हा मुद्दा निर्णायक वाटत नाही, ही लांच्छनास्पद बाब आहे. भाजपने आपल्या घोषणापत्रात तांत्रिक साहाय्याने वायू प्रदूषण निम्म्यावर आणण्याचे ढोबळ आश्वासन दिले आहे. काँग्रेसने यावर अजून भाष्य केलेले नाही. घोषणापत्रांचा मुद्दा सोडा; मुळात दररोजच्या राजकीय चर्चा, वादविवादांमध्ये वायू प्रदूषण हा



याच्यावर हेडलाइन होत नसली तरी वायू प्रदूषणाबाबत राष्ट्रीय माध्यमात मोठमोठे मथळे छापून येतात. याशिवाय निवडणुका हिवाळ्यात पार पडतात जेव्हा प्रदूषणाची तीव्रता अधिक असते. असे असूनही वायू प्रदूषणाच्या मुद्द्यावर लोकांना संघटित करता येत नाही. लोकशाहीची मुद्दा नाही. किमान यमुनेच्या प्रदूषणावरून राजकीय आरोपांच्या फैरी तरी झडतात.

अर्थतज्ज्ञ ज्याला 'बाजाराचे अपयश' म्हणतात तशीच काहीशी संकल्पना येथे राजकीय बाबतीत वापरायला लागेल. मागणी आणि पुरवठा यातील असंतुलनातून तयार होणारे हे अपयश आहे. 'आप' पक्षाचे सरकार पुन्हा येईल की नाही, हे आपल्याला माहीत नाही; पण 'आप'ला विजय मिळाला किंवा त्यांचा पराभव झाला तरीही वायू प्रदूषण हे काही त्याचे कारण असणार नाही, हे नक्की.

लोकशाहीतील हे अपयश दिसतं त्याहून अधिक गंभीर आहे. मतदारांच्या आवश्यकतेनुसार त्याची पूर्तता करण्यात अनेक निवडणुकीय लोकशाही व्यवस्था अपयशी ठरतात. त्याला काही ठरावीक कारणे दिली जातात. इथे ती नेहमीची कारणं देता येत नाहीत. उदाहरणार्थ, विषमता अमूर्त आहे पण वायू प्रदूषण प्रत्यक्ष डोळ्यांना दिसते. एखाद्या आर्थिक धोरणाचा परिणाम लोकांना कळत नाही; पण वायू प्रदूषणाचा परिणाम सर्वसामान्य माणसाला भोगावा लागतो. दिल्लीतील लोकांना कर्नाटक किंवा केरळमधील लोकांइतके पर्यावरणविषयक भान नाही; पण बहुसंख्य मतदारांना हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक ( अदक) समजतो. हा निर्देशांक समजला नाही तरी दररोज धुरके दिसतेच. याशिवाय 'राष्ट्रीय' माध्यमे यावर चर्चा करतात. स्वतःला मध्यमवर्ग म्हणवून घ्यायला आवडणाऱ्या अभिजन वर्गालाही शुद्ध हवेच्या पुरवठ्यासाठी अजून स्वतंत्र यंत्रणा निर्माण करता आलेली नाही! त्यामुळेच गरिबी, शिक्षण, आरोग्य 'मागणी' बाजू किती दुबळी आहे, हे यातून दिसतं. मूळ समस्येकडे त्यामुळे लक्ष दिले जात नाही.

वायू प्रदूषणाचा मुद्दा हा लोकशाहीच्या 'मागणी' बाजूच्या अपयशाचे ठळक उदाहरण आहे. वायू प्रदूषणावर उपाय ही लोकांची गरज आहे. तिचे मागणीत रूपांतर होऊ शकते. त्या मागण्या जोरकसपणे मांडल्या जाऊ शकतात. तरीही राजकीय पक्ष त्याकडे लक्ष देणार नाहीत. जेव्हा राजकीय पक्ष या मुद्द्यांवरून एकमेकांशी स्पर्धा करून अधिकाधिक चांगले उपाय सुचवतील, तेव्हाच हे मुद्दे परिणामकारक ठरतात. बहुतेक वेळा राजकीय पक्ष याबाबत बोलत नाहीत कारण त्यांच्याकडे काही उपाययोजना नसतात. स्पर्धेतील प्रमुख पक्षच एखादा मुद्दा निवडणुकीच्या रिंगणाबाहेर ठेवण्याचा प्रयत्न करतात तेव्हा मतदारांकडे अगदी मोजके पर्याय उरतात. तत्त्वतः नवा पर्याय सुचवणाऱ्या पक्षाला ते मतदान करू शकतात; पण निवडणुकीय रिंगणात अशी शक्यता दुर्मीळ असते. निवडणुकीच्या रिंगणात तो पर्याय मांडताना अडथळेच अधिक असतात.

दिल्लीत ही खरी अडचण आहे. 'आप' आणि भाजपने खरे मुद्दे वगळून आणि बाकी मुद्द्यांबाबत लिलाव करून प्रदूषणाचे संकट अधिक बिकट केले आहे. 'आप'ने २०२० साली वायू प्रदूषण एकतृतीयांश कमी करण्याचे आश्वासन दिले होते. त्याबाबत कोणतेही भरीव काम 'आप'ने केले नाही. दिल्लीमध्ये दोन कोटी झाडे लावण्याचे आश्वासनही पक्षाने दिले होते. गेल्या पाच वर्षांत दिल्लीतील वनक्षेत्र कमी झाले आहे, असे अहवाल सांगतात. भाजपलाही अनेक प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. मोदी सरकारची खूप गाजावाजा केलेली 'राष्ट्रीय शुद्ध हवा योजना' हवा स्वच्छ करण्यात अपयशी ठरली आहे. दिल्ली नगरपालिका हा जणू भ्रष्टाचार आणि गलिच्छपणा याचा समानार्थी शब्द झाला आहे! या आधी दिल्लीतील प्रदूषणावर उपाय शोधण्याचा शेवटचा गंभीर प्रयत्न शीला दीक्षितांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकारने केला होता. त्यांनी सीएनजीवर चालणाऱ्या बसेसची व्यवस्था केली होती. आज ही मोहीम आग्रहपूर्वक पुढे नेण्याचा कोणीही प्रयत्न करत नाही. प्रत्येक जण शेतकऱ्यांवर दोषारोप करतो आहे; मात्र शेतातील कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी त्यांना कोणीच मोबदला द्यायला तयार नाही. औद्योगिक आणि वाहनातून होणारे प्रदूषण थांबावे म्हणून कोणताही पक्ष गंभीरपणे प्रयत्न करताना दिसत नाही. कारण असे प्रयत्न केले की हितसंबंधांच्या साखळीला धोका पोहोचतो. त्यामुळे शांतपणे न्यायालयाच्या ताबडतोबीच्या योजनांच्या आदेशाची वाट पाहण्यात सारे पक्ष धन्यता मानतात. नाही तर मग रस्त्यांवर काही तरी फवारणी करणे, धुरक्यांचे टॉवर उभा करणे असे लक्षवेधक प्रकार राजकीय पक्ष करत राहतात किंवा शीश महाल आणि रोहिंग्यांवरून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत राहतात.

एकुणात हा धडा फक्त दिल्लीतल्या वायू प्रदूषणाबाबत नाही. लोकशाही व्यवस्थेत कोविड मृत्यू, सार्वत्रिक गरिबी, शिक्षणाची आणि आरोग्याच्या हलाखीची स्थिती हे निवडणुकीचे मुद्दे का बनत नाहीत, याबाबतचा हा धडा आहे. अनेक अटी शर्ती पूर्ण होतात तेव्हाच लोकांच्या इच्छेला निवडणुकीय लोकशाहीत महत्त्व प्राप्त होते. सध्याच्या लोकशाही वास्तवात पक्ष आणि नेते मतदारांच्या मुद्द्यांना प्रतिसाद देत नाहीत. पक्षांनी समोर ठेवलेल्या मोजक्या पर्यायांना मतदार प्रतिसाद देतात. सगळे नागरिक त्यांना भेडसावणारे मुद्दे जोरकसपणे संघटित होऊन मांडत नाहीत तोवर निवडणुकीची प्रक्रिया नागरिकांसाठी बिनकामाची असेल. मतदार हे कधी कधी सार्वभौम असतात. त्यांच्यासमोर वाढून ठेवलेल्या निवडक बाबींमधूनच ते निवड करू शकतात, हेच आजचे वास्तव आहे!

अनुवादः श्रीरंजन आवटे

---

विश्लेषण

# नीट यूजी परीक्षेतील अचानक केलेले बदल गोंधळ वाढवणारे?

विनायक डिगे
vinayak.dige
@expressindia.com

**नीट यूजी परीक्षेदरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी राष्ट्रीय परीक्षा कक्षाने काही बदल जाहीर केले आहेत. पण परीक्षा तीन महिन्यांवर आलेली असताना बदल केल्यामुळे विद्यार्थी हिताला धक्का बसल्याची चर्चा आहे.**

**'नीट यूजी'तील बदल विद्यार्थी हिताचे?**

एमबीबीएस, बीएएमएस, बीयूएमएस आणि बीएचएमएस या अभ्यासक्रमाच्या पदवीपूर्व प्रवेशासाठी राष्ट्रीय पात्रता - सह - प्रवेश परीक्षा (नीट यूजी) महत्त्वपूर्ण समजली जाते. इंग्रजी, हिंदी, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम्, मराठी, ओडिशा, पंजाबी, तमिळ, तेलुगु आणि उर्दू अशा १३ भाषांमध्ये ही परीक्षा देता येते. नीट परीक्षा अवघ्या तीन महिन्यांवर आलेली असतानाच राष्ट्रीय परीक्षा कक्षाने त्यात काही महत्त्वपूर्ण बदल केल्याने त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसण्याची शक्यता आहे. नीट परीक्षेत गतवर्षी झालेल्या गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर हा बदल योग्य असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. मात्र हे बदल इतक्या उशिरा केल्यामुळे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

**परीक्षेच्या पॅटर्नमध्ये कोणता बदल केला?**

करोना कालावधीत विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन राष्ट्रीय परीक्षा कक्षाने नीट यूजीच्या परीक्षेत बदल करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार नीट यूजीच्या परीक्षेमध्ये 'अ' व 'ब' असे दोन विभाग करण्यात आले. 'अ' विभागामध्ये ३५ अनिवार्य प्रश्न होते, तर 'ब' विभागामध्ये १५ पर्यायी प्रश्न होते. मात्र आता एनटीएने मूळ पद्धतीने परीक्षा घेण्याचा आणि प्रश्नपत्रिकेतून 'ब' विभाग काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नीट यूजीची परीक्षा १८० अनिवार्य प्रश्नांची असणार आहे. यामध्ये भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रातील प्रत्येकी ४५ प्रश्न आणि जीवशास्त्रातील ९० प्रश्न असणार आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना १८० मिनिटांचा म्हणजे तीन तासांचा कालावधी दिला जाणार आहे. तसेच करोनामध्ये देण्यात आलेला अतिरिक्त कालावधीही कमी करण्यात आला आहे. या नव्या परीक्षेच्या पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना तयारी करण्याचा सल्ला एनटीएकडून देण्यात आला आहे.

**अपार कार्डबाबतही नीटकडून गोंधळ?**

विद्यार्थ्यांची अचूक ओळख पटवण्यासाठी आणि अर्ज प्रक्रिया सोपी, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासाठी नीट परीक्षा प्रक्रियेत आधार आणि अपार आयडीचा वापर करण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा कक्षाने घेतला होता. नीट यूजी २०२५ परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज प्रक्रिया सुरू होण्याआधी अपार आयडी तयार करून ते आधार कार्डशी संलग्न करण्याची सूचना करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक सर्व नोंदींसाठी हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या गोंधळामुळे राष्ट्रीय परीक्षा कक्षाला हा निर्णय मागे घ्यावा लागला.

**नीट परीक्षेत बदल कधी अपेक्षित?**

गतवर्षी नीट यूजी परीक्षेत झालेल्या गैरप्रकारामुळे नीट परीक्षेच्या स्वरूपात बदल करण्याची मागणी होऊ लागली होती. त्यानुसार राष्ट्रीय परीक्षा कक्षाकडून काही महत्त्वपूर्ण बदल केले जाण्याची शक्यता होती. मात्र गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर यंदाचे शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या सुमारास हा बदल जाहीर करणे अपेक्षित होते. मात्र राष्ट्रीय परीक्षा कक्षाने नीट यूजी परीक्षेला अवघे तीन महिने शिल्लक असताना हा बदल केला. नीट यूजी परीक्षेतील बदलांबाबत मागील दोन आठवड्यांत राष्ट्रीय परीक्षा कक्षाने सहा परिपत्रके जाहीर केली. अचानक घेण्यात आलेला हा निर्णय विद्यार्थ्यांसाठी मोठा धक्का होता.

**विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय धक्कादायक?**

नीट यूजी परीक्षेसाठी वर्षभर तयारी करणारे विद्यार्थी प्रश्नपत्रिका सोडविण्याच्या सरावाला प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांनी यंदाही मागील सलग काही वर्षांपासून सुरू असलेल्या परीक्षा पद्धतीनुसार सराव केला. परीक्षेचे स्वरूप बदलण्याचा निर्णय शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला घेतला असता तर त्यांनी त्यानुसार तयारी सुरू केली असती. आता ऐनवेळी परीक्षेचे स्वरूप बदलल्याने विद्यार्थ्यांचा गोंधळ होण्याची शक्यता आहे. नव्या बदलानुसार १८० मिनिटांतच परीक्षा द्यावी लागणार असून विद्यार्थ्यांना त्याची तयारी करावी लागणार आहे. हा बदल करताना राष्ट्रीय परीक्षा कक्षाने विद्यार्थ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष केल्याची चर्चा आहे.

**या बदलांबाबत न्यायालय काय म्हणते?**

परीक्षा तोंडावर आली असताना राष्ट्रीय परीक्षा कक्षाने घेतलेल्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसणे शक्य आहे. सर्वोच्च न्यायालयाने काही वर्षांपूर्वी दिलेल्या सूचनेनुसार परीक्षांमधील बदल विद्यार्थ्यांना किमान सहा महिने आधी कळवायला हवा. मात्र, त्याकडे राष्ट्रीय परीक्षा कक्षाने दुर्लक्ष केले. 'नीट' परीक्षेत वारंवार होत असलेल्या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी असे कठोर निर्णय घेणे आवश्यकच होते. राष्ट्रीय परीक्षा कक्षाने हा निर्णय घेण्यास इतका विलंब का केला असा प्रश्न निर्माण झाला आहे. परीक्षा तोंडावर असताना इतक्या उशिरा निर्णय घेणे हे विद्यार्थ्यांच्या हिताचे ठरणार नाही. यावरून आपली शिक्षण व्यवस्था विद्यार्थी केंद्री नसून, यंत्रणा केंद्री असल्याचेही स्पष्ट होते, असे म्हटले जात आहे.

---

अन्वयार्थ

# जनगणना कधी?

**करोना साथीमुळे** २०२१ मध्ये रखडलेली जनगणना होणार तरी कधी हा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात आहे. लोकसभा निवडणुकीनंतर जनगणना केली जाईल, अशी शक्यता वर्तविली जात होती. पण निवडणूक पार पडून आता वर्ष होत आले तरीही केंद्र सरकारकडून जनगणनेचे नावच घेतले जात नाही. २०२५ या वर्षातही जनगणना होण्याबाबत साशंकताच व्यक्त केली जाते आहे. कारण केंद्रीय अर्थसंकल्पात जनगणनेसाठी फक्त ५७४ कोटी ८० लाख रुपयांची करण्यात आलेली तरतूद. जनगणनेसाठी सुमारे १२ हजार कोटींची आवश्यकता असताना केवळ ५७५ कोटी म्हणजे एकूण अपेक्षित खर्चाच्या पाच टक्के तरतूद. एवढी अल्प तरतूद लक्षात घेता यंदाही जनगणना करण्याची मोदी सरकारची इच्छा दिसत नाही. दर दहा वर्षांने होणारी जनगणना लक्षात घेता २०२१ मध्ये जनगणना होणे अपेक्षित होते. त्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने डिसेंबर २०१९ मध्ये जनगणनेच्या कामासाठी ८,७५४ कोटी तर राष्ट्रीय लोकसंख्या कार्यक्रमाकरिता ३,९४१ कोटींच्या खर्चाला मान्यता दिली होती. २०२० मध्ये करोनामुळे साऱ्या भारतासह साऱ्या जगाचे व्यवहार ठप्प झाले. परिणामी केंद्रीय गृह मंत्रालयाला जनगणनेचे काम लांबणीवर टाकावे लागले. त्यानंतर करोनाची साथ आटोक्यात येऊन जनजीवन सुरळीत झाल्यावर जनगणना केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. २०२१-२२ या आर्थिक वर्षात जनगणनेच्या कामासाठी ३,७६८ कोटींची तरतूदही करण्यात आली होती. पण जनगणनेला अद्यापही मुहूर्त मिळालेला नाही. जनगणना कधी करणार या संदर्भात संसदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांवर 'लवकरच', असे मोघम उत्तर वेळोवेळी देण्यात आले. गेल्या वर्षी अर्थसंकल्प सादर करताना मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीत जनगणनेसाठी १,३०९ कोटींची तरतूद करण्यात आली होती. पण नंतर सुधारित अर्थसंकल्पात ही रक्कम कमी करून ५७२ कोटी करण्यात आली होती. पुढील आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात (२०२५-२६) जनगणनेच्या कामासाठी फक्त ५७५ कोटींची तरतूद करण्यात आल्याने यंदाच्या वर्षातही जनगणना होण्याबाबत साशंकताच व्यक्त केली जाते. याशिवाय तरतूद करण्यात आलेली बहुतांश रक्कम ही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते तसेच कार्यालयीन कामकाजावर खर्च होणार आहे.

जनगणना असो वा जातनिहाय जनगणना, केंद्रातील भाजप सरकारचा कोणत्याही मोजणीस विरोधच दिसतो. काँग्रेससह विरोधकांनी जातनिहाय जनगणनेची मागणी सातत्याने लावून धरली आहे. पण जातनिहाय जनगणनेला भाजपने कायम विरोधच केला. जातनिहाय जनगणनेच्या विरोधात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. बिहार सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला असता, राज्यांना असा अधिकारच नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात केला होता. जनगणना करायची झाल्यास त्यात जातनिहाय जनगणना हा कळीचा मुद्दा ठरू शकतो. देशातील ओबीसी, मागास घटकांकडून जातनिहाय जनगनणेची सातत्याने होणारी मागणी लक्षात घेता, केंद्रातील भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांना जातनिहाय जनगणनेच्या मागणीकडे दुर्लक्ष करता येत नाही. जनगणना करण्याचा निर्णय घेतला आणि त्यात जातनिहाय जनगणना नसल्यास तो पुन्हा राजकीय मुद्दा होणार. शिवाय जातनिहाय जनगणना केल्यास त्याचे सारे श्रेय काँग्रेसला जाईल. यामुळेच बहुधा केंद्रातील भाजप सरकारकडून जनगणनेचा मुद्दा बाजूला ठेवला जात असावा. अर्थसंकल्पातील अल्प तरतूद लक्षात घेता केंद्राची सध्या तरी तशी इच्छा दिसत नाही.

दुसरीकडे जातनिहाय जनगणनेची मागणी जोर धरू लागली आहे. 'पलटूराम' म्हणून प्रसिद्ध असलेल्या बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी, नितीशकुमार यांनी भाजपशी पुन्हा हातमिळवणी करण्यापूर्वी राज्यात जातनिहाय जनगणना केली होती. त्यात बिहारमधील ६५ टक्क्यांच्या आसपास लोकसंख्या ही मागास व दुर्बल घटकांमधील असल्याचे आढळले होते. दोनच दिवसांपूर्वी तेलंगणातील काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेचे निष्कर्ष जाहीर केले. तेथेही ५६ टक्के लोकसंख्या मागास व दुर्बल घटकांमधील असल्याची आकडेवारी समोर आली. कर्नाटकातील काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणना केली असली तरी लिंगायत व वोकलिंग या राजकीयदृष्ट्या प्रमुख जातींच्या विरोधामुळे निष्कर्ष अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत. शिवाय जातनिहाय जनगणना झाली तरी पुढे काय हा प्रश्न अनुत्तरित राहतो. केंद्राने जातनिहाय जनगणना करून त्या निष्कर्षांच्या आधारे नोकरीत आरक्षण, निधी वाटप करावे, अशी विविध सामाजिक संघटनांची भूमिका आहे. भाजपसाठी हे सारे अडचणीचे असावे. कदाचित यातूनच जनगणना नको नि जातनिहाय जनगणनाही नको, अशीच मोदी सरकारची भूमिका असावी. जनगणना बाजूला ठेवण्यातून २०२६ मध्ये करावी लागणारी मतदारसंघांची पुनर्रचना लांबणीवर टाकून उत्तर विरुद्ध दक्षिण अशी होऊ घातलेली दरीही टाळण्याचा प्रयत्न असावा. राजकीय कारणे काहीही असो, जनगणना होणार की नाही व झाली तर कधी हे प्रश्न अनुत्तरितच राहतात.

# रेल्वेचा जुन्या प्रकल्पांच्या पूर्णत्वावर भर

## काँग्रेस सरकारच्या काळातील मंजूर प्रकल्पांना वेग

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई रेल्वे विकास महामंडळाद्वारे (एमआरव्हीसी) मुंबईचा चेहरा बदलणारी प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पातील मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ (एमयूटीपी -३) ला ८ डिसेंबर २०११ रोजी मंजुरी मिळाली होती. काँग्रेस सरकारच्या काळात मंजुरी मिळालेल्या प्रकल्पांना आता वेग येणार आहे. मुंबईसह महाराष्ट्रातील रेल्वे सेवेबाबत सोमवारी माहिती देताना रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी एमयूटीपी ३ मधील पनवेल-कर्जत दुहेरी रेल्वे, विरार-डहाणू चौपदरीकरणाला गती देण्यात येणार आहे. तसेच जुने, रखडलेल्या प्रकल्पांना मार्गी लावण्याचे स्पष्ट केले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकताच अर्थसंकल्प सादर केला. यावेळी महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पासाठी २३,७७८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबाबत रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव म्हणाले की, यूपीए सरकारच्या काळातील अर्थसंकल्पांच्या २० टक्के अधिक आहे. सध्या महाराष्ट्रात १,५८,८६६ कोटी रुपयांच्या ६,९८५ किमी लांबीच्या रेल्वे मार्गाचे ४७ प्रकल्प सुरू आहेत. २०१४ सालापासून २,१०५ किमी नवीन रेल्वे मार्ग बांधण्यात आल्याने महाराष्ट्रातील रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण होईल. हे प्रमाण मलेशियातील रेल्वे मार्गापेक्षा अधिक आहे. तसेच २०१४ सालापासून १,०६२ रेल्वे उड्डाणपूल, भुयारी मार्ग तयार करण्यात आले आहेत, असे वैष्णव म्हणाले.

**बुलेट ट्रेनचा प्रकल्प उद्धव ठाकरेंमुळे रखडला – रेल्वेमंत्री**

देशातील पहिला मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प २०२३ मध्ये पूर्णत्वास येणार होता. मात्र हा प्रकल्प तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात रखडल्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले. दोन वर्षांपूर्वीही बुलेट ट्रेन प्रकल्प रखडल्याचा ठपका रेल्वेमंत्र्यांनी ठाकरे सरकारवर ठेवला होता, तर सोमवारी पुन्हा त्याची पुनरावृत्ती केली. गेल्या महिन्यात मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील सर्वात महत्वाच्या घणसोली येथील अतिरिक्त मध्यवर्ती बोगद्याच्या कार्यस्थळी रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव भेट दिली होती. त्यावेळी पत्रकारांनी त्यांना बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या अंतिम मुदतीबाबत प्रश्न विचारला असता, त्यांनी मौन बाळगले. तर सोमवारी पत्रकारांनी पुन्हा प्रकल्पाच्या अंतिम मुदतीबाबत प्रश्न विचारला असता, ठोस अपेक्षित अंतिम मुदतीची तारीख स्पष्ट केली नाही.




### अमृत स्थानके, आठ टर्मिनसचे नूतनीकरण...

- राज्यात १३२ अमृत स्थानके निर्माण करण्यात येत असून ५,५८७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.
- मुंबईतील प्रवाशांची गर्दी विभाजित करण्यासाठी आठ टर्मिनसचे नूतनीकरण केले जाणार आहे.
- मध्य रेल्वेवरील सीएसएमटी, परळ, एलटीटी, कल्याण आणि पनवेल, पश्चिम रेल्वेवरील मुंबई सेंट्रल, वांद्रे टर्मिनस, जोगेश्वरी या स्थानकामध्ये प्रवासी क्षमता वाढवली जाणार.
- प्रवासी सुविधा वाढवण्याच्या उद्देशाने प्रकल्पांसह विविध स्थानकांवर आणि इतर महत्त्वाच्या स्थानकांवर पायाभूत सुविधांच्या विकासावर वैष्णव यांनी चर्चा केली.
- एमयूटीपी तीन आणि एमयूटीपी तीन ए यांसारख्या प्रकल्पांना गती देण्यात येणार आहे.
- सध्या मुंबई उपनगरीय मार्गावरून ३,०३२ लोकल धावत असून, येत्या वर्षात लोकल फेऱ्यांमध्ये १० टक्के वाढ होणार आहे. त्यामुळे मुंबईकरांचा प्रवास सुखकर होईल, असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला.

# नदीजोड प्रकल्प राज्याला कर्जाच्या खाईत लोटणारा

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची टीका

लोकसत्ता वार्ताहर



**गोंदिया :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असलेला नदी जोड प्रकल्प हा आधीच लाखो कोटींच्या कर्जात असलेल्या महाराष्ट्राला परवडण्यासारखा नाही. हा प्रकल्प राज्याला आणखी कर्जाच्या खाईत लोटणारा आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली.

पटोले हे पिंपळगाव/सडक येथे तीनदिवसीय कृषी प्रदर्शन व कृषी विकास परिषद शंकरपटाचे उद्घाटन कार्यक्रमाला आले असता माध्यमांशी बोलत होते. या कार्यक्रमाला खासदार प्रशांत पडोळे, खासदार प्रफुल्ल पटेल, जिल्हा परिषद अध्यक्ष कविता उईके, उपाध्यक्ष एकनाथ फेंडर यांचीही उपस्थिती होती.

पटोले म्हणाले, नदी जोड प्रकल्पाला लाखो कोटींची रक्कम लागणार आहे हे पैसे राज्य सरकार आणणार कुठून, असा प्रश्न मी फडणवीस यांना विचारला होता. त्यावर ते म्हणाले होते की, पैसे केंद्रातून आणणार आहेत. अर्थसंकल्पात काही आर्थिक तरतूद होईल असे वाटत होते. पण, 'डबल इंजिन'चा तोरा मिरवणाऱ्यांनी अर्थसंकल्पात तरतूद केली नाही. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केलेल्या भाषणाचा उल्लेख आम्ही त्यांच्या लक्षात आणून देत आहोत. शेतीला, उद्योगाला आणि जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे ही आमची भूमिका आहे. या प्रकल्पाबाबत आता पुढे काय होते ते आम्ही बघू व पक्षाची भूमिका ठरवू असे पटोले यांनी स्पष्ट केले.

# म्हाडाच्या ४९३ घरांसाठी मार्चमध्ये सोडत

**मुंबई :** म्हाडाच्या नाशिक मंडळाकडून ४९३ घरांसाठी सोडत काढण्याचा निर्णय घेण्यात आला असून २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ही घरे असून त्यासाठी दोन ते तीन दिवसांत जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे, तर ७ फेब्रुवारीपासून सोडतपूर्व प्रक्रियेला अर्थात नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

सर्वसामान्यांना म्हाडाच्या माध्यमातून परवडणाऱ्या दरात खासगी विकासकाच्या प्रकल्पातील अत्याधुनिक सोयीसुविधा असलेली घरे उपलब्ध व्हावीत यासाठी राज्य सरकाने २० टक्के सर्वसमावेशक योजना आणली आहे. नाशिकमधील विकासकांकडून मात्र २० टक्क्यातील घरे म्हाडाला देण्यास टाळाटाळ केली जात आहे. ही योजना आपल्याला कशी लागू होणार नाही यासाठी विकासकांकडून पळवाटा शोधल्या जात आहेत. असे असले तरी म्हाडा आणि नाशिक मंडळ विकसकांकडून २० टक्क्यांतील घरे मिळावीत यासाठी पाठपुरावा करत आहे. त्यानुसार नाशिक मंडळाला ४९३ घरे उपलब्ध झाली आहेत. त्या घरांसाठी जानेवारीत सोडत काढण्यात येणार होती. पण काही कारणाने या सोडतीस विलंब झाला आहे. पण आता मात्र या सोडतीची तयारी अंतिम टप्प्यात असून दोन ते तीन दिवसात ४९३ घरांच्या सोडतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

# धनगर समाजाबाबतचा अहवाल जाहीर करण्यास चालढकल

## आदिवासी संघटनांचा आरोप

राजेश्वर ठाकरे, लोकसत्ता

**नागपूर :** राज्य सरकार राजकीय स्वार्थासाठी धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, धनगर समाजाच्या विरोधात गेलेला टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टीस)चा अहवाल जाहीर करण्यात चालढकल करीत आहे. तसेच नव्याने स्थापन केलेल्या अभ्यासगटाचा अहवालही सार्वजनिक न करता समाजाची दिशाभूल करीत आहे, असा आरोप आदिवासी संघटनांनी केला आहे.

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाने २० नोव्हेंबर २०२३ ला अभ्यासगट स्थापन केला. त्याला आदिवासी संघटनांनी विरोध दर्शवला. तरी राज्य सरकारने तो रेटून नेला. भटक्या संवर्गात ३.५ टक्के आरक्षण असलेल्या गैरआदिवासी धनगर जातीला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्याचा असंविधानिक प्रयत्न करीत असल्याचा आरोप आदिवासी संघटनांनी केला होता. तत्पूर्वी २०१५ मध्ये तत्कालीन सरकारने 'धनगर किंवा धनगड एक आहे किंवा कसे?', या संदर्भातील मानववंशशास्त्रीय अभ्यास व राज्यातील धनगर समाजाच्या सर्वेक्षणाचे काम टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स (मुंबई) या संस्थेला दिले होते. हा अहवाल दोन टप्प्यात तयार करून २०१५ मध्येच राज्य सरकारला सादर करण्यात आला. त्यासाठी राज्य सरकारने साधारणतः २.५० कोटी रुपये खर्च केले, परंतु अहवाल अजूनही जाहीर करण्यात आला नाही.

त्यानंतर नोव्हेंबर २०२३ रोजी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसंदर्भात अभ्यासगट करण्यात आला. हा अभ्यासगट मध्यप्रदेश, बिहार, तेलंगणा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, कर्नाटक व गोवा या राज्यांची त्यांच्या अधिकारामध्ये त्या राज्यांतील जातनिहाय यादीमध्ये समावेश असलेल्या काही विशिष्ट जाती आणि जमातींना अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र तसेच लाभ देण्याबाबत अवलंबलेल्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी होते. त्याचाही अहवाल अजून जाहीर झाला नाही. हे दोन्ही अहवाल राज्य सरकारने जाहीर करावे, अशी मागणी ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनने केली आहे.

> राज्य सरकारने 'टीस'चा अहवाल जाहीर करायला हवा. निव्वळ राजकीय लाभापोटी धनगरांना आदिवासींमध्ये समाविष्ट करण्याचा डाव असल्याचा आरोप आदिवासी समाजातून होत आहे. धनगर हे आदिवासी नाहीत हे यापूर्वी नेमलेल्या अनेक आयोगांच्या अहवालावरून सिद्ध झाले आहे.
> – प्रा. मधुकर उईके, केंद्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन.

# विधानसभा निवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान

## शेवटच्या मिनिटांसह अधिकृत वेळेनंतर झालेल्या भरघोस मतदानाबाबत शंका

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** गेल्या नोव्हेंबर महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत सहा वाजल्यानंतर सुमारे ७५ लाख मतदारांनी मतदान केले. परंतु प्रत्यक्ष मतदान आणि मिळालेली मते यात तफावत असल्याचा दावा करून ही निवडणूक रद्दबातल घोषित करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली. न्यायालयानेही या याचिकेची दखल घेऊन केंद्रीय मुख्य निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना नोटीस बजावली व याचिकेत करण्यात आलेल्या आरोपांवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

विक्रोळीस्थित चेतन अहिरे यांनी ही याचिका केली असून न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील प्रकाश आंबेडकर यांनी मतदानाच्या दिवशी शेवटच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याची विशेष करून मतदान संपल्यावर सायंकाळी सहानंतर योग्य त्या चिठ्ठीशिवाय मतदान केले गेल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर प्रत्यक्ष मतदान आणि मिळालेल्या मतांच्या संख्येत तफावत असल्याचा दावा कशाच्या आधारे याचिकाकर्ते करत आहेत, अशी विचारणा न्यायमूर्ती गडकरी यांनी केली. त्यावेळी, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे माहितीच्या अधिकारांतर्गत ही माहिती मागण्यात आली होती. पण ती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आलयाचा दावा आंबेडकर यांनी केला. आंबेडकर यांचा थोडक्यात युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने केंद्रीय मुख्य निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना नोटीस बजावली. तसेच, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रकरणाची लवकर सुनावणी घेण्याची याचिकाकर्त्यांची मागणी मान्य करून याचिकेवरील सुनावणी दोन आठवड्यांनी ठेवली.

याचिकाकर्त्याने नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीला याचिकेद्वारे आव्हान देऊन निवडणूक रद्दबातल करण्याची मागणी केली आहे. याचिकेत, या निवडणुकीच्या शेवटच्या काही मिनिटांत आणि मतदानाच्या अधिकृत वेळेनंतरही मतदानाच्या प्रमाणापेक्षा जास्त मतदान झाल्याबाबत संशय उपस्थित करण्यात आला आहे.

### याचिकाकर्त्यांचे दावे काय?

मतदानाच्या शेवटच्या मिनिटांत आणि नंतरच्या तासांत अंदाजे ७५,००,००० पेक्षा जास्त मते टाकण्यात आली. तथापि या मतांची नोंद किंवा सत्यता पडताळण्याची कोणतीही पारदर्शक प्रणाली प्रदान करण्यात आलेली नाही. ९५ मतदारसंघांमध्ये आणि त्याच्या आसपासच्या मतदारसंघांमध्ये झालेले मतदान आणि निकालाच्या वेळी मिळालेली मते यांच्यात तफावत दिसून आली. मतदानाच्या दिवशी सायंकाळी पाच वाजल्यापासून ते मतदानाची वेळ संपेपर्यंत सुमारे ६.८०% मतदारांनी मतदान केल्याकडेही याचिकेत लक्ष वेधण्यात आले. प्रत्यक्ष मतदान आणि मिळालेल्या मतांमध्ये तफावत आढळून आल्यास संबंधित निवडणूक अधिकाऱ्याने निकाल जाहीर करू नये, असा नियम आहे. परंतु, या सगळ्या प्रक्रियांना बगल देण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला.

### वाढीव मतदान घोळातून महायुती सत्तेवर- राऊत

नाशिक : विधानसभा निवडणुकीत शेवटच्या तासात वाढलेली ७६ लाख मते हाच कळीचा प्रश्न आहे. या मतांचा हिशेब केल्यास प्रत्येक विधानसभा मतदारसंघात २० ते २५ हजार मतदान वाढले. प्रत्येक केंद्रावर १०० ते १५० मते वाढवली. या घोळातून राज्यात देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे सरकार स्थापन होऊ शकले, असा आरोप शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी केला.

# महाबळेश्वर, मुंबईत 'मधुबन हनी पार्क'




लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या पुढाकाराने सीएसआरच्या मदतीने राज्यात दोन मधुबन हनी पार्क उभारण्यात येत आहेत. पहिल्या हनी पार्कचे महाबळेश्वर येथील मध संचनालयात मंगळवारी (४ फेब्रुवारी) उद्घाटन होत आहे, तर दुसरे मुंबईतील राजीव गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली येथे होणार आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळाने सीएसआर निधी उभारून मध उत्पादनाला चालना देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. एव्हरेस्ट मसाले यांनी दिलेल्या सहा लाखांच्या सीएसआर निधीमधून महाबळेश्वर येथील मध संचालनालयाच्या आवारातील तीन एकर जागेत मधुबन हा हनी पार्क उभारला आहे. या पार्कमध्ये ३० मध पेट्या ठेवण्यात आल्या आहेत. मध पेट्यांसह मध संकलन यंत्र, मध प्रक्रिया, स्वार्मनेट, राणी माशी पैदास उपकरण, पोलन ट्रॅप, अँटी वेल एंड फिंडिंग, बी व्हेल आदी उपकरणे ठेवण्यात येणार आहेत. मध माशांचा अभ्यास करण्यासाठी येणारे शेतकरी, मधपाळ, शालेय सहलीमधून येणारे विद्यार्थी आणि पर्यटक आदींना एकाच ठिकाणी मध उत्पादनाची सर्व माहिती प्रात्यक्षिकांसह मिळणार आहे. महाबळेश्वर येथील मध संचालनालय एक्सलन्स सेंटर व्हावे, असा प्रयत्न महामंडळाच्या माध्यमातून सुरू आहे.

> महाबळेश्वर येथे देशात एकमेव स्वतंत्र मध संचालनालय आहे. या संचालनालयास सेंटर ऑफ एक्सलन्स करण्याचे नियोजन आहे. त्या दिशेने मधुबन हनी पार्क हे पहिले पाऊल आहे. खासगी कंपन्यांच्या सीएसआर निधीच्या माध्यमातून मध उत्पादन गती दिली जात आहे.
> – रवींद्र साठे, सभापती, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळ.

# 'संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांची पाठराखण का?'

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपींची पाठराखण का केली जात आहे, असा सवाल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ते सोमवारी नागपुरात माध्यमांशी बोलत होते.

वडेट्टीवार म्हणाले, गुन्हेगाराला जात, धर्म, पंथ नसतो. त्यामुळे साधू, संत महंतांनीही आरोपींवर कठोर कारवाईची मागणी करायला हवी होती. तर त्यांचे श्रेष्ठत्व दिसले असते. संतोष देशमुख प्रकरणाला मराठा विरुद्ध ओबीसी रूप देण्याचा प्रयत्न सुरू आहे, हे योग्य नाही. गुन्हेगार आमच्या समाजाचा आहे म्हणून त्याला पाठीशी घाला, असे सगळेच म्हणायला लागले तर कायदा आणि सुव्यवस्था उरणार नाही. सरपंच देशमुख यांची हत्या ही भयावह घटना आहे. त्यामुळे आरोपींना पाठीशी घालणारे नालायक ठरतील.



# पाचशे मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी

## रहिवासी, ओळख प्रमाणपत्र देण्याचे अधिकार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** रहिवासी व ओळख प्रमाणपत्रासह नैसर्गिक आपत्तीत पंचनामे सादर करणे, पोलीस विभागाला मदत करण्याच्या उद्देशाने राज्यात प्रत्येक पाचशे मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यानुसार राज्यात १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार आहेत.

एक हजार मतदारांमागे आता एक ऐवजी दोन विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार आहेत. सरकारने याविषयीचा शासन निर्णय जारी केला असून नवीन निर्णयामुळे आतापर्यंत विशेष कार्यकारी अधिकारीपदावर असलेल्यांचे पद संपुष्टात आले आहे. नव्याने अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यातल्या निवड समिती नेमण्यात येणार असून यातून अधिकाऱ्यांची निवड व नेमणूक केली जाणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीत पंचनामे व इतर कार्यात मदत करणे, ग्रामीण भागात चोरी, शांतताभंग यासारख्या कृत्यांत नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांना सहकार्य करणे, सरकारी योजनांच्या प्रचारासाठी सहकार्य करणे, मतदारांची माहिती निवडणूक विभागाला देण्यास सहकार्य करणे, गुन्ह्यांतील पंचनाम्यात पोलिसांना सहकार्य करणे आदी कामे त्यांच्यावर सोपविण्यात आली आहेत.

विशेष कार्यकारी अधिकारी होण्यासाठी किमान दहावी उत्तीर्ण असावे लागेल. वय २५ वर्षांपेक्षा जास्त आणि ६५ पेक्षा कमी असावे. ज्या तरुणांना, नागरिकांना सामाजिक कामांमध्ये रस आहे, त्या तरुणांना नागरिकांना यामध्ये संधी मिळणार आहे. महसूल मंत्री राज्याच्या निवड समितीचे अध्यक्ष राहणार असून जिल्हास्तरावर पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांची समिती असणार आहे. विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना निवासस्थान किंवा दुकानावर पाटी लावण्याची मुभा असेल. पण वाहनावर विशेष कार्यकारी अधिकारी हे लिहण्यास परवानगी नसेल.

### पुण्यात सर्वाधिक अधिकारी

मतदारांच्या संख्येच्या तुलनेत विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार आहेत. राज्यात सर्वाधिक मतदार असलेल्या पुणे जिल्ह्यात १७,६९९ विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार आहेत. मुंबई उपनगर (१५,७३२), ठाणे (१४,४५९), नाशिक (१०,१२२) विशेष कार्यकारी अधिकारी असतील.




### वजनदार आमदार खरे 'खरे' बोलले?

**विधानसभा निवडणुकीत** भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीला भरभरून यश मिळाल्यानंतर कमकुवत झालेल्या महाविकास आघाडीचा पाया खचू लागला आहे. आघाडीच्या शिल्लक आमदारांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. सोलापूर जिल्ह्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे चार आमदार निवडून देऊन पक्षाची इभ्रत राखली असताना आता त्यातील एक आमदार 'खरे' बोलू लागला आहे. त्याच्या बोलण्यात खरेपणा किती आणि स्वार्थ किती, याची रंगतदार चर्चा होत आहे. मोहोळ राखीव मतदारसंघातून निवडून आलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पक्षाचे आमदार राजू खरे यांनी आपण खरे शिवसेनेचेच आहोत. विधानसभा निवडणुकीत तुतारी चिन्ह चुकून घेतले होते. आज राज्यात सत्ता आपलीच आहे, असे नुकतेच एका जाहीर कार्यक्रमात बोलून गेले.. खरे आमदार झाल्यानंतर सुरुवातीला त्यांच्या शारीरिक वजनाची चर्चा सुरू होती. त्याचा उल्लेख खुद्द शरद पवार यांनी केला होता. परंतु आता हा 'वजनदार' आमदार 'खरे' बोलू लागल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात वेगळी कुजबुज ऐकायला मिळते.

### चंद्रकांतदादांची 'साखरझोप'



**उच्च व तंत्र** शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील हे स्पष्ट वक्तेपणाबद्दल ख्यातकीर्त आहेत. बोलताना कुणाची भीडभाड न ठेवता ऐकणाऱ्याला चांगले वाटावे, किंबहुना बरे वाटावे याची तमा न बाळगता ते बोलत असतात. सांगलीत एका कार्यक्रमात आयोजकांनी आपली रास्त मागणी दादांच्यापुढे मांडली. याला उत्तर देताना दादा निश्चितपणे ठोस आश्वासन देतील अशी अपेक्षा असताना दादा म्हणाले, मी महसूलमंत्री असताना ज्या ज्या प्रकरणी निकाल दिले, त्यापैकी सर्वच प्रकरणे न्यायालयात सिद्ध झाली. यामुळे कोणतीही फाइल सही करण्यापूर्वी मी विचार करूनच सही करतो. अगदी झोपेत असलो तरी सावध असतो. आता दादा झोपेत असतानाही सावध असतात तरीही महसूल खाते आधी विखे-पाटील व नंतर बावनकुळे यांच्या हाती जाताना दादा बहुधा साखरझोपेत होते का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### घड्याळ, तुतारी एकच !

**सातारा जिल्हा** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचा मेळावा खासदार नितीन पाटील, आमदार सचिन पाटील, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर आदींच्या उपस्थितीत पदाधिकारी निवडीसाठी आयोजित करण्यात आला होता. यावेळी पदाधिकारी नियुक्त्यांवेळी जिल्हाभरातून अनेक पदाधिकारी आले होते. यामध्ये एका कार्यकर्त्याच्या मोबाइलच्या मागील बाजूस तुतारीचे चिन्ह चिकटवलेले होते. त्याचा मोबाइल शर्टच्या खिशात असल्याने तुतारीचे चिन्ह स्पष्ट दिसत होते. याची कल्पना त्याला नसावी. त्यावर तुम्ही घड्याळाच्या राष्ट्रवादीचे की त्या तुतारीच्या राष्ट्रवादीचे, असा प्रश्न साहजिकच विचारण्यात आला. घड्याळ काय आणि तुतारी काय. हे एकच आहेत या कार्यकर्त्याच्या उत्तराने सारेच अचंबित झाले.

### नवीन जिल्हा कशासाठी?

**कोल्हापूर जिल्ह्यात** सध्या नव्या मंत्र्यांची चलती आहे. त्यांचे जळीस्थळी कौतुक केले जात होते. प्रसिद्धीचा झोत त्यांच्याकडेच वळला आहे. त्याची नाही म्हटले तरी जुन्या मंत्र्यांना बोचणी लागली आहे. कोणाला कमी महत्त्वाचे खाते मिळाल्याबद्दल तर कोणाला मंत्रीपद हुकल्याबद्दल. याची खंत जागा मिळेल तिथे व्यक्त केली जात असल्याचे दिसत आहे. विधानसभा निवडणूक झाल्यानंतर रविवारी जिल्हा नियोजन मंडळाची पहिली बैठक पार पडली. अवघे प्रशासन, आमदार, खासदार, कार्यकर्ते हे सारेच पालकमंत्री प्रकाश आबिटकर, सहपालकमंत्री माधुरी मिसाळ यांच्या आगे मागे झुलत होते. प्रकाशझोत त्यांच्या भोवतीच एकवटला होता. यावर माजी राज्यमंत्री राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी टोलेबाजी करीत आता आम्हाला कोणी विचारत नाही, अशी व्यथा मांडली. आमचे महत्त्व वाढायचे असल्यास पूर्वेकडील भागाचा स्वतंत्र जिल्हा झाला पाहिजे. मग मला आणि प्रकाश आवाडे... दोघांनाही महत्त्व येईल. राजकीय महत्त्व येण्यासाठी आता कोल्हापुरात नव्या जिल्ह्याची पेरणी केली जात आहे.

**(संकलन : दिगंबर शिंदे, विश्वास पवार, एजाज हुसेन मुजावर, दयानंद लिपारे)**

कार्यालय जोधपुर विकास प्राधिकरण, जोधपुर

क्रमांक :- जोविप्रा/2024-25/EE HQ/2365 दिनांक :- 31/01/2025

ई.ओ.आई सूचना संख्या -मुख्यालय - 43/2024-25

जोधपुर विकास प्राधिकरण, जोधपुर की ओर से प्राधिकरण क्षेत्राधिकार में विभिन्न कार्यो हेतु ई.ओ.आई में निर्धारित शर्तो को पूर्ण करने वालो से निर्धारित प्रपत्र में ई–प्रोक्युरमेन्ट प्रक्रिया से ऑन लाईन ई.ओ.आई आमंत्रित की जाती है। इन कार्य की अनुमानित लागत, ई.ओ.आई बेचे जाने तथा प्राप्त करने की दिनांक, ई.ओ.आई, शर्ते आदि सम्पूर्ण विवरण वेबसाईट www.jodhpurjda.org, www.eproc.rajasthan.gov.in एवं www.sppp.raj.nic.in पर देखी जा सकती है। UBN No. : JOD2425SSOB00354, 00355, 00356, 00357

राज.संवाद/सी/24/11168 अधिशाषी अभियंता

JAIPUR DEVELOPMENT AUTHORITY
Indira Circle, Jawahar Lal Nehru Marg, Jaipur - 302004

No. JDA/EE(Garden-I)/2025/D-115 Dated: 03.02.2025

NOTICE INVITING BID
NIB NO.: JDA/EE/(Garden-I)/23/2024-25

Online Bids are invited up-to 06:00 PM of 28.02.2025 for "Maintenance and Management of the Kishan Bag Project." The last date for Applying Bid and making online payment on JDA portal is up-to 06:00 PM of 28.02.2025. The estimated cost of NIB is Rs. 363.00 Lacs. Details may be seen in the Bidding Document at our office or the State Public Procurement Portal website www.sppp.rajasthan.gov.in, www.eproc.rajasthan.gov.in and www.jda.rajasthan.gov.in/jda
UBN: JDA2425WSOB00499
To participate in the bid, bidder must
A. Participate in Tender & Deposit Payment on 'Online Tender Participation' Portal of JDA at https://jda.rajasthan.gov.in/jda or by Single-Sign-On at http://service.jaipurjda.org.
B. Submit e-Bid on 'e-Procurement Portal' of GOR at www.eproc.rajsthan.gov.in

Raj.Samwad/C/24/11196 Executive Engineer (Garden-I)




# कृत्रिम प्रज्ञेच्या पुरवठादार

**आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ही संकल्पना नवी नाही. गेली काही वर्षे त्याविषयी ऐकले, बोलले जात आहे. खरी क्रांती आली आहे ती जनरेटिव्ह एआय आल्यापासून. म्हणजे केवळ उपलब्ध माहितीच्या पुढे जाऊन एआय आपल्या गरजेनुसार माहिती तयार करू लागला तेव्हापासून एआयने हलकल्लोळ माजवला आहे. याच जनरेटिव्ह एआयच्या आधारे साताऱ्यातील एका मध्यमवर्गीय मुलीने आपला उद्योग सुरू केला. विशेष म्हणजे तिचे शिक्षण प्रचलित कॉम्प्युटर सायन्स किंवा आयटीतून झालेले नाही. कंपन्यांना एआयबेस्ड सोल्युशन्स पुरवण्याचे काम करतात उज्ज्वला फडतरे या नवउद्यमी. त्यांच्या उद्योगाविषयी जाणून घेऊ त्यांच्याच शब्दांत.**



**माझं शिक्षण** जनरल सायन्समधील. साताऱ्यातील महाराजा सयाजीराव कनिष्ठ महाविद्यालयात बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. बीएस.सी.,एम.एस.सी यशवंतराव चव्हाण विज्ञान महाविद्यालयातून केले. मी बीएससी इन मॅथेमटिक्स केले आहे. मास्टर्स क्वांटम मॅथेमॅटिक्समधून केले. पुढे क्वांटम कॉम्प्युटिंगवर संशोधन-विकास सुरू केला होता. तेव्हा आमच्या महाविद्यालयात २०१८ साली विनायक गोडसे यांचे एक व्याख्यान होते. येत्या दशकात टेक ट्रेंड्स काय असतील या विषयावर त्यांचे व्याख्यान होते. प्लेन बीएससी करणारेही जर त्यांनी गणित, स्टटेस्टिक्ससारखे अनालिटिकल विषय घेतले असतील तर तेही कॉम्प्युटर, एआयमध्ये काम करू शकतात, असाच त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विनायक गोडसे सर हे डीएससीआय (डेटा सिक्युरिटी काऊन्सिल ऑफ इंडिया) चे सीईओ आहेत. जर कोणी या नवीन टेक्नॉलॉजीमध्ये करिअर करू इच्छित असेल तर आम्ही पूर्ण पाठिंबा देऊ, असं आवाहन त्यांनी केलं. मी तयार झाले. स्नेहा घारगे आणि ऋतुजा साळुंखे या दोघीदेखील माझ्यासोबत आल्या.

आम्ही चार डोमेनमध्ये काम करत आहोत - जनरेटिव्ह आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशिन लर्निंग, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि हार्डवेअर डेटा मॅनेजमेंट सिस्टीम. आम्ही कंपन्यांना कस्टमाइज्ड एआय सोल्युशन्स पुरवतो. उदाहरणार्थ, एखाद्या स्टार्ट अपला किंवा एखाद्या कंपनीला त्यांच्या उद्योगात एआय आणायचे आहे तर आम्ही सर्वात आधी एआय असेसमेंट करतो, म्हणजे त्यांच्या कंपनीत एआयची काय गरज असू शकते त्याचा अभ्यास करतो आणि त्यानंतर पीओसी करतो. (प्रूफ ऑफ कन्सेप्ट म्हणजे जे अमलात आणायचे ते खरेच आणता येणार आहे का) आणि मग नंतर जेव्हा ते यशस्वी होईल तेव्हा त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून कंपनीला ते उपलब्ध करून देतो.

याशिवाय आमचे दुसरे एक प्रोडक्ट आहे ते म्हणजे - रेझ्युमे आणि जॉब डिस्क्रीप्शन जनरेटिव्ह एआयच्या आधारे मॅच करणे. मार्केटमध्ये या प्रकारचे प्रोडक्ट आहेत, पण आतापर्यंत पारंपरिक एआयच्या आधारे रेझ्युमे आणि जॉब डिस्क्रीप्शन जुळवले जात होते. पण आता हेच आम्ही जनरेटिव्ह एआयच्या आधारे करणार आहोत. २०१९ ला आम्ही आमची क्यूहिल्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. नावाची कंपनी नोंदणी केली. विनायक गोडसे सर आमचे मेंटॉर आहेत. कंपनीसाठी गीता गोडसे आणि डॉ. गीतांजली पोळ या दोघींनी सुरूवातीचे फंडिंग दिले. त्यातून आम्ही हे स्टार्टअप सुरू केले. स्टार्टअपसाठी सुरू झालेले असे आमचे हे स्टार्टअप आहे. एखादी स्टार्टअप आयडिया आहे आणि त्यांना अर्ली मार्केटमध्ये यायचे असेल तर त्यांना एक कम्प्लीट डिजिटल प्लटफॉर्म आम्ही उपलब्ध करून देतो. त्याला आम्ही डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन म्हणतो, त्यात एआयसह अन्य सर्व गोष्टी उदाहरणार्थ, वेब प्लटफॉर्म, वेब अप्लिकेशन वगैरे आम्ही देतो. आम्ही अनेक कंपन्यांसाठी सोल्युशन बनवले आहेत. आमची कंपनी साताऱ्यातलीच नोंदणीकृत आहे. आणि ऑफिस सायन्स कॉलेजमधीलच एक इनक्युबेशन सेंटर आहे, तिथून आम्ही ऑपरेट करतो.

आमची आता १५ लोकांची टीम आहे. आतापर्यंत सायन्स कॉलेजमधील विद्यार्थ्यांनाच प्रशिक्षण देत होतो, पण आता आमच्याकडे एमएससी मॅथेमॅटिक्स, स्टॅटेस्टिक्स, इंजिनीअर, एमबीए सेल्ससाठी अशी टीम वाढवली आहे. गेल्यावर्षीपर्यंत तर आम्ही स्वतःला टेक्निकली अधिक बळकट करण्याचंच उद्दिष्ट ठेवलं होतं. पण आता आम्ही मार्केटिंगवरही भर देत होतो.

**कुटुंबाचा पाठिंबा**

मी मूळची साताऱ्याचीच. देगाव हे माझे गाव. मध्यमवर्गीय कुटुंब आहे. माझे आई-वडील शिवणकाम करतात. शिक्षणाबाबत मात्र त्यांनी मला कायम पाठिंबा दिला. नवीन व्यवसाय सुरू करायचा याची कल्पना मी त्यांना दिली. मी काय करतेय हे त्यांना कळत नव्हतं, ते पुढे किती यशस्वी होईल वा नाही याचीही खात्री नव्हती, तरी त्यांनी मला रोखलं नाही, उलट माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. गेल्याच वर्षी माझे लग्न झाले. सासरहून देखील मला पूर्ण सहकार्य मिळत आहे.

**आयआयटी मुंबईसोबत काम**

सांगली, कोल्हापूरला जो पूर आला होता, तेव्हा नेमकी कोणती कारणे, कोणत्या गोष्टी डेटा रिलेटेड गोष्टींचा आम्ही रिपोर्ट बनवला होता. केस स्टडीत केवळ एवढंच केलं होतं. पण २०२४ मध्ये आयआयटी मुंबईचा एक जीआयसी हब (जोश पटेल सेंटर) आहे, त्यांची आपत्कालीन व्यवस्थापनावर एक स्पर्धा होती, त्यात आम्ही सहभाग घेतला होता. त्यांच्याकडून आम्हाला या प्रोजेक्टवर काम करण्यासाठी निधी मिळाला. आतापर्यंत आम्ही केवळ रिपोर्ट बनवला होता पण त्यांनी आम्हाला डिझास्टर मनेजमेंट सिस्टीम बनवायला सांगितली. कोणत्याही आपत्कालिन परिस्थितीचा आधी अंदाज, नंतर प्रत्यक्ष ती स्थिती निर्माण होईल त्यावेळी तिथल्या स्थानिक प्राधिकरणाला मदत म्हणून तेथील जवळची गावे, कुठून मदत मिळेल ती ठिकाणे मॅप करून देणे आणि मग आपत्कालिन परिस्थितीनंतरचे पुनर्वसन. या सिस्टीमवर आम्ही आयआयटी मुंबईसोबत काम करत आहोत. याच कामासाठी आम्हाला एमएसआयएनएस (महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी) मार्फत 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर वुमन्स स्टार्ट अप स्कीम' अंतर्गत 'इनोव्हेटिव्ह टेक सोल्युशन्स फॉर रिअल वर्ल्ड चलेंजेस' या कॅटेगरीत आम्हाला पुरस्कार मिळाला.

एआय खूप वर्षांपूर्वी आलं. पण जेव्हापासून जनरेटिव्ह एआय आलं तेव्हापासून खूप बदल झाले आहेत. एआयने कंपन्यांची कामे सोपी होत आहेत, पण डेटा सिक्युरिटी, प्रायव्हसी या गोष्टींच्या माध्यमातून नवी आव्हाने देखील निर्माण होणार आहेत. त्याला आपण सक्षमपणे सामोरे जायला हवे.

**(शब्दांकन : मनीषा देवणे)**

# आयटीचे अभ्यासक्रम आणि एआय




अतुल कहाते

**सगळीकडे एआयचा बोलबाला असल्यामुळे जवळपास प्रत्येक महाविद्यालयामध्ये एआयमध्ये बीई, बीटेक, बीएससी, एमसीए, एमएससी अशा पदवी निघालेल्या आहेत. यामुळे आधीच गांगरून गेलेला पालकवर्ग अजूनच संभ्रमात पडतो. विद्यार्थी जे कानांवर पडतं त्यावरून आणि नेहमीप्रमाणे आपल्या मित्रमैत्रिणींच्या निर्णयामुळे प्रभावित होऊन पालकांकडे एआयचीच पदवी घेण्यासंबंधीचा हट्ट धरतात. अशा वेळी नेमकं काय केलं पाहिजे?**

**काही वर्षांपूर्वी** अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये संगणकशास्त्रासाठीच्या जागांची मागणी प्रचंड वेगानं वाढत गेल्यावर पुरेशा जागा उपलब्ध नसल्याच्या अडचणीवर शिक्षण उद्योगानं एक भन्नाट युक्ती योजली. तोपर्यंत संगणकशास्त्राच्या पदवीसाठी फक्त 'कम्प्युटर सायन्स (सीएस)' नावाची एक शाखा उपलब्ध असायची, त्यासोबतच आता 'इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (आयटी)' अशी नवी शाखा यातून जन्माला आली. अनेक वर्षं विद्यार्थी आणि पालक या दोघांचाही या दोन शाखांमधल्या फरकांबद्दल विलक्षण गोंधळ असायचा. खुद्द महाविद्यालयांमधल्या व्यवस्थापन तसंच शिक्षक या दोन्ही वर्गांना या बाबतीमधलं सुस्पष्ट असा खुलासा देता येत नसे. याचं कारण म्हणजे हे निव्वळ आर्थिक निकषांवर केलेलं असल्याची निखळ कबुली देण्याची जोखीम कुणालाच पत्करायची नसायची. त्यामुळे 'सीएस'मध्ये जास्त संकल्पनात्मक विषय असतात, तर 'आयटी'मध्ये जास्त प्रात्यक्षिकांचे विषय असतात असं काहीसं गुळमुळीत बोलून प्रश्न निकालात काढला जात असे.

आता संगणकशास्त्र हीच मुळात एक मूळ शाखा बनलेली असून तिच्या उपशाखा जन्माला येताना दिसतात. उदाहरणार्थ माहितीच्या सुरक्षिततेसाठी 'सायबर सिक्युरिटी', सॉफ्टवेअरनिर्मितीसाठी 'सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट', क्लाऊड तंत्रज्ञानासाठी 'क्लाऊड कम्प्युटिंग' असं करत करत एआयसाठी स्वतंत्र उपशाखा निर्माण होणं अगदी स्वाभाविकच आहे. याची साधारण दोन मुख्य प्रारुपं दिसतातः एक तर नेहमीसारखीच संगणकशास्त्राची पदवी घ्यायची; पण एआयमध्ये विशेष प्रावीण्य ('स्पेशलायझेशन') मिळवायचं, किंवा मूळ पदवीच 'एआय अभियंता' अशी घ्यायची. सगळीकडे एआयचा बोलबाला असल्यामुळे जवळपास प्रत्येक महाविद्यालयामध्ये एआयमध्ये बीई, बीटेक, बीएससी, एमसीए, एमएससी अशा पदवी निघालेल्या आहेत. यामुळे आधीच गांगरून गेलेला पालकवर्ग अजूनच संभ्रमात पडतो. विद्यार्थी जे कानांवर पडतं त्यावरून आणि नेहमीप्रमाणे आपल्या मित्रमैत्रिणींच्या निर्णयामुळे प्रभावित होऊन पालकांकडे एआयचीच पदवी घेण्यासंबंधीचा हट्ट धरतात. अशा वेळी नेमकं काय केलं पाहिजे?

अर्थातच वर उल्लेख केलेल्या प्रश्नाचं अगदी सर्वसमावेशक आणि सगळ्यांना लागू पडेल असं उत्तर देणं अशक्य असलं तरी किमान काही मूलभूत गोष्टींचा उल्लेख तरी केलाच पाहिजे. मुळात एआय ही संगणकशास्त्राची उपशाखा आहे, हे अजिबात विसरू नये. म्हणजेच कुणीही कधीच थेट 'एआय' असं काही शिकूच शकत नाही, हे लक्षात घ्यावं. साहजिकच पदवी एआयची असली तरी या अभ्यासक्रमाची पहिली काही सत्रं संगणकशास्त्रामधले मूळ विषय शिकवण्यातच घालवली जातात. ते अत्यंत गरजेचंही आहे. अन्यथा 'पुढचं पाठ आणि मागचं सपाट' ही म्हण शब्दशः खरी होईल. नंतरच्या काही सत्रांमध्ये हळूहळू एआयचे विषय यायला लागतात आणि अगदी शेवटच्या सत्रांमध्ये कदाचित सगळे विषय एआयशी संबंधित असू शकतात. म्हणजेच एआयमधली पदवी ही संगणकशास्त्रामधल्या पदवीचं 'रिब्रँडिंग' करून तयार केलेली पदवी आहे, हे आपल्या लक्षात येईल. आर्थिक तसंच कालसुसंगततेच्या गरजांमुळे विद्यापीठांना आणि महाविद्यालयांना हे करणं भाग असलं तरी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी मात्र या पदव्यांच्या गोंडस नावांमागे धावण्यापूर्वी याचा नीट विचार केला पाहिजे. संगणकशास्त्रामधली मूळ पदवी घेऊन एआयचे विषय स्वतंत्रपणे शिकणं म्हणूनच अनेकदा जास्त योग्य ठरू शकतं.




याखेरीज छापील अभ्यासक्रमामध्ये असंख्य अत्याधुनिक गोष्टी ठासून भरलेल्या असतील तरी प्रत्यक्षात यामधले किती विषय किती सखोल शिकवले जातात, हा तर संशोधनाचाच विषय आहे. काही मोजके अपवाद वगळता या विषयांचा गंधसुद्धा अभ्यासक्रम ठरवत असलेल्या लोकांपासून ते शिकवू पाहत असलेल्यांपर्यंत बव्हंशी लोकांना नसतो. साहजिकच पाठ्यपुस्तकी संकल्पना जशाच्या तशा विद्यार्थ्यांच्या गळी उतरवणं आणि त्यामधल्याही विद्यार्थ्यांपर्यंत निम्म्याच पोहोचणं अशी दारुण परिस्थिती ठिकठिकाणी बघायला मिळते.

एआयच्या पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एआय म्हणजे काय हेसुद्धा धड सांगता येत नाही, असं चित्र अपवादानं नव्हे तर हटकून बघायला मिळतं. साहजिकच आता पदवी मिळवणं आणि शिकणं या दोन भिन्न गोष्टी असल्याचं जवळपास सगळ्यांनीच स्वीकारलेलं असल्याचं चित्र अगदी खुलेपणानं बघायला मिळतं. निदान संगणकशास्त्रामधले अनेक विषय तसे जुने असल्यामुळे ते शिकवत असलेल्यांना याची थोडीफार तरी जाण असते; पण अत्याधुनिक आणि तेही बदलत राहणारे विषय शिकवणंही त्यांच्या दृष्टीनं जवळपास अशक्यप्रायच असतं. हे सगळं पालकांनी काही अंशी तरी समजून घेतलं पाहिजे आणि आपल्या मुलांना सांगितलं पाहिजे.

अशी काहीशी उदासवाणी परिस्थिती असेल तर मग एआय नेमकं शिकायचं तरी कसं आणि कुठून? त्याविषयी पुढच्या वेळी.


akahate@gmail. com


# पदांचा पसंतीक्रम




डॉ. सुशील बारी

**■ 'उमेदवाराला केडर निवडण्याचा अधिकार नाही' – सर्वोच्च न्यायालय**

ए. शैनामोल खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला होता. यूपीएससीच्या उमेदवारांमध्ये 'केडर व सेवा' याबाबत कमालीची उत्सुकता तर असतेच, पण त्याचबरोबर एका भावी प्रशासकीय अधिकाऱ्यासाठी या दोन्ही बाबी तेवढ्याच महत्त्वाच्याही असतात.

या लेखात आपण यूपीएससीतील विविध पदांच्या पसंतीक्रमाबाबत जाणून घेणार आहोत.

पदांचा पसंतीक्रम हा उमेदवारानुसार बदलू शकतो. यात त्या उमेदवाराच्या आवडी-निवडी, कौशल्ये व पदासंबंधीची जाण इ. बाबी महत्त्वाच्या ठरतात. त्यामुळे एकच पसंतीक्रम सर्वांना लागू होत नाही हे लक्षात घ्या. उदा. परराष्ट्र सेवेत काम करण्यास इच्छुक उमेदवार 'आयएफएस' या सेवेला प्राधान्य देतील. तर भारतातच काम करण्याची ईच्छा असलेले उमेदवार 'आयएएस', 'आयपीएस' या सेवांची निवड करतील.

## सेवांचा पसंती क्रम ठरविताना खालील घटकांचा विचार करणे अपेक्षित आहे -

**■ सनदी सेवांचे स्वरूप जाणून घेणे**

एकूण २३ पदे यूपीएससीद्वारे भरली जातात. या पदांचे कामाचे स्वरूप जाणून घ्या. तुम्हाला स्वतःला त्यानुसार कोणती सेवा करायला आवडेल ते आपण ठरवू शकतो. या पदांवर कार्यरत अधिकाऱ्यांशीही तुम्ही चर्चा करू शकता, परंतु त्यांचे पदाबद्दलचे मत हे वैयक्तिक असू शकते हेही तुम्हाला समजून घ्यावे लागेल.

काहींना आपल्याला मिळालेली सेवा हीच कशी चांगली आहे इतरांना पटवून देण्यात रस असतो तर काहींच्या बाबतीत 'पदरात पडले सोने झाले' ही स्थिती असते. त्यामुळे एका सेवेबाबत किमान २-३ अधिकाऱ्यांशी बोलून तुम्ही निर्णय घेणे अपेक्षित असते.यात मतमतांतरे असण्याची शक्यता अधिक असल्याने तुमचे स्वतःचे याबाबतचे मत अधिक महत्त्वाचे असते.यासाठी अनुभवी मार्गदर्शकांचा सल्लाही तुम्ही घेऊ शकता.

**■ स्वतःची कौशल्ये (स्किल सेट) जाणून घेणे**

तुमच्याकडील कौशल्ये व या विविध सेवांसाठी आवश्यक कौशल्ये याचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. उदा.'धैर्य' सर्व पदांसाठी गरजेचे आहे. परंतु 'भारतीय पोलीस सेवे'त त्याचे एक वेगळेच महत्त्व आहे ते बासवान समितीने स्पष्ट केले होते.

**■ पगार, भत्ते, सेवेतील संधी**

सेवा निवडताना हा एक महत्त्वाचा घटक असून सेवेतील तुमचा पगार, भत्ते तसेच त्या सेवेतील संधी समजून घ्यायला हव्यात.

**■ सेवेतील नियुक्तीच्या शक्यता**

यात तुम्हाला तुमच्या 'होम केडरमध्ये' म्हणजे स्वतःच्या राज्यात काम करायला मिळेल का? तसेच 'नियुक्तीतील स्थिरता' मिळणे अपेक्षित असते. अन्यथा वारंवार बदली झाल्यास तुम्हाला कामही करता येत नाही व कामाचे समाधानही मिळत नाही.

**■ सामाजिक प्रतिष्ठा**

यूपीएससीतील या सेवा प्रामुख्याने 'सामाजिक प्रतिष्ठे'साठी ओळखल्या जातात. नागरिकांशी येणारा तुमचा थेट संबंध तसेच भारतीय समाजात 'शासकीय नोकरी', 'निश्चित वेतन' याबाबत सध्याची सकारात्मक स्थिती या सेवांना इतर नोकऱ्यांपेक्षा वेगळे ठरवितात.

**■ बढती मिळण्याची संधी**

कोणत्याही सेवेत जेव्हा व्यक्ती कार्यरतअसते, तेव्हा त्या व्यक्तीला कामाच्या गुणवत्तेनुसार वा सेवाज्येष्ठेतेनुसार बढती मिळणे अपेक्षित असते. तसेच बढतीच्या संधी कोणत्या सेवेत किती आहेत कशा आहेत हे समजून घ्यायला हव्यात. बहुतेकदा नव्याने आलेल्या 'आयसीएलएस' सारख्या सेवेत अशी संधी लवकर मिळू शकते.

**■ काम व वैयक्तिक आयुष्याचा समतोल**

'वर्क लाईफ बॅलन्स' हा कोणत्याही व्यक्तीसाठी एक चांगले आयुष्य जगण्याकरिता आवश्यक आहे. जर तुम्हाला हा समतोल साधता आला नाही तर तुमचे आयुष्य तुम्हा ओझे वाटू शकते. यामुळे नैराश्यसुध्दा येवू शकते. आयुष्याकडे बघण्याचा आपला दृष्टिकोण काळानुरूप बदलतो. हे लक्षात घेवूनच सेवांचा पसंतीक्रम हवा.

## सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे सेवांना उमेदवारांद्वारे पसंती दिली जाते -

- **सर्वाधिक पसंती :** आयएएस, आयपीएस, आयएफएस, आयआरएस-आयटी, आयआरएस-कस्टम.
- **मध्यम पसंती :** आयएएएस, आयसीएएस, आयसीएलएस, आयडीएएस, आयडीईएस, आयआयएस, आयपीओएस, आयपीटीएएफ,आयआरएमएस(टी), आयआरएमएस(पी), आयआरएमएस(ए), आयटीएस, आयआरपीएफ.
- **सर्वात कमी पसंती :** डीएएनआयसीएस, डीएएनआयपीएस, पीओएनडीआयसीएस, पीओएनडीआयपीएस, एएफएचक्यू

यूपीएससीतील सेवांचा पसंतीक्रम हा तुमच्या प्रशासकीय सेवेतील करिअरमधील पाया आहे. यावर तुमचे प्रशासकीय आयुष्य अवलंबून असल्यामुळे सारासार विचार करूनच निर्णय घ्या!

### आपण ज्या घटकांचे विश्लेषण केले त्यानुसार खालीलपैकी सेवा पसंती क्रम

नोट : येथे व्यक्तीनुरूप बदल होऊ शकतो.

| क्र. | सेवा | पसंती क्रम |
|---|---|---|
| १ | आयएएस | ०१ |
| २ | आयएफएस | ०५ |
| ३ | आयपीएस | ०२ |
| ४ | आयएएएस | ०६ |
| ५ | आयसीएएस | ०७ |
| ६ | आयसीएलएस | ०८ |
| ७ | आयडीएएस | १३ |
| ८ | आयडीईएस | १२ |
| ९ | आयआयएस | १४ |
| १० | आयपीओएस | १५ |
| ११ | आयपी ॲण्ड टीएएफ | १६ |
| १२ | आयआरएमएस (टी) | ०९ |
| १३ | आयआरएमएस (पी) | ११ |
| १४ | आयआरएमएस (ए) | १० |
| १५ | आयआरपीएफ | १८ |
| १६ | आयआरएस (सी ॲण्ड आयटी) | ०४ |
| १७ | आयआरएस (आयटी) | ०३ |
| १८ | आयटीएस | १७ |
| १९ | एएफएचक्यू | २३ |
| २० | डीएएनआयसीएस | १९ |
| २१ | डीएएनआयपीएस | २० |
| २२ | पीओएनडीआयसीएस | २१ |
| २३ | पीओएनडीआयपीएस | २२ |

*नोट : भारतीय परराष्ट्र सेवा हवी असल्यास 'आयएफएस'ला पहिला प्राधान्यक्रम द्या.*


sushilbari10@gmail.com


## शब्दकोडे- २९

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ | ७ |
| | ■ | ८ | | ९ | ■ | | ■ | १० | |
| ११ | | ■ | १२ | | १३ | ■ | १४ | | ■ |
| | ■ | १५ | | ■ | १६ | | | ■ | १७ |
| ■ | १८ | | ■ | १९ | | ■ | २० | २१ | |
| २२ | ■ | २३ | २४ | | ■ | २५ | | | |
| २६ | २७ | | | ■ | २८ | | ■ | २९ | |
| ३० | | ■ | ३१ | | | ■ | ३२ | | ■ |
| ■ | ३३ | ३४ | | ■ | ३५ | ३६ | | ■ | ३७ |
| ३८ | | | ■ | ३९ | | | ■ | ४० | |

**आडवी विधाने :** (१) गोंधळ, गडबड, धांदल (४) अष्टविनायकांपैकी महागणपतीचे ठिकाण (८) मंडई, पेठ (१०) भारी, वजनदार (११) शेताचा एक तुकडा, तालुक्याचा भाग (१२) गाईचे बछडे (१४) कचरा, घाण (१५) तिसरा, इजा बिजा XX (१६) वायफळ बोलणारा, असंबद्ध, ताळतंत्र नसलेला (१८) अपशकुन, अशुभ (१९) घट्टसर काकवी, रोपाकरिता भाजलेली जमीन (२०) केशकर्तन (२३) शेतातील धान्य कापणे (२५) काटक, टणक, दणकट, मजबूत (२६) उजाड, उद्ध्वस्त, वस्तीरहित (२८) झाडाच्या पानांपासून तयार केलेले लहानसे भांडे (२९) पृथ्वी, धरित्री (३०) तांबडा (३१) कृष्णा नदीची महत्त्वाची उपनदी, या नावाचे श्रीखंड प्रसिद्ध आहे (३२) एक म्हण - XX तशी माती (३३) गायनातील एक राग (३५) तळहाताने मारलेली थप्पड (३८) जपणूक, निगा (३९) स्पर्धा, चढाओढ (४०) 'जब जब फूल खिले' या चित्रपटाची नायिका

**उभी विधाने :** (१) दुसऱ्या धर्माचा स्वीकार करणे (२) झाकण असलेले वस्तू ठेवायचे चौकोनी किंवा वाटोळ्या आकाराचे भांडे (३) गवगवा, बोभाटा, प्रसिद्धी (५) यात्रा, मेळावा (६) एक तांबूस रंगाचा मुळ्याच्या आकाराचा कंद (७) या वृक्षाची सुवासिनी पूजा करतात (९) द्रव पदार्थ, रुची, गोडी (१३) ऐट, मिजास, दरारा (१४) लग्न वा मुंजीआधी संबंधितांना दिलेली मेजवानी, गडंगनेर (१५) तिरस्कार, कंटाळा, वीट (१७) दिवाळीच्या फराळातला एक गोड पदार्थ (१९) राजाची बायको (२१) फळे-फुले यांचा सडा (२२) घोडे बांधून ठेवण्याची जागा, पागा (२४) तबला, मृदंग (२५) दाणा, सूक्ष्म अंश (२७) धातूचे संरक्षक अंगकवच (२८) कौरव-पांडवांचे गुरू (३२) बाजले, चारपाई, खकाणा, ठसका (३४) गळ्याचा मागचा भाग, आदर, सत्कार, अहंता (३६) अब्रू, प्रतिष्ठा, विश्वास (३७) ताकदवान, सामर्थ्यशाली

**- चारू नानल**

## सुडोकू - २९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ३ | | ४ | |
| ५ | | | १ | | | ८ | | |
| | ४ | ३ | ९ | ६ | ५ | ७ | | |
| ७ | | ५ | २ | | ६ | ४ | ३ | |
| | | ८ | | | | २ | | |
| | २ | ६ | ७ | | ४ | ९ | | १ |
| | | ४ | ५ | ३ | ९ | १ | ६ | |
| | | १ | | | ८ | | | ९ |
| | ३ | | ६ | | | | | |

### सुडोकू - २८चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | २ | ३ | ४ | ८ | ६ | ७ | ५ |
| ८ | ६ | ७ | ९ | १ | ५ | ४ | ३ | २ |
| ३ | ५ | ४ | ७ | २ | ६ | ९ | ८ | १ |
| ९ | ७ | ६ | २ | ५ | ३ | ८ | १ | ४ |
| ४ | ३ | ५ | ६ | ८ | १ | ७ | २ | ९ |
| २ | १ | ८ | ४ | ९ | ७ | ३ | ५ | ६ |
| ७ | ८ | १ | ५ | ६ | ९ | २ | ४ | ३ |
| ५ | ४ | ९ | ८ | ३ | २ | १ | ६ | ७ |
| ६ | २ | ३ | १ | ७ | ४ | ५ | ९ | ८ |

### शब्दकोडे -२८चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | ल | कं | स | ■ | उं | च | स | ख | ल |
| न्य | ■ | स | ज्ज | न | ■ | को | र | डा | ■ |
| व | दीं | ■ | न | ट | व | र | ■ | जं | त |
| र | ■ | भ | ग | वा | न | ■ | खो | गी | र |
| ■ | क | वा | ड | ■ | मा | क | ड | ■ | णा |
| अ | व | नी | ■ | ब | ळी | ■ | क | ल | ता |
| व | डी | ■ | टो | क | ■ | द | र | ■ | ठा |
| स | मो | र | ■ | ब | ख | र | ■ | सं | ■ |
| ■ | ल | व | ची | क | ■ | व | र | क | ड |
| शें | ■ | का | न | ■ | म | ळ | व | ट | ■ |

# बिबवेवाडीत भरदिवसा गुंडावर गोळीबार

## दोन संशयित ताब्यात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खुनाच्या गुन्ह्यात जामिनावर सुटलेल्या गुंडावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची घटना बिबवेवाडी पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर घडली. गोळीबारात जखमी झालेल्या गुंडाने थेट पोलीस ठाणे गाठले. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पवन सुभाष गवळी (वय २८, रा. बिबवेवाडी ओटा परिसर) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पवन सोमवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास बिबवेवाडी भागातून निघाला होता.

संविधान चौकाजवळ दुचाकीवरून आलेल्या तिघांपैकी एकाने त्याच्यावर पिस्तुलातून गोळीबार केला. तिघांनी त्यांचे चेहरे झाकले होते. पवन याच्या कंबरेला गोळी घासून गेल्याने तो जखमी झाला. त्यानंतर जखमी अवस्थेतील पवनने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पवनला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, परिमंडळ पाचचे उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली.

बिबवेवाडी भागात माधव वाघाटे याचा २०२१ मध्ये खून झाला होता. घावटे खून प्रकरणात पवन आरोपी आहे. खून प्रकरणात त्याला न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. गोळीबार करणाऱ्या आरोपींना पकडण्यासाठी गुन्हे शाखेने पथके तयार केली आहेत, अशी माहिती गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांनी दिली.

पवन याला दोन महिन्यांपूर्वी न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. त्याच्यावर गोळीबार करणाऱ्या दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे, असे पोलीस उपायुक्त शिंदे यांनी सांगितले.

# मरकळ येथे रिक्षा उलटून दोघांचा मृत्यू

## अल्पवयीन मुलगा जखमी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** रिक्षा उलटून झालेल्या अपघातात चालकासह दोघांचा मृत्यू झाला. ही दुर्घटना ३१ जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास खेड तालुक्यातील मरकळ येथे घडली.

सुनील बालाजी सगर (वय १९, रा. निगडी), रोहन भाऊसाहेब गाडे (वय २२, रा. निगडी) अशी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. तर, १६ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर चिंचवड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनीलची बहीण भीमा कोरेगाव येथे राहते. तिने निगडी येथून काही साहित्य मागवले होते. ते साहित्य पोहोचवण्यासाठी सुनील याने १६ वर्षीय तरुणाला सोबत घेतले. दोघेजण रोहनच्या रिक्षातून भीमा कोरेगाव येथे जात होते.

मरकळ येथे रिक्षाचा दुचाकीला धक्का बसल्याने रोहन याचे रिक्षावरील नियंत्रण सुटले. रिक्षा रस्त्याच्या बाजूला उलटली. या अपघातात रोहनचा जागेवरच मृत्यू झाला. १६ वर्षीय युवक आणि सुनील सगर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान सुनीलचा मृत्यू झाला आहे.

---

**SBI**

भारतीय स्टेट बँक, रिजनल बिझनेस ऑफीस, पुणे रुरल, ३८६/२, शारदा चेंबर्स, नववा मजला, शंकरशेठ रोड, पुणे- ४११०३७.
फोन : (०२०) २६४०४७६६, ई-मेल : cmcredit.rbopunerural@sbi.co.in

## तारण मिळकतीचा ताबा घेतल्याची नोटीस (सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४)अन्वये)

नोटीस देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ (२००२ चा ५४) च्या कलम १३(१२), व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारात खाली नमूद केलेल्या कर्जदारांचे समोर दर्शविलेल्या तारखांना **मागणी नोटीस** पाठवून मागणी नोटीस मिळाल्या तारखेपासून ६० दिवसांचे आत बँकेस देणे असलेली संपूर्ण रक्कम भरण्याची मागणी केलेली होती.

कर्जदार मागणी केल्याप्रमाणे भरणा करण्यास असमर्थ ठरले आहेत. सर्वसाधारण जनता व विशेषकरुन कर्जदार यांना ही जाहीर नोटीस देण्यात येते की खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) व सदर नियम क्र. ९ अन्वये खाली नमूद केलेल्या तारखांना तारण मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा** घेतलेला आहे.

सर्वसाधारण जनता व विशेषकरुन कर्जदार यांना सावधान करण्यात येत आहे की त्यांनी सदर मिळकतीसंबंधात कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो **भारतीय स्टेट बँकेच्या** व्याजासह येणे रकमेच्या बोजासह असेल.

**कर्जदारांचे ध्यान सदर कायद्याच्या कलम १३, उपकलम ८ कडे आकर्षित करण्यात येत असून त्यात कर्जदारास आपल्या तारण मिळकतीवरील बोजा उतरवून घेण्यास उपलब्ध असलेल्या कालमर्यादेची तरतूद आहे.**

| अ. क्र. | कर्जदाराच नाव | अचल मिळकतीचा तपशील | मागणी नोटीस तारीख | प्रतिकात्मक ताबा तारीख | रोजी येणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | (कर्जदार) श्री. गजानन गंगाधर लाड, (१) श्री. पुरुषोत्तम गंगाधर लाड (जामीनदार), (२) श्री. दत्तात्रय गंगाधर लाड (जामीनदार), (३) श्री.गिरीश गंगाधर लाड, (जामीनदार) | घोडेश्वर ता. मोहोळ, जि. सोलापूर ४१३२५३ येथील ग्रामपंचायत मिळकत नं. ४४७, सिटी सर्व्हे नं. ३९८ (भाग) वरील श्री. गजानन गंगाधर लाड, श्री. पुरुषोत्तम गंगाधर लाड श्री. दत्तात्रय गंगाधर लाड, श्री. गिरीश गंगाधर लाड, यांच्या नावे असलेली बिगर शेतजमीन क्षेत्र ४७१० चौ. फुट. | १६.१२.२०२० | ०१.०२.२०२५ | दि. १५.१२.२०२० रोजी येणे असलेली रक्कम रु.११,०८,३६०.०० (रु. अकरा लाख आठ हजार तीनशे साठ फक्त) अधिक पुढील व्याज, खर्च, शुल्क इत्यादी |

दिनांक : ०३.०२.२०२५
स्थळ : पुणे

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

सही/-
अधिकृत अधिकारी,
भारतीय स्टेट बँक, आरबीओ, पुणे रुरल, पुणे

---

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

**पुणे पश्चिम अंचल कार्यालय** : जनमंगल, १ ला मजला, जुना मुंबई-पुणे हायवे, बँक ऑफ महाराष्ट्र पिंपरी शाखेच्या वर, पिंपरी, पुणे – ४११०१८. फोन : ०२०-२७३३ ५३५१

## ताबा नोटीस
(ॲपेंडिक्स IV ॲक्ट रूल ८(१) नुसार)
(स्थावर मालमत्तेकरीता)

ज्याअर्थी खाली सही करणार **बँक ऑफ महाराष्ट्रचे** अधिकृत अधिकारी यांनी, दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार तसेच जामीनदार यांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या तारखांना **मागणी नोटीस** बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीस मिळालेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी. सदर नोटीसा रजिस्टर्ड एडी पोस्टामार्फत पाठविण्यात आल्या होत्या.

कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, कर्जदार व सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सब-सेक्शन ४ व सेक्शन १३ आणि च्या रुल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद कर्जदार यांच्या नावासमोर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा खाली नमूद तारखांना **ताबा घेतला आहे.** विशेषत: कर्जदार तसेच जामीनदार व सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **बँक ऑफ महाराष्ट्र** यांना खाली नमूद केलेल्या येणे असलेल्या रक्कमेच्या अधीन राहील. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदार आणि जामीनदारांचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे. सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्ये सुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरली जाईल.

| अ. क्र. | शाखेचे आणि कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव | येणे बाकी रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|
| १. | **शाखा : वडगांव मावळ** **कर्जदार : एसजेएस बिल्डकॉन, भागीदारी संस्था – भागीदार आणि जामीनदार : सौ. सुरेखा सोमनाथ आगळे, रा.** स. नं. १४५, हाऊस नं. २५१०, डेक्कन हिल्स, वडगाव मावळ, जिल्हा पुणे. **सौ. जया नवनाथ भिलारे, रा.** भिलारे वस्ती, वडगाव मावळ, जिल्हा पुणे **आणि सौ. सुनिता शिवाजी कुडे, रा.** हाऊस नं. १२०४, बाजार पेठ, टेल्को कॉलनी, गणेश मंदिराजवळ, वडगाव मावळ, पुणे **आणि जामीनदार : श्री. नवनाथ पंढरीनाथ भिलारे, रा.** भिलारे वस्ती, वडगाव मावळ, जिल्हा पुणे, **सौ. कुसुम भास्कर कुडे, रा.** हाऊस नं. १२०४, बाजार पेठ, टेल्को कॉलनी, गणेश मंदिराजवळ, वडगाव मावळ, पुणे, **श्री. सोमनाथ खंडू आगळे, रा.** स. नं. १४५, हाऊस नं. २५१०, डेक्कन हिल्स, वडगाव मावळ, जिल्हा पुणे **आणि श्री. शिवाजी भास्कर कुडे, रा.** हाऊस नं. १२०४, बाजार पेठ, टेल्को कॉलनी, गणेश मंदिराजवळ, वडगाव मावळ, पुणे यांच्यामार्फत | **रु. ६८,७०,४३९/- (रुपये अडुसष्ट लाख सत्तर हजार चारशे एकोणचाळीस फक्त)** अधिक त्यावरील ११.७०% दराने लागू न केलेले व्याज दि. ३०.१२.२०२४ पासूनच्या मासिक येण्यासहीत तसेच दंडात्मक व्याज, किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : १४/११/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : २९/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : पुढील जमीनीच्या किंवा तळमजल्यावरील जागेच्या सर्वसामाईक भागाचे समतुल्य गहाणखत – गाव वडगाव, नोंदणीकरण जिल्हा पुणे, उप-जिल्हा मावळ, क्षेत्रफळ ११८३६ चौ. फू., मालमत्ता नं. १४२ आणि १४३, जुना बॉम्बे पुणे हायवे जवळ, मातोश्री हॉस्पिटल समोर, वडगाव मावळ, (जमीन आणि बिल्डींग), पुणे | |
| २. | **शाखा : वडगांव मावळ** **कर्जदार : श्री. अजिंक्य प्रकाश नखाते, रा.** फ्लॅट नं. १०४, १ ला मजला, रोशन मंजिल, वडगाव, पुणे – ४१०१०६ **आणि जामीनदार : श्री. सागर दिलीप पवार,** रा. गोपीनाथ ज्ञानोबा काळोखे, मुंबई पुणे रोड, काळोखे पोल्ट्री जवळ, टाकळे वस्ती, तळेगाव दाभाडे, पुणे ४१०५०६ आणि **श्री. विशाल चंद्रकांत नखाते,** चंद्रकांत नखाते, रेल्वे ब्रिजेवळ, मंगळवार पेठ, नखाते चाळ, तळेगाव दाभाडे – ४१०५०७ | **रु. ११,०७,४४४/- (रुपये अकरा लाख सात हजार चारशे चव्वेचाळीस फक्त)** अधिक त्यावरील ८.९०% दराने लागू न केलेले वार्षिक व्याज दि. २१/०८/२०२४ पासूनच्या मासिक येण्यासहीत तसेच दंडात्मक व्याज, किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : २१/०८/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : २९/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : पुढील रहिवासी फ्लॅट नं. १०४ चे साधे गहाणखत- १ ला मजला, रोशन मंजिल, स. नं. २२५+२२६+२+२/१/१, प्लॉट नं. ३८, मावळ तहसिल प्रायमरी टिचर को-ऑप सोसायटी, माळीनगर, वडगाव मावळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे. | |
| ३. | **शाखा : वडगांव मावळ** **कर्जदार : श्री. अजिंक्य विजय देशमुख, सह-कर्जदार : सौ. रंजना विजयराव देशमुख, दोघेही रा.:** अनंत छाया, बीपीएल टॉवर जवळ, बॉम्बे पुणे हायवे, वडगाव मावळ, जिल्हा पुणे **आणि जामीनदार : श्री. राजेंद्र विठ्ठलराव कुडे,** कुडेवाडा, वडगाव मावळ, जिल्हा पुणे, **श्री. विक्रमसिंग विजय देशमुख, रा.** अनंत छाया, बीपीएल टॉवर जवळ, बॉम्बे पुणे हायवे, वडगाव मावळ, जिल्हा पुणे **आणि शारदा राहुल सत्कार, रा** ऋतुरंग शरद, ६०२, अरण्येश्वर, पर्वती, पुणे | **रु. १६,७४,९६९.००/- (रुपये सोळा लाख चौऱ्याहत्तर हजार नऊशे एकोणसत्तर फक्त)** अधिक त्यावरील ८.७०% दराने लागू न केलेले वार्षिक व्याज दि. १३/०९/२०२४ पासूनच्या मासिक येण्यासहीत तसेच दंडात्मक व्याज, किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : १२/०९/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : २९/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : पुढील एनए मालमत्तेच्या सर्वसामाईक भागाचे नोंदणीकृत गहाणखत- प्लॉट नं. ६ आणि १३, स. नं. २३१/१/१८/३ पैकी, प्लॉटचे क्षेत्रफळ १०० चौ. मी., त्यावरील एकत्रित बांधकामाचे क्षेत्रफळ १२०० चौ. फू., गाव वडगाव मावळ, तालुका मावळ आणि नोंदणीकरण जिल्हा पुणे, उप नोंदणीकरण आणि तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे स्थित. | |
| ४. | **शाखा : वडगांव मावळ** **कर्जदार : सौ. रमा बिरजू माथूर आणि सह-कर्जदार : श्री. बिरजू रामविलास माथूर,** रा. बंगला नं. १२, संस्कृती सोसायटी, न्यू इंग्लिश स्कूल जवळ, वडगाव मावळ, जिल्हा पुणे – ४१२१०६ **आणि जामीनदार : श्री. सोमनाथ खंडू आगळे,** प्लॉट नं. ५०, स. नं. १४५, डेक्कन हिल, वडगाव मावळ, जिल्हा पुणे – ४१२१०६ **आणि श्री. नवनाथ** पंढरीनाथ भिलारे, भिलारे वस्ती, मावळ हॉस्पिटल जवळ, वडगाव मावळ, जिल्हा पुणे – ४१२१०६ | **रु. १७,५४,३९३.००/- (रुपये सतरा लाख चोपन्न हजार तीनशे त्र्याणव फक्त)** अधिक त्यावरील ८.५०% दराने लागू न केलेले वार्षिक व्याज दि. १४/०८/२०२४ पासूनच्या मासिक येण्यासहीत तसेच दंडात्मक व्याज, किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : १४/०८/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : २९/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : रहिवासी फ्लॅट नं. १०६ चे साधे गहाणखत, चटई क्षेत्रफळ ५३४ चौ. फू. म्हणजेच विक्रीयोग्य बांधकाम क्षेत्रफळ ७४७.६० चौ. फू. म्हणजेच १ बीएचके फ्लॅट, २ रा मजला, ग्रामपंचायत घर मिळकत नं. २२६५ या प्लॉटवर बांधण्यात आलेली बिल्डींग, सामाईक पार्किंगच्या वापराच्या हक्कासहीत, रोशन मंजिल बिल्डींग, वडगाव मावळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे. | |
| ५. | **शाखा : वडगांव मावळ** **कर्जदार आणि सह-कर्जदार : सौ. जया नवनाथ भिलारे आणि श्री. नवनाथ पंढरीनाथ भिलारे** | **रु. ५९,९६,६२१.००/- (रुपये एकोणसाठ लाख शह्याण्णव हजार सहाशे एकवीस फक्त)** अधिक त्यावरील दि. १४/११/२०२४ पासूनचे लागू न केलेले व्याज |
| | **मागणी नोटीसीची तारीख : १४/११/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : २९/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **सुरक्षित मालमत्तेचा तपशिल** : १) पश्चिमेकडील भागाची मिळकत नं. १२०४/६, तळमजला, क्षेत्रफळ ११३४ चौ. फू.. जया नवनाथ भिलारे आणि नवनाथ पंढरीनाथ भिलारे यांच्या मालकीची. २) पूर्वेकडील भागाची मिळकत नं. १२०४/६, तळमजला, क्षेत्रफळ ११३४ चौ. फू., जया नवनाथ भिलारे आणि नवनाथ पंढरीनाथ भिलारे यांच्या मालकीची म्हणजेच संपूर्ण तळमजला, मालमत्ता नं. १२०४/६, सर्व्हे १४२, जुना बॉम्बे पुणे हायवे, कुडे वस्ती, टेल्को कॉलनी जवळ, वडगाव मावळ, पुणे ३) ०एच ०७ आर जमीनीपैकी, स. नं. १४२, हिस्सा नं. ३बी/२, मोकळी जमीन, वरील मालमत्तेच्या पुढील बाजूस, श्रीमती कुसुम भास्कर कुडे यांच्या नावावर | |
| ६. | **शाखा : वडगांव मावळ** **कर्जदार : श्री. संजय बाबूराव पवार,** रा. ब्राम्हणवाडी, साटे, तालुका मावळ, जिल्हा पुणे **आणि जामीनदार : श्री. कैलास लक्ष्मण भांगरे,** रा. भिमशंकर कॉलनी, वरळे, तालुका मावळ, जिल्हा पुणे | **रु. ८,३३,८७४/- (रुपये आठ लाख तेहतीस हजार आठशे चौऱ्याहत्तर फक्त)** अधिक त्यावरील लागू न केलेले व्याज दि. २०/०१/२०२५ पासूनच्या मासिक येण्यासहीत तसेच दंडात्मक व्याज, किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : ०५/११/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : ३०/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : रहिवासी फ्लॅट नं. ३ चे साधे गहाणखत, क्षेत्रफळ ६५० चौ. मी., १ ला मजला, श्री महालक्ष्मी अपार्टमेंट बिल्डींग, ग्राम पंचायत मिळकत नं. २३५४/३, वडगाव मावळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे | |
| ७. | **शाखा : रावेत** **कर्जदार : सौ. मंदा किसन गायकवाड आणि सह-कर्जदार : सौ. संगिता अनिल गायकवाड, दोघेही रा.:** फ्लॅट नं. २०५, २ रा मजला, बिल्डींग नं ए-६, पीसीएमसी घरकुल प्रोजेक्ट, सेक्टर नं. १७ आणि १९, चिखली गाव, तालुका हवेली, पुणे ४११०६२ | **रु. २,०३,५६८/- (रुपये दोन लाख तीन हजार पाचशे अडुसष्ट फक्त)** अधिक त्यावरील १०.५०% दराने लागू न केलेले वार्षिक व्याज दि. ३०/१०/२०२४ पासूनच्या मासिक येण्यासहीत अधिक इतर किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : २१/११/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : ३०/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : फ्लॅट नं. २०५ चे नोंदणीकृत गहाणखत, २रा मजला, बिल्डींग नं. ए-६, क्षेत्रफळ ३६.९२ चौ. मी. पीसीएमसी घरकुल प्रोजेक्ट, सेक्टर नं. १७ आणि १९, चिखली गाव, तालुका हवेली, जिल्हा पुणे | |
| ८. | **शाखा : रावेत** **कर्जदार : सौ. शांताबाई पांडुरंग अगदज्ञान आणि सह-कर्जदार : सौ. प्रतिभा दीपक अगदज्ञान आणि श्री. दीपक पांडुरंग अगदज्ञान, सर्व रा.** रुम नं. १८४, पर्वती निवास जवळ, दत्तवाडी, आकुर्डी, पुणे – ४११०३५ **आणि तसेच :** फ्लॅट नं. ५०४, ५ वा मजला, बिल्डींग बी-२४, पीसीएमसी घरकुल प्रोजेक्ट, सेक्टर नं. १७ आणि १९, चिखली, तालुका हवेली, पुणे – ४११०६२ | **रु. १,७६,८१७/- (रुपये एक लाख शहात्तर हजार आठशे सतरा फक्त)** अधिक त्यावरील ९.००% दराने लागू न केलेले वार्षिक व्याज दि. २१/११/२०२४ पासूनच्या येण्यासहीत अधिक इतर किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : २२/११/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : ३०/०१/२०२५ (प्रतिकात्मक ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : फ्लॅट नं. ५०४ चे नोंदणीकृत गहणखत, ५ वा मजला, बिल्डींग नं. बी-२४, क्षेत्रफळ ३६.७७ चौ. मी., पीसीएमसी घरकुल प्रोजेक्ट, सेक्टर नं. १७ आणि १९, चिखली गाव, तालुका हवेली, जिल्हा पुणे | |
| ९. | **शाखा : चऱ्होली** **कर्जदार : श्री. सागर अशोक रील आणि सह-कर्जदार : सौ. नंदा अशोक रील, दोघेही रा.:** घर नं. २११, तालीम चौक, म्हस्कोबा मंदिराजवळ, घोरपडी गाव, आंबेगाव, पुणे. | **रु. १६,३७,३४२/- (रुपये सोळा लाख सदतीस हजार तीनशे बेचाळीस फक्त)** अधिक त्यावरील ९.५५% दराने व्याज दि. १८/११/२०२४ पासूनच्या येण्यासहीत अधिक इतर किंमत आणि खर्च |
| | **मागणी नोटीसीची तारीख : १८/११/२०२४** | **ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : ३१/०१/२०२५ (प्रत्यक्ष ताबा)** |
| | **बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने प्रतिकात्मक ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे** : फ्लॅट नं. २०७ चे नोंदणीकृत गहाणखत – २ रा मजला, बी४ विंग, त्रिवेणी त्रिकाया फेज – I, गट नं. ५१३, ५१५, ५१६, ५१७ आणि ५२५, शिवांक हॉटेल जवळ, गाव मौजे, तुळापूर, आळंदी-मरकळ रोड, तालुका हवेली, पुणे – ४१२२१६ | |

दिनांक : २९/०१/२०२५
ठिकाण : पुणे

मुख्य प्रबंधक आणि अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ महाराष्ट्र

---

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

स्पेशलाईज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, सेंट्रम बिल्डींग, २ रा मजला, गोकुळ रोड, हुबळी-५८००३०. कर्नाटक,
फोन : ०८३६-२२३९४१०.ईमेल : cb7261@canarabank.com,

## स्थावर / जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ (६) व ९ अधिकारांच्या अंतर्गत स्थावर / जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

**ई-लिलाव विक्रीची तारीख आणि वेळ – २८/०२/२०२५ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० पर्यंत**
**(विक्री संपेपर्यंत ५ मिनिटांच्या अमर्यादित वाढीसह)**
**बयाणा रक्कम सादर करण्याची अंतिम तारीख : दि. २७/०२/२०२५ रोजी दु. ४ पर्यंत**

या नोटीसीद्वारे साधारणपणे सर्व जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदारांना नोटीस दिली जाते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता कॅनरा बँकेकडे गहाण ठेवली होती. ज्याचा रचनात्मक ताबा स्पेशलाईज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, हुबळी, यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. (खडे बाझार, बेळगावी येथून खाते हस्तांतरीत केल्यानंतर) व कर्जदार / जामीनदार असलेले **१) सय्यद मकबुल मकानदार,** सहारानगर, अभार फाटा, रुई, गल्ली नं. २, गाव रुई, हातकणंगले तालुका, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र-४१६११६. **२) मोहम्मद असद सय्यद मकानदार,** सहारानगर, अभार फाटा, रुई, गल्ली नं. २, गाव रुई, हातकणंगले तालुका, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र-४१६११६ यांच्याकडून **रू. १,११,४६,६२४/- (रूपये एक कोटी अकरा लाख सेहेचाळीस हजार सहाशे चोवीस फक्त)** च्या आजवरच्या थकबाकी वसुलीसाठी तसेच **दि. ०१/१२/२०२४ पासून पुढील व्याज** आणि खर्च वसुलीसाठी कॅनरा बँकेच्या स्पेशलाइज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, हुबळी ही स्थावर मालमत्ता **'जशी आहे तशी', 'जेथे आहे तेथे' आणि 'जे काही आहे तसे'** या तत्वावर **दि. २८/०२/२०२५** या तारखेला वर नमूद केलेल्या कर्जदार आणि हमीदारांची थकबाकी रक्कम वसूल करण्यासाठी विक्री करेल.

**स्थावर आणि जंगम मालमत्तेचे वर्णन**

१) गट नं. ७८१/ए येथील रहिवासी घर, क्षेत्रफळ १९५.५० चौ.मी., जीपी मिळकत नं. २१००/ए, सहारा नगर, रूई गांव, ता. इचलकरंजी, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र-४१६१५१, **श्री. मोहम्मद असद सय्यद मकानदार यांच्या नावावर. चतु:सीमा : पूर्वेस** : श्री. मकानदार यांची मालमत्ता, **पश्चिमेस** : सुफिया मकानदार यांची मालमत्ता, **उत्तरेस** : १५ फूट रूंद रस्ता, **दक्षिणेस** : श्री. मांगलेकर यांची मालमत्ता. • **राखीव किंमत : रू. ३३.६० लाख** • **बयाणा ठेव रक्कम : रू. ३.३६ लाख**

२) प्लॅण्ट आणि मशिनरी : पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग – शटललेस रॅपिअर लुम्स्चे ४ सेट, मे. सय्यद मकबूल मकानदार पॉवरलूम युनिट, प्लॉट नं. ५ए, आर.एस.नं. ७६ आणि ७८, राणी चेन्नम्मा टेक्सटाईल पार्क, नेज गांव, ता. चिक्कोडी, जि. बेळगावी, कर्नाटक.
• **राखीव किंमत : रू. ४.८६ लाख** • **बयाणा ठेव रक्कम : रू. ०.४९ लाख**

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया बँकेची वेबसाईट **(www.canarabank.com)** मध्ये दिलेली ई-ऑक्शन ही लिंक पहावी. अथवा मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, स्पेशलाइज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, हुबळी, फोन नं. ०८३६-२२३९४१० व ९००८२२३७२२/ ९४८०६९६८०९ / ७९०३६००५२६ या क्रमांकावर कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**टीप : ए)** दि. २८/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० वा. किंवा त्यापूर्वी राखीव किंमतीच्या १०% एवढी रक्कम थेट पीएसबी अलायन्स प्रा.लि. च्या **(BAANKNET)** पोर्टलच्या ई-वॉलेटमध्ये जमा करावी किंवा चलन तयार करून ईएमडी रक्कम एनईएफटी/आरटीजीएसद्वारे खात्यावर जमा करावी. **बी)** ०३/०२/२०२५ ते २७/०२/२०२५ या कालावधीत बँकांच्या कामकाजाच्या दिवसींमध्ये अधिकृत अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीने मालमत्तेची पाहणी केली जाऊ शकते. **सी)** लिलाव / बिडिंग फक्त मे. पीएसबी अलायन्स प्रा.लि. च्या **(BAANKNET) https://BAANKNET.com/** या वेबसाईटद्वारे ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडिंगद्वारे होईल. ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी बोलीदारांना तपशीलवार अटींबद्दल वेबसाईटवर संपूर्ण माहिती घेण्याचा सल्ला दिला जात आहे. इच्छुक बोलीदारांनी त्यांची नावे मे. पीएसबी अलायन्स प्रा. लि. च्या **(BAANKNET) https://BAANKNET.com/** येथे नोंदवावीत आणि त्यांचा यूजर आयडी आणि पासवर्ड विनाशुल्क मिळवावा. **डी)** वर नमूद केल्याप्रमाणे राखीव किंमतीवर लिलाव सुरू होईल. बोलीदार त्यांच्या ऑफरमध्ये रू. १०,०००.०० च्या गुणाकारात सुधारणा करतील. 'ऑनलाइन' लिलाव बंद केल्यावर जो बोलीदार सर्वाधिक बोली (राखीव किंमतीपेक्षा जास्त) सादर करेल त्याला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले जाईल. सुरक्षित धनकोने याची पूर्तता केल्यानंतरच यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीची पूर्तता केली जाईल. **इ)** लिलावाचे ठिकाण : ऑनलाईन लिलाव.

**दि. ०१/०२/२०२५, स्थळ : हुबळी** **सही/- अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक**

---

# दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे

**(मल्टीस्टेट बँक)**

**मुख्य कार्यालय :** प्लॉट क्र. 471/472, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-411037.
फोन : 020-24261755/24262745, फॅक्स : 020-24260577
ईमेल : agm_recovery@vishweshwarbank.com, वेब : www.vishweshwarbank.com

## जाहीर लिलावाद्वारे विक्री नोटीस

ज्या अर्थी, दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002, (2002 चा कायदा 54, दि. 17.12.2002) अन्वये आणि कायद्याच्या कलम 13(12) अन्वये व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002च्या नियम 3 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, **दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे** च्या अधिकृत अधिकाऱ्याने खालील तपशीलात नमूद केलेल्या कर्जदाराला व त्यांचे जामीनदार यांना **दि. 02.05.2023** रोजी सदर कायद्याच्या कलम 13(2) नुसार **मागणी नोटीस** दिली होती. कर्जदार हे कर्जाची परतफेड करण्यास निष्फळ ठरले असून, खाली सही करणाऱ्याने उक्त कायद्याच्या कलम 13(4) तसेच उक्त नियम 8 अन्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, **दि. 17.10.2024 रोजी संपूर्ण तारण मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. ज्यामध्ये खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत समाविष्ट आहे. कर्जदार/गहाणखतदार व जामीनदार यांना व सर्व साधारण जनतेस कायद्याच्या तरतूदीनुसार **दि. 19.10.2024** च्या **दैनिक सामना** व **दैनिक बिझनेस स्टँडर्ड (कोल्हापूर आवृत्ती)** या दोन वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन खालील मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करु नये, असा इशारा देण्यात आलेला आहे. खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीची विक्री खालीलप्रमाणे अटी व शर्तीनुसार जाहीर लिलावाद्वारे शुक्रवार, **दि. 07.03.2025 रोजी सकाळी 12.00 वा.** सर्व्हे नं. 907, जैन बस्ती जवळ, मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर -416118 येथे विक्रीस काढलेली आहे.

### विक्रीच्या अटी व शर्ती

1) मिळकतीचा तपशील खालील परिशिष्टात दिला असून, या मिळकतीची विक्री **"जसे आहे तसे व जेथे आहे तेथे आणि तिथे जे आहे ते"** या तत्त्वावर होत असून, मिळकतीची स्थिती किंवा अन्य बाबींसाठी बँक जबाबदार नाही.
2) इच्छुक खरेदीदाराने परिशिष्टामध्ये उल्लेखिल्यानुसार बयाणा रक्कम (अर्नेस्ट मनी) डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर स्वरुपात अधिकृत अधिकारी यांचेकडे लिलावापूर्वी जमा करावयाची आहे. डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर **"दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे"** या **नांवाने पुणे येथे देय असलेले असावेत.** बयाणा रकमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही.
3) कोणतेही कारण न देता अधिकृत अधिकारी त्यांच्या अधिकारात विक्री रद्द करु शकतील.
4) स्थावर मिळकतीच्या लिलावाबाबत बोली धारकांपैकी जो कोणी यशस्वी ठरेल त्याने अधिकृत अधिकाऱ्याने जाहीर करताच विक्री रकमेच्या 25% इतकी रक्कम (भरलेली बयाणा रक्कम धरुन) भरावयाची आहे आणि उर्वरीत रक्कम लिलावाचे निर्धारण (कन्फर्मेशन) दिनांकापासून 15 दिवसांचे आत भरावयाची आहे.
5) विक्रीची ठरलेली संपूर्ण रक्कम भरल्यानंतर अधिकृत अधिकारी विक्री प्रमाणपत्र जारी करतील आणि ते होताच लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली असे समजण्यात येईल.
6) राखीव किंमतीपेक्षा कमी बोली विचारात घेतली जाणार नाही.
7) कर्जदारांने बँकेच्या नावे गहाणखत लिहून दिलेल्यानुसार सदर मालमत्तांवर बँकेचा बोजा आहे.
8) सदर मालमत्ते संदर्भातील अन्य पूर्तता उदा. स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, विक्रीप्रमाणपत्राची नोंदणी करणे, इलेक्ट्रिसिटी चार्जेस, देय मिळकत कर व इतर अनुशंगिक खर्च याची जबाबादारी खरेदीदाराची आहे.
9) तारण मालमत्तेसंदर्भातील कोणत्याही अधिकाऱ्याने कायद्याने प्रस्थापित केलेली देणी इ. ची जबाबदारी बँक घेणार नाही. तसेच सदर मालमत्तेच्या कागदपत्रासंबंधीच्या चुका, त्रुटी, कमतरता इ. याकरीता बँक जबाबदार राहणार नाही. खरेदीदाराने मालमत्ते-संबंधातील तपशीलाची स्वतः शहानिशा करावी. अधिकृत अधिकारी यांना विनंती केल्यास कागदपत्रांची पाहणी करता येवू शकेल.
10) तारण मालमत्ता फक्त बँकेचा कर्ज बोजा मुक्त करुन विकण्यात येत आहेत. अधिकृत अधिकारी यांचे ज्ञान आणि माहितीनुसार सदर मालमत्तेवर अन्य कोणताही बोजा नाही.
11) खालील मिळकत पाहणीसाठी **दि. 03.03.2025 ते दि. 05.03.2025 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00** या वेळेत अधिकृत अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने पाहावयास मिळतील.
12) आयकर कायद्याच्या कलम 194 (1ए) अन्वये लागू असलेली 1% उद्गम कराची रक्कम भरण्याची जबाबदारी यशस्वी बोली धारकाची असेल आणि तो त्या प्रमाणे भरणा केल्याचा पुरावा अधिकृत अधिकारी यांच्याकडे सादर करेल.

**: परिशिष्ट :**

**कर्जदार/जामीनदारांची नांवे**

| कर्जदार | जामिनदार |
|---|---|
| **कर्जदार :- मेसर्स महावीर ट्रेडींग कंपनी** **प्रोप्रायटर :- श्री. मनोज शिवगोंडा पाटील** **पत्ता : 1)** सर्व्हे नं. 907, जैन बस्ती जवळ, मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर -416118 **पत्ता : 2)** फॅक्टरी :- गट नं. 312, मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर - 416118 | **जामिनदार :-** **1) श्री. राजेंद्र चतुरलाल शहा** **पत्ता :** 339, फ्लॅट नं. 42, लक्षदीप टॉवर्स, हॉटेल ग्रीन पार्क जवळ, शाहूपुरी, कोल्हापूर -416001 **2) श्री. महेश शिवानंद पिसे** **पत्ता :** 2078, इ वॉर्ड, राजारामपुरी, 12 वी लेन, कोल्हापूर - 416008 **3) श्री. अनिल नरसगोंडा पाटील (गहाणखतदार/संमतीदार)** **पत्ता :** सी. एस. नं. 907, जैन बस्ती जवळ, मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर - 416118 **4) सौ. अर्चना अनिल पाटील** **पत्ता :** सी. एस. नं. 907, जैन बस्ती जवळ, मौजे माणगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर - 416118 |

**स्थावर मिळकतीचा तपशील**

**अचल मालमत्ता :- मालक : श्री. अनिल नरसगोंडा पाटील**

**1)** जिल्हा कोल्हापूर, उपजिल्हा आणि तहसील हातकणंगले उपनिबंधक हातकणंगले यांच्या कार्यकक्षेतील, ग्रामपंचायत माणगांवच्या स्थानिक हद्दीतील गट क्रमांक 376 चे एकूण क्षेत्रफळ हे. 4.83 आर. पोट खराब हे. 00.27 आर. पैकी हे. 0.10 आर क्षेत्र. त्याच्या चतुसिमाः पुढील प्रमाणे – **पूर्वेस :** श्री. राजाराम बाबू परीट यांची मिळकत, **पश्चिमेस :** श्री. अरुण आणि अनिल संभाजी परीट यांची मिळकत, **दक्षिणेस :** नरसू सीताराम परीट यांची मिळकत, **उत्तरेस :** रस्ता.

| राखीव किंमती ₹ 1,21,00,000/- | बयाणा रक्कम ₹ 12,10,000/- |
|---|---|

**2)** जिल्हा कोल्हापूर, उपजिल्हा आणि तहसील हातकणंगले उपनिबंधक हातकणंगले यांच्या कार्यक्षेत्रातील, ग्रामपंचायत माणगावच्या स्थानिक हद्दीतील, सि.टी.एस. क्रमांक 907 चे एकूण क्षेत्रफळ 167.9 चौ. मी. आणि त्यावरील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक 907 वर केलेले बांधकाम क्षेत्र 1797 चौ. फूट. चतुसिमा : पुढील प्रमाणे – **पूर्वेस :** श्री. मालगोंडा पाटील यांची मिळकत, **पश्चिमेस :** श्री. कुबेर अण्णा पाटील यांची मिळकत, **दक्षिणेस :** श्री. रामगोंडा पाटील यांची मिळकत आणि रस्ता, **उत्तरेस :** रस्ता.

| राखीव किंमती ₹ 28,00,000/- | बयाणा रक्कम ₹ 2,80,000/- |
|---|---|

**उपरोक्त कर्जाची एकूण येणे बाकी दि. 31.01.2025 अखेर ₹ 2,77,03.642.21**
**+ दि. 01.02.2025 पासून व्याज व इतर खर्च**

**सरफेसी अधिनियम 2002 अंतर्गत सांविधिक 30 दिवसांची विक्री सूचना**

कर्जदार/जामीनदार यांना या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी लिलावाचे तारखेपूर्वी वर उल्लेखिलेली कर्जाची येणे बाकी रक्कम भरावी. अन्यथा वरील मालमत्तेची लिलावाद्वारे विक्री केली जाईल आणि उर्वरित रक्कम व्याज व इतर शुल्कासह आपल्याकडून वसूल केली जाईल.

**ठिकाणी : कोल्हापूर**
**दिनांक : 03.02.2025**

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.)

**सही/-**
**संतोष बनकर**
**सहाय्यक सरव्यवस्थापक व अधिकृत अधिकारी**
**दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे**
**मो. नं. +91 9922959642**

# महापालिकेच्या १०० सफाई कर्मचाऱ्यांचा इंदूरला दौरा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महापालिकेचे शंभर स्वच्छता कर्मचारी स्वच्छतेचा अभ्यास करण्यासाठी इंदूर दौऱ्यावर जाणार आहेत. कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून 'स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा' अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी मदत व्हावी, यासाठी ५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान हा अभ्यास दौरा होणार आहे.

केंद्र सरकारच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या स्पर्धेत गेल्या सात वर्षांपासून स्वच्छ सर्वेक्षणात इंदूर शहराला पहिला क्रमांक मिळत आहे. या शहरामध्ये स्वच्छतेसाठी काय केले जाते याची माहिती महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना व्हावी, यासाठी हा दौरा केला जात आहे. आमदार म्हणून विजयी झाल्यानंतर 'स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा' हे अभियान मतदारसंघात सुरु केले. त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून प्रयत्न केले जात आहेत. या अभियानाचा भाग म्हणून हा दौरा काढण्यात आल्याची माहिती आमदार हेमंत रासने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रासने म्हणाले, पुणे शहराची स्वच्छता करण्यामध्ये महत्वाची भूमिका निभावणाऱ्या १०० पेक्षा अधिक सफाई कर्मचाऱ्यांचा या दौऱ्यामध्ये समावेश असणार आहे. कसबा मतदारसंघात 'स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा' अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी स्वच्छतेचे रोलमॉडेल असणाऱ्या इंदूर शहराचा तीन दिवसीय अभ्यास दौरा ठरविण्यात आला आहे. इंदूर शहरातील कचरा प्रक्रिया प्रकल्प तसेच प्रत्यक्षात नियोजनबद्धपणे करण्यात येणारे कचरा संकलन याची पाहणी केली जाणार आहे. इंदूर स्मार्ट सिटीच्या प्रमुख श्रद्धा तोमर यावेळी सर्वांना मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी उज्जैनला देखील भेट दिली जाणार असून तेथील धार्मिक स्थळांच्या विकासाचे मॉडेल आपल्याकडे राबवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत, असेही आमदार रासने यांनी सांगितले.

# पत्नीला पेटवून देणाऱ्याला जन्मठेप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पत्नीवर रॉकेल ओतून तिचा खून करणाऱ्या एकाला अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. गंभीर भाजलेल्या पत्नीने ससून रुग्णालयात मृत्यूपूर्व जबाब दिला होता. जबाबाची चित्रफीत सरकार पक्षाकडून न्यायालयात सादर करण्यात आली. मृत्यूपूर्व जबाब, साक्ष, तसेच पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने शिक्षा सुनावली

तानाजी दत्ता उर्फ दत्तात्रय सरकाळे (वय २८, रा. तांदळी, शिरूर) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. तानाजी आणि प्रियांका (वय २१) यांचा २०१३ मध्ये विवाह झाला होता. त्यांना एक मुलगा आहे. तानाजी हा प्रियांकाच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करायचा. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर प्रियाकांच्या आई-वडिलांनी त्याला समजावून सांगितले होते. ७ मे २०१६ रोजी तानाजीने प्रियांकाशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्याने तिच्या अंगावर रॉकेल ओतले. रॉकेल ओतल्यानंतर ती घरातून बाहेर पळाली. तानाजीने तिला पेटवून दिले. त्यानंतर तिच्या अंगावर पाणी ओतून तो पसार झाला होता. स्टोव्ह पेटविताना पत्नी भाजली, असा बचाव त्याने केला होता.

गंभीर भाजलेल्या प्रियांकाला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिने मृत्यूपूर्व जबाब ससून रुग्णालयात दिला होता. उपचारादरम्यान तिचा ११ मे रोजी मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी केला. आरोपी तानाजीविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. या खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील नामदेव तरळगट्टी यांनी आठ साक्षीदारांची साक्ष नोंदवली.

---

## वसुली अधिकारी, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय द्वारा शिवाजीराव भोसले सहकारी बँक लि., पुणे (अवसायनात)

मुख्य कचेरी:- प्लॉट क्रं. ४०२, गेट नं. ४, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-४११०३७

फोन नं.- ९६८९९८९९०९, ९६८९९८९९१०, ९६८९९८९९१२, Email:- recovery.dept.sbsbpune@gmail.com

### जाहीर चतुर्थ ई-लिलाव सुचना

**तमाम लोकांस कळविण्यात येते की, थकबाकीदार श्री.घोलप अविनाश राजेंद्र** यांच्या कर्ज वसुलीबाबत म.स.सं. अधिनियम १९६० चे कलम १०० व म.स.सं. अधिनियम १९६१ चे नियम ८५ अन्वये प्राप्त झालेल्या मालकी हक्कात **शिवाजीराव भोसले सहकारी बँक लि., पुणे (अवसायानात)** असणाऱ्या खालील स्थावर मिळकतीचा म.स.सं.अ. १९६० चे कलम १५६ व म.स.सं.अ. १९६१ चे नियम १०७ अन्वये **"जशी आहे तशी व जेथे आहे तेथे"** या तत्वावर जाहीर **चतुर्थ ई-लिलावाने** विक्री करण्याचे ठरविले आहे.

| मिळकत मालकाचे नाव | मालमत्तेचा तपशील | मंजुर विपत्ती मुल्य (Distressed Value) रु. | बयाणा (EMD) रक्कम रु. | ई-लिलाव दस्तऐवज खर्च रु. (विनापरतावा) |
|---|---|---|---|---|
| शिवाजीराव भोसले सहकारी बँक लि., पुणे (अवसायानात) (१००/८५ अन्वये मालकी हक्कात नाव आहे) (कर्जदार श्री.घोलप अविनाश राजेंद्र यांची मालमत्ता होती.) | मौजे पवारवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे येथील गट नं. १६९ यासी एकुण क्षेत्रफळ ०१ हे. ४४ आर (पोटखराबासह) | रु.५७,६०,०००/- (अक्षरी रुपये सत्तावन्न लाख साठ हजार फक्त) | रु. ५,७६,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख शहात्तर हजार फक्त) | १,१८०/- (अक्षरी रुपये एक हजार एकशे ऐंशी फक्त) |

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | जाहीर चतुर्थ ई-लिलाव प्रसिद्धी दिनांक व वेळ | ०४/०२/२०२५ | सकाळी ११:०० वा. |
| २ | **ऑनलाईन निविदा सादर करण्यासाठी सुरु होण्याची दिनांक व वेळ (बयाणा रकमेसह)** | **०४/०२/२०२५** | **सकाळी ११:०० वा.** |
| | **ऑनलाईन निविदा सादर करण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ (बयाणा रकमेसह)** | **२५/०२/२०२५** | **दुपारी ०३:०० वा.** |
| ३ | मंजूरीची सुरु होण्याची दिनांक व वेळ | २७/०२/२०२५ | सकाळी ११:०० वा. |
| | मंजूरीची अंतिम दिनांक व वेळ | २८/०२/२०२५ | दुपारी ०३:०० वा. |
| ४ | **जाहीर चतुर्थ ई-लिलाव सुरु होण्याची दिनांक व वेळ** | ०१/०३/२०२५ | **सकाळी ११:०० वा.** |
| | **जाहीर चतुर्थ ई-लिलाव बंद होण्याचा दिनांक व वेळ** | ०१/०३/२०२५ | **दुपारी ०३:०० वा.** |

**टिप - १) जाहीर चतुर्थ ई-लिलाव दस्तऐवजाची किंमत, बयाणा (EMD) रक्कम, अटी व शर्ती** इत्यादींबाबत सर्व तपशील **www.eauction.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. २) दस्ताऐवजांची किंमत आणि बयाणा **(EMD)** रक्कम या खालील तपशीलाप्रमाणे अंतिम **दिनांक २५/०२/२०२५** पुर्वी **RTGS/NEFT** द्वारे भरावी लागेल. **Account Holder Name -** Shivajirao Bhosale Sahakari Bank Ltd., **Bank Name -** Canara Bank, **Branch -** Gultekadi New Market, Pune, **Account Number-**0382201004533, **IFSC Code-** CNRB0015327.

**सदरची ऑनलाईन पेमेंट केल्याची पावती जाहीर चतुर्थ ई-लिलावच्या वेळी लिफाफा-१ मध्ये जमा करावी.**

३) अधिक तपशीलवार माहितीसाठी कृपया **www.eauction.gov.in** या वेबसाईटला भेट द्या.

दिनांक- ०४/०२/२०२५.
स्थळ- पुणे.

शिक्का

सही/-
**वसुली अधिकारी, महाराष्ट्र राज्य, पुणे**
(म.स.का.१९६० चे कलम १५६ व म.स.सं.अ. १९६१ चे नियम १०७ अन्वये)
द्वारा - शिवाजीराव भोसले सहकारी बँक लि., पुणे (अवसायनात)

---

केनरा बैंक Canara Bank (A Government of India Undertaking) सिंडिकेट Syndicate

स्पेशलाईज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, सेंट्रम बिल्डींग, २ रा मजला, गोकुळ रोड, हुबळी-५८००३०. कर्नाटक, फोन : ०८३६-२२३९४१०.ईमेल : cb7261@canarabank.com,

## स्थावर / जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ (६) व ९ अधिकारांच्या अंतर्गत स्थावर / जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

**ई-लिलाव विक्रीची तारीख आणि वेळ - २५/०२/२०२५ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० पर्यंत**
**(विक्री संपेपर्यंत ५ मिनिटांच्या अमर्यादित वाढीसह)**
**बयाणा रक्कम सादर करण्याची अंतिम तारीख : दि. २४/०२/२०२५ रोजी दु. ४ पर्यंत**

या नोटीसीद्वारे साधारणपणे सर्व जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदारांना नोटीस दिली जाते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता कॅनरा बँकेकडे गहाण ठेवली होती. ज्याचा रचनात्मक ताबा स्पेशलाईज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, हुबळी, यांच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे व कर्जदार / जामीनदार असलेले **मेसर्स श्री दत्त चिले टेक्सटाइल,** प्लॉट नं.७/सी, सर्व्हे नं. ७६ आणि ७८, राणी चेन्नम्मा टेक्सटाइल पार्क, नेज गांव, तालुका चिक्कोडी, जिल्हा बेळगांव, कर्नाटक-५९१२३९ यांचे प्रतिनिधत्व करणारे मालक/जामीनदार श्री. महेश बसगोंडा पाटील, रा. २०/३९४, लिगाडे मळा, दत्तनगर, इचलकरंजी, कोल्हापूर,महाराष्ट्र-४१६११५ यांच्याकडून **रू. ७७,४९,३८४/- (रूपये सत्त्याहत्तर लाख एकोणपन्नास हजार तीनशे चौऱ्याऐंशी फक्त)** च्या आजवरच्या थकबाकी वसुलीसाठी तसेच **दि. ०१/१२/२०२४ पासून पुढील व्याज** आणि खर्च वसुलीसाठी कॅनरा बँक, ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, हुबळी ही स्थावर मालमत्ता **'जशी आहे तशी', 'जेथे आहे तेथे' आणि 'जे काही आहे तसे'** या तत्वावर **दि. २५/०२/२०२५** या तारखेला वर नमूद केलेल्या कर्जदार आणि हमीदारांची थकबाकी रक्कम वसूल करण्यासाठी विक्री करेल.

**स्थावर आणि जंगम मालमत्तेचे वर्णन**

**प्लॅन्ट आणि मशिनरी : CL678RL** शटललेस रॅपियर लूम्स रीड रुंदी २३० सें.मी. आणि त्यासोबत २ एचपी मोटर व २ एचपी ड्राइव्ह मोटर आणि ॲक्सेसरीजचे १० सेट यांचा सर्वसामाईक भाग जे प्लॉट नं. ७/सी, सवर्हे नं. ७६ आणि ७८, राणी चेन्नम्मा टेक्सटाइल पार्क, नेज गाव, तालुका चिक्कोडी, जिल्हा बेळगांव, कर्नाटक-५९१२३९ येथे स्थित आहे. • **राखीव किंमत : रू. ९.१८ लाख** • **बयाणा ठेव रक्कम : रू. ०.९२ लाख**

बँकेच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर कोणताही बोजा नाही. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया बँकेची वेबसाईट **(www.canarabank.com)** मध्ये दिलेली ई-ऑक्शन ही लिंक पहा अथवा मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, स्पेशलाइज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, हुबळी, कर्नाटक, फोन नं. ०८३६-२२३९४५७ व ९००८२२३७२२/ ९४८०६९६८०९ / ७९०३६००५२६ या क्रमांकावर कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**टीप : ए)** दि. २४/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० वा. किंवा त्यापूर्वी राखीव किंमतीच्या १०% एवढी रक्कम थेट पीएसबी अलायन्स प्रा.लि. च्या **(BAANKNET)** पोर्टलच्या ई-वॉलेटमध्ये जमा करावी किंवा चलन तयार करून ईएमडी रक्कम एनईएफटी/आरटीजीएसद्वारे खात्यावर जमा करावी. **बी)** ०३/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ या कालावधीत बँकांच्या कामकाजाच्या दिवसींमध्ये अधिकृत अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीने मालमत्तेची पाहणी केली जाऊ शकते. **सी)** लिलाव / बिडिंग फक्त मे. पीएसबी अलायन्स प्रा.लि. च्या **(BAANKNET) https://BAANKNET.com/** या वेबसाईटद्वारे ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडिंगद्वारे होईल. ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी बोलीदारांना तपशीलवार अटींबद्दल वेबसाईटवर संपूर्ण माहिती घेण्याचा सल्ला दिला जात आहे. इच्छुक बोलीदारांनी त्यांची नावे मे. पीएसबी अलायन्स प्रा.लि. च्या **(BAANKNET) https://BAANKNET.com/** येथे नोंदवावीत आणि त्यांचा यूजर आयडी आणि पासवर्ड विनाशुल्क मिळवावा. **डी)** वर नमूद केल्याप्रमाणे राखीव किंमतीवर लिलाव सुरू होईल. बोलीदार त्यांच्या ऑफरमध्ये रू. १०,०००.०० च्या गुणाकारात सुधारणा करतील. 'ऑनलाइन' लिलाव बंद केल्यावर जो बोलीदार सर्वाधिक बोली (राखीव किंमतीपेक्षा जास्त) सादर करेल त्याला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले जाईल. सुरक्षित धनकोने याची पूर्तता केल्यानंतरच यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीची पूर्तता केली जाईल. **इ)** लिलावाचे ठिकाण : ऑनलाईन लिलाव.

**दि. ०१/०२/२०२५, स्थळ : हुबळी** — **सही/- अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक**

---

केनरा बैंक Canara Bank (A Government of India Undertaking) सिंडिकेट Syndicate

**वसुली विभाग, क्षेत्रीय कार्यालय पुणे ।**
**प्रिमियम पॉईंट बिल्डींग, ४ था मजला, मॉडर्न हायस्कूल समोर, जे. एम. रोड, शिवाजीनगर, पुणे-४११००५**
**ईमेल :** recropune@canarabank.com, **फोन : ०२०-२५५१२११८.**

## ई-लिलाव विक्री सूचना

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रुल ८ (६) च्या अटींनुसार स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता ई-ऑक्शन विक्री सूचना**

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि कर्जदार व जामीनदार यांना विशेषकरुन सूचना देण्यात येते की पुढे नमूद केलेल्या स्थावर/जंगम मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत असून कॅनरा बँक संबंधित शाखेचे अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तेचा **ताबा** घेतला आहे, या संदर्भात **कर्जदार** यांच्याकडून संबंधित शाखांना येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि आकार वसुल करण्याकरिता सदर मालमत्तांची विक्री **"जसे आहे, जेथे आहे"** आणि **"जसे आहे, जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** या तत्त्वावर खाली नमूद तारखांना करण्यात येणार आहे. **स्थावर मालमत्ता, राखीव किंमत, बयाणा आणि बयाणा भरण्याची अंतिम तारीख यांचे पूर्ण तपशील खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | संपर्क क्र. व शाखेचे आणि कर्जदाराचे नाव | येणे रक्कम व ताब्याचा प्रकार | मालमत्तेचा तपशील | ई-ऑक्शनची तारीख | राखीव किंमत | बयाणा रक्कम आणि बयाणा भरण्याची अंतिम तारीख | माहित असलेला बोजा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शाखा : पुणे लक्ष्मी रोड II (१५३२०)** **संपर्क : ८२०८२४४४६०** **१) मे. जैन ट्रेडिंग कंपनी,** ५०८, नारायण पेठ, पत्र्यामारुती चौकाजवळ, पुणे-४११०३८ **२) श्री. वर्दीचंद वाघमल जैन-(कर्जदार), ३) सौ. शकुंतला वाघमल जैन (जामीनदार), ४) सौ. गीतांजली वर्दीचंद बिनाकिया, सर्व राहणार -** फ्लॅट नं. २ ए, आणि फ्लॅट नं. २ बी, २रा मजला, अभिजीत अपार्टमेंट, सीटीएस नं. ३९४, नारायण पेठ, तालुका हवेली, पुणे -४११०३० | रु. १,९१,७३,६७३.९२ **(रु. एक कोटी एक्याण्णव लाख त्र्याहत्तर हजार सहाशे त्र्याहत्तर आणि पैसे ब्याण्णव फक्त)** अधिक **त्यावरील** दि. ३१/१२/२०२४ पासूनचे व्याज व किंमत यांसहीत, **ताब्याचा प्रकार : प्रतिकात्मक ताबा** | १) फ्लॅट नं. २ ए, २रा मजला, अभिजीत अपार्टमेंट, सीटीएस नं. ३९४, क्षेत्रफळ ३७२ चौ. फू., लगतच्या टेरेसचे क्षेत्रफळ ११० चौ.फू., नारायण पेठ, तालुका हवेली, पुणे जिल्हा पुणे येथे स्थित, सौ. शकुंतला वाघमल जैन यांच्या नावे, **चतुःसीमा-पूर्वेस :** सीटीएस नं. ३९५, **पश्चिमेस :**सीटीएस नं. ३९३, **उत्तरेस :** रस्ता, **दक्षिणेस :** पोस्ट ऑफिससाठी राखीव भाग<br>२) फ्लॅट नं. २बी, २रा मजला, अभिजीत अपार्टमेंट बिल्डींग, सी. टी. एस नं. ३९४, क्षेत्रफळ ४७५ चौ. फू. टेरेसचे लगतचे बांधकाम क्षेत्रफळ १२३ चौ. फू. वर बांधण्यात आलेली, नारायण पेठ, तालुका हवेली, जि. पुणे येथे स्थित, **सौ. गीतांजली वर्दीचंद बिनाकिया** यांच्या नावे, **चतुःसीमा : पूर्वेस :** सीटीएस नं. ३९५, **पश्चिमेस :** सीटीएस, **उत्तरेस :** रस्ता, **दक्षिणेस :** पोस्ट ऑफिससाठी राखीव भाग, | २०/०२/२०२५ | रु. ७२,९०,०००/- (रूपये बाहत्तर लाख नव्वद हजार फक्त) | **रु. ७,२९,०००/- (रूपये सात लाख एकोणतीस हजार फक्त) दि. १९/०२/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ५.०० पर्यंत** | **बँकेला माहित नाही.** |
| २ | **शाखा : पुणे स्टेशन रोड, कॅम्प (१५३२४), संपर्क : ९८७००५०१२३** **१) श्री. कृष्णादेव पराडनाथ दुबे (कर्जदार), २) सौ. गीता कृष्णदेव दुबे (सह-कर्जदार), दोघेही राहणार :** एल-५५/१३६२, महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, येरवडा, जि. पुणे-४११००६. **३) श्री. दस्तगीर मगन मुलाणी (जामीनदार),** १ ली लेन, विशाल मेडीकल जवळ, स.नं. १९१, नागपूर चाळ, येरवडा, जि. पुणे-४११००६. **४) श्री. संपत कचरु पवार (जामीनदार),** ८ ७६ भैरवनाथ मंदिर, ९९, ताडीवाला रोडजवळ, जगताप चाळ, पुणे-४०१००१ | रु. ७४,७८,५०३.३६ **(रु. चौऱ्याहत्तर लाख अठ्ठ्याहत्तर हजार पाचशे तीन आणि पैसे छत्तीस फक्त)** अधिक त्यावरील दि. ३१/१२/२०२४ पासूनचे व्याज व किंमत **ताब्याचा प्रकार : प्रतिकात्मक ताबा** | दोन मजली रो हाऊस नं. ६७ चा सर्वसामाईक भाग, तळ + १ ला मजला, 'सज्जना को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., सीटीएस नं. १५२७, स.नं. १०बी, १४ए, १६ए, १७बी, १८बी, २५बी, टेनेमेंट नं. ६७, बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळ, गोल्फ क्लब रोड, येरवडा, ता. हवेली, जि. पुणे-४११००६. **श्री. कृष्णदेव पी. दुबे यांच्या मालकीचे.** | २०/०२/२०२५ | रु. २७,८०,०००/- (रूपये सत्तावीस लाख ऐंशी हजार फक्त) | **रु. २,७८,०००/- (रूपये दोन लाख अठ्ठ्याहत्तर हजार फक्त) दि. १९/०२/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी दु. ५.०० पर्यंत** | **बँकेला माहित नाही.** |
पुण्यासह मुंबई, ठाणे शहरात महिलांचे दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांनी पंधरा ते वीस वर्षांपूर्वी उच्छाद मांडला होता. साखळी चोरीच्या दिवसभरात किमान पाच ते सहा घटना पुणे शहरात घडतात. सणासुदीला तर साखळी चोरीच्या १५ ते २० घटना घडायच्या. निर्जन रस्त्यांवर महिलांना लक्ष्य करून दुचाकीस्वार चोरटे भरधाव वेगाने पसार व्हायचे. त्या वेळी शहरात मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नव्हते. सकाळी फिरायला जाणाऱ्या, मंदिरात, तसेच बाजारात खरेदीसाठी जाणाऱ्या महिलांना लक्ष्य करून चोरटे काही क्षणांत दागिने चोरून पसार व्हायचे.

साखळी चोरट्यांची दहशत एवढी वाढली होती, की निर्जन रस्त्यांवर पोलिसांनी गस्त घालण्यास सुरुवात केली. अनेकांचे सकाळी फिरायला जाणेही बंद झाले. गस्त घालूनही साखळी चोरीचे गुन्हे कमी होत नव्हते. पोलिसांनी पुणे, अंबरनाथ, तसेच लोणी काळभोर परिसरातील चोरट्यांची धरपकड सुरू केली. संशयित म्हणून ताब्यात घेतलेल्या चोरट्यांनी गुन्हे केल्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटकही केली जायची. मात्र, त्या वेळी साखळी चोरीचा गुन्हा दाखल करताना चोरीचे कलम लावले जायचे. चोरीच्या गुन्ह्यात न्यायालयाकडून त्यांना जामीन मिळायचा. त्यानंतर पुन्हा साखळी चोरीचे गुन्हे करण्यास चोरटे मोकळे व्हायचे. नेमकी ही बाब पुण्याचे तत्कालीन पोलीस आयुक्त डॉ. सत्यपाल सिंह यांनी हेरली. मुंबई गुन्हे शाखेत काम केलेले आणि संघटित गुन्हेगारीचा बिमोड करण्यास महत्त्वाची कामगिरी करणारे सिंह यांनी साखळी चोरांना जरब बसविण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या. त्यांनी साखळी चोरीचा गुन्हा दाखल करताना जबरी चोरीचे कलम लावण्याचे आदेश दिले. या कलमाचा वापर केल्याने चोरट्यांना जामीन मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या. साखळी चोरट्यांनी पुणे, मुंबई, ठाण्यासह देशभरात गुन्हे केल्याचेही तपासात निष्पन्न झाले होते. त्यांनी दागिने चोरीच्या गुन्ह्यातून लाखो रुपये कमावले होते. या पैशांमधून त्यांनी लोणी काळभोर भागात बंगले बांधले होते. साखळी चोरीचे गुन्हे संघटितपणे करून त्यांना स्थावर जंगम मालमत्ता उभी केली.

या पार्श्वभूमीवर, डॉ. सिंह यांनी साखळी चोरट्यांविरुद्ध 'मकोका' कायद्यान्वये कारवाईचा निर्णय घेतला आणि तशी कारवाईही सुरू केली. संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यातील कठोर तरतुदींचा वापर केल्याने साखळी चोरट्यांना जामीन मिळण्यास अडचण निर्माण झाली. 'मकोका'नुसार कारवाई केल्यानंतर किमान दोन ते चार वर्ष जामीन मिळत नसल्याने चोरट्यांना जरब बसली आणि पोलिसांच्या कठोर कारवाईचा संदेशही चोरट्यांपर्यंत पोहोचला. डॉ. सिंह यांची मात्रा लागू पडली आणि साखळी चोरीचे गुन्हे कमी होण्यास मदत झाली. अशा प्रकारचे गुन्हे नंतर थोडे कमी झाले. मात्र, गेल्या तीन ते चार महिन्यांत पुणे शहरात महिलांकडील दागिने हिसकावून नेण्याच्या घटना पुन्हा वाढीस लागल्या आहेत. महिलांना धक्का देऊन दागिने हिसकाविणाऱ्या साखळी चोरट्यांची मुजोरीही दिसून आली. त्यामुळेच पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी साखळी चोरट्यांविरुद्ध 'मकोका' कारवाई करू, असा इशारा दिला. अमितेश कुमार यांची ही घोषणा आश्वस्त करणारी ठरली असून, चोरट्यांविरुद्ध जरब बसविणारी कारवाई व्हायलाच हवी, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

rahul.khaladkar
@expressindia.com

# बनावट जामीनदारांच्या टोळीवर कारवाई

## दोन वकिलांसह ११ जणांना अटक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** बनावट कागदपत्रांचा वापर, तसेच बनावट जामीनदार न्यायालयात हजर करून सराइतांना जामीन मिळवून देणाऱ्या टोळीला वानवडी पोलिसांनी अटक केली. बनावट जामीनदारांच्या टोळीला मदत करणाऱ्या दोन वकिलांसह ११ जणांना अटक करण्यात आल्याची माहिती परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बनावट जामीनदार प्रकरणात काही महत्त्वाचे धागेदोरे मिळाल्यानंतर रविवारी रात्री उशिरा ॲड. अस्लम गफूर सय्यद आणि ॲड. सुरेश जाधव यांना अटक करण्यात आली. यापूर्वी न्यायालयात बनावट जामीनदार म्हणून उपस्थित राहिलेले आरोपी संतोषकुमार तेलंग, संजय पडवळ, सुभाष कोद्रे, ज्ञानेश्वर शिंदे, सुजित सपकाळ, भूपाल कांगणे, जितेंद्र यांना अटक करण्यात आली होती.

गुन्ह्यात अटक केल्यानंतर आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात येते. येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपींना जामीनदार उपलब्ध होत नसल्याने आरोपींनी वकिलांशी संगमनत करून बनावट जामीनदार न्यायालयात सादर केले. बनावट जामीनदार गुन्हेगारांच्या नातेवाइकांशी संपर्क साधून त्यांच्याकडून पैसे घ्यायचे. ही टोळी आधारकार्ड, शिधापत्रिका, सातबारा उतारे, तसेच संबंधित कागदपत्रे सादर करायची. शिधापत्रिकेवर बनावट सही, शिक्क्यांचा वापर करायचे. न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून कागदपत्रे मूळ असल्याचे भासवायचे. न्यायालयाची दिशाभूल करून आरोपी गुन्हेगारांना जामीन मिळवून द्यायचे.

बनावट जामीनदार उभे केल्याचे एक प्रकरण उघडकीस आल्यानंतर पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात आला. संतोषकुमार तेलंग याच्यासह पाच बनावट जामीनदारांना ताब्यात घेण्यात आले. मुख्य आरोपी फरहान उर्फ बबलू शेख पसार झाला. त्यानंतर सहा जणांना अटक करण्यात आली. शेख याला बनावट शिक्के तयार करून देणारा आरोपी दर्शन शहा यालाही अटक करण्यात आली. त्याच्याकडून बनावट रबरी शिक्के, तसेच यंत्र जप्त करण्यात आले. शिधापत्रिका देणारे आरोपी पिराजी शिंदे, गोपाळ कांगणे यांना अटक करण्यात आल्यानंतर त्यांच्याकडून ९५ शिधापत्रिका, ११ बनावट आधारकार्ड, मोबाइल संच, दुचाकी जप्त करण्यात आली.

### मुंबई, ठाणे, ग्रामीण भागातील बनावट जामीनदार

गंभीर गुन्ह्यातील आरोपींना न्यायालयाकडून जामीन मिळवून देण्यासाठी उपस्थित राहिलेले बनावट जामीनदार मुंबई, ठाणे, तसेच ग्रामीण भागातील असल्याचे उघडकीस आले आहे. त्यांना पैशांचे आमिष दाखवून न्यायालयात उपस्थित केले जात होते. त्यांच्या नावाची बनावट कागदपत्रे न्यायालयात सादर केली जायची, जामिनासाठी नातेवाइकांकडून घेण्यात आलेल्या रकमेपैकी काही रक्कम बनावट जामीनदारांना दिली जायची. बनावट जामीनदारांची २४ प्रकरणे उघडकीस आली आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यात येत आहे. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यजित आदमाने, गुन्हे शाखेचे निरीक्षक गोविंद जाधव, उपनिरीक्षक धनाजी टोणे आणि पथकाने ही कारवाई केली.



**वारजे माळवाडी येथील नदीवर पूल बांधण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून हे काम जवळपास ठप्प झाल्याचे चित्र आहे.**

# संशोधन केंद्रांचे लेखापरीक्षण

## माहिती सादर करण्यासाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे संशोधन केंद्रांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. या लेखापरीक्षणासाठी आवश्यक माहिती सादर करण्यासाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षणाबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या परिपत्रकानुसार संशोधन केंद्रांना माहिती भरण्यासाठीची सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाइन माहिती भरल्यानंतर त्या माहितीनुसार संशोधन केंद्रात उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नियुक्त केली जाणार आहे. ही समिती संशोधन केंद्राला भेट देऊन खातरजमा करणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पूर्वी तीन वर्षांपूर्वी विद्यापीठाने शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण केले होते. त्यात काही संशोधन केंद्रांमध्ये अनियमितता होत असल्याचे प्रकार निदर्शनास आले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे.

शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षणाबाबत विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, विद्यापीठातर्फे तीन वर्षांपूर्वी प्रत्यक्ष (ऑफलाइन) शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात आले होते. आता ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यात संशोधन केंद्रांनी त्यांची माहिती ऑनलाइन प्रणालीत भरायची आहे. त्यानंतर समितीकडून भेट देऊन पडताळणी केली जाणार आहे. लेखापरीक्षणाद्वारे संशोधन केंद्रात पीएच.डी. प्रवेशाशिवाय पेटंट किती, संशोधन किती हे तपासले जाणार आहे. याद्वारे संशोधन केंद्रांची गुणवत्ता, कामकाज, सोयीसुविधा याबाबतची माहिती समजणार आहे.



### संशोधन केंद्रांना उद्दिष्ट

लेखापरीक्षणानंतर एक नवीन संकल्पना राबवण्याचा मानस आहे, विद्यापीठाशी संलग्न सुमारे तीनशे संशोधन केंद्रे आहेत. संशोधनाची गुणवत्ता उंचावण्यासाठी प्रत्येक संशोधन केंद्राचे काहीतरी उद्दिष्ट, विषय निश्चित केले पाहिजेत. जेणेकरून संशोधन विषयांनुसार प्रवेश प्रक्रिया राबवणे शक्य होईल. केवळ संशोधन करणे, शोधनिबंध प्रसिद्ध होणे या पलीकडे जाऊन सखोल संशोधन, बौद्धिक संपदा निर्मिती करण्यावर भर देण्याची गरज आहे. गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी कार्यशाळांद्वारे मार्गदर्शन करण्यात येत आहे, असे डॉ. काळकर यांनी सांगितले.

## जनसंपर्कपदी हेमंतकुमार बेहरा

**पुणे :** मध्ये रेल्वे पुणे विभागाच्या जनसंपर्क अधिकारीपदी हेमंत कुमार बेहरा यांनी नुकताच पदभार स्वीकारला. या पदावर असलेले रामपाल बडपग्गा निवृत्त झाल्याने त्यांच्या रिक्त जागी बेहरा यांची नियुक्ती करण्यात आली. सध्या बेहरा विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक म्हणून पुणे रेल्वे प्रशासनात कार्यरत आहेत. २००५ मध्ये रेल्वे प्रशासनात व्यावसायिक व्यवस्थापनाच्या अनुषंगाने शिकाऊ म्हणून ते रुजू झाले होते.

## राष्ट्रवादीच्या (अजित पवार) आठ पदाधिकाऱ्यांचे निलंबन

**पुणे :** विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) मावळचे उमेदवार सुनील शेळके यांच्याविरोधात प्रचार करणाऱ्या आठ जणांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी हे निलंबन केले आहे.

मावळ विधानसभा मतदारसंघातून पक्षाने सुनील शेळके यांना अधिकृत उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत ते एक लाखांच्या मताधिक्याने विजयी झाले होते. मात्र, बाबूराव वायकर, सुभाष जाधव, सचिन घोटकुले, अंकुश आंबेकर, शिवाजी असवले, संतोष भेगडे, संतोष मन्हे आणि नामदेव शेलार यांनी आमदार शेळके यांच्याविरोधात प्रचार केला होता. 'पक्षाची शिस्त मोडल्याबद्दल जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी विचारणा केली होती. त्यानंतर या सर्वांनी जिल्हाध्यक्षांकडे राजीनामे दिले होते. त्यानुसार त्यांचे राजीनामे स्वीकारण्यात आले असून, त्यांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे,' अशी माहिती गारटकर यांनी दिली.

## म्हणायचे ते पूर्णांशाने उतरतेच असे नाही

### डॉ. अरुणा ढेरे यांची भावना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'आपण लिहितो, तेव्हा एका वेगळ्या कुठल्या तरी मितीमध्ये पाऊल टाकत असतो. त्यात रोजच्या जगण्यातले असते. आतले जे खोल असते त्याचा हात आपल्या हातामध्ये येतो आणि कागदावर उमटते. जी भाषा आपण वापरतो, तीच भाषा कवी वापरत असतो. पण, ज्या वेळी तो निर्मितीच्या पातळीवर भाषा नेतो, त्या वेळी त्या भाषेला एक वेगळे परिमाण लाभत असते. त्यामध्ये त्याच्या अनुभवाचे संचित, त्याची जीवनदृष्टी असते. आपल्याला म्हणायचे ते पूर्णांशाने उतरतेच असे नाही. शब्दांच्या कडेकडेने बरेचसे निसटते. शब्दांतून काय उजळून निघणार, हे कवीला माहीत असते. ते होते तेव्हा कवीला आनंद होतो आणि तो रसिकांसमवेत वाटून घेता येतो हे कवीचे भाग्य,' अशा शब्दांत प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी काव्यनिर्मितीची प्रक्रिया उलगडली.

डॉ. अरुणा ढेरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गमभन प्रकाशनचे जयदीप कडू यांनी, त्यांच्या कवितांच्या फ्रेमचे उद्घाटन आणि कवितांचे वाचन अशा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रसिद्ध कवयित्री डॉ. संगीता बर्वे, अंजली कुलकर्णी, आश्लेषा महाजन, आसावरी देशपांडे-जोशी, दीपाली दातार, शेषा जोशी, रावी जयदीप कडू यांनी त्यांना आवडलेल्या कवितांचे ढेरे यांच्यासमोर वाचन केले. डॉ. वर्षा तोडमल यांनी डॉ. ढेरे यांच्याशी संवाद साधला. ज्येष्ठ बालसाहित्यकार-चित्रकार ल. म. कडू, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, अक्षरधारा बुक गॅलरीच्या रसिका राठिवडेकर, रमेश राठिवडेकर, प्रसिद्ध चित्रकार गोपाळ नांदुरकर, जी. ए. कुलकर्णी यांच्या भगिनी नंदा पैठणकर, लेखिका वर्षा गजेंद्रगडकर या वेळी उपस्थित होत्या. चैत्राली अभ्यंकर यांनी डॉ. ढेरे यांच्या कवितेचे गायन केले. अपर्णा केळकर यांनी गायलेल्या अरुणाताईंच्या करुणाष्टकांनी या मैफलीची सांगता झाली.

# प्रतिकूल वास्तवात राहूनही 'त्यां'चे भविष्य 'त्यां'नी असे बघितले...!

**तुषार सूर्यवंशी, लोकसत्ता**

**झोपडपट्टीतील मुलांसाठी घेणू भाऊ खेसे प्राथमिक विद्यालयात आयोजित कला महोत्सवात कल्पनेच्या भरारीचे अनोखे दर्शन**

**पुणे :** चॉकलेट आणि कँडीने ओसंडून वाहणारी नदी... माणसापेक्षाही मोठा झालेला पिझ्झा-बर्गर आणि पॉपकॉर्न... मोबाइल-टीव्ही-घड्याळे इत्यादी इलेक्ट्रॉनिक वस्तू झाडावर टांगून कामावर गेलेली माणसे... कुणीही उपाशी राहू नये म्हणून सगळीकडे फळे आणि भाज्याच भाज्या... उलटी माणसे-उलट्या इमारती, सगळे काही उलटेच उलटे... वास्तवापासून फारकत घेणाऱ्या स्वप्नातील जादुई दुनियेची ही चित्रे साकारली होती दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या झोपडपट्टीतील लहान मुलांनी.

निमित्त होते नुक्कड कॅफे, भाग्यशाली भविष्य शिक्षा फाउंडेशन यांच्यातर्फे विमाननगर येथील घेणू भाऊ खेसे प्राथमिक विद्यालयात झोपडपट्टीतील मुलांसाठी आयोजित कला महोत्सवाचे. या महोत्सवात मुलांनी काढलेल्या वारली, मंडाला अशा विविध प्रकारच्या चित्रांचे प्रदर्शन आणि त्यांनी रचलेली गाणी, नृत्ये, पपेट शो इत्यादी कलांचे सादरीकरण करण्यात आले. भाग्यशाली भविष्य शिक्षा फाउंडेशनच्या कजरी मित्रा, नुक्कड कॅफेचे वैभव पालविया आणि कलाकार दीक्षा माने आदी या वेळी उपस्थित होते.

झोपडपट्टीत राहणारी ही मुले शिकतात आणि त्याचा त्यांना अभिमानही आहे. मात्र, आजूबाजूला कमालीचे दारिद्र्य, मानसिक-सामाजिक संघर्षही चालू आहे. मळलेले, झिंगलेले, उदासवाणे चेहरे असलेले जग नाकारून त्यांना बाहेरचे सुंदर चेहऱ्यांचे, सुंदर वस्त्रातील नीटनेटके चकचकीत जग हवे आहे. कलेच्या माध्यमातून ते हेच सांगू पाहतात. या मुलांना हवे ते रेखाटण्याचे, बोलण्याचे नैसर्गिक स्वातंत्र्य मिळते. उसळत्या वावटळीसारखे त्यांचे विचार रंगांमधून, शब्दांमधून आकार घ्यायला लागतात. जीवन अन् त्याच्या आशा-आकांक्षा, राग, संताप, संघर्ष सगळ्या भावभावना तेथे प्रवाही होतात.

झोपडपट्टीत राहणाऱ्या या मुलांच्या कलेतून समोर येते माणुसकीने भारलेले नवे जीवन. त्यांना अपेक्षा आहे भरपूर अन्नाची, सन्मानाची, त्याहूनही अधिक प्रेमाची. मनात दाटून आलेल्या अशा सगळ्या भावना व्यक्त करण्यासाठी महोत्सवाच्या शेवटच्या सत्रात ही मुले गात होती प्रसिद्ध गीतकार शैलेंद्र यांचे गाणे...

*किसी की मुस्कुराहटों पे हो निसार,*
*किसी का दर्द मिल सके*
*तो ले उधार,*
*किसी के वास्ते हो तेरे दिल में प्यार,*
*जीना इसी का नाम है...*



> विरोधाभासातून तयार झालेली सामाजिक-मानसिक परिस्थिती मुलांच्या जडणघडणीवर परिणाम करत असते. मुलांना वर्गात बसवून रोजचे विषय शिकवणे हेच मोठे आव्हान असते. अशा वेळी मुले मोकळेपणाने व्यक्त होत नाहीत. मात्र, कलेच्या माध्यमातून ते व्यक्त होऊ शकतात, या उद्देशाने हा कला महोत्सव आयोजित केला जातो.
> – **कजरी मित्रा,** संस्थापक, भाग्यशाली भविष्य शिक्षा फाउंडेशन

## संक्षिप्त

### जागतिक प्रकाश प्रवहन दिन साजरा

**मानसा फाऊंडेशन** या स्वयंसेवी आध्यात्मिक संस्थेच्या वतीने 'जागतिक प्रकाश प्रवहन दिन' साजरा करण्यात आला असून देशभरातील पंधराशेपेक्षा अधिक शाळांतून ७ लाख, ३४ हजार, ६८२ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. संस्थेचे संचालक जयंत देशपांडे, मनोज चोप्रा यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुराज कानडे, राखी चोप्रा, पुणे जिल्हा माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नंदकुमार सागर, सचिव प्रसाद गायकवाड, उपाध्यक्ष सुरेश कांचन, कार्याध्यक्ष शिवाजी कामठे यांनी हा उपक्रम राबविला.

### सामुदायिक विवाह सोहळा

**ज्येष्ठ समाजसेवक** रतनलाल गोयल यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त 'बिगर हुंडा सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून १५ मार्च रोजी हा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यात लग्न करणाऱ्या जोडप्यांना संसारोपयोगी वस्तू दिल्या जाणार आहेत. गरजू आणि विवाहेच्छुक जोडप्यांनी नोंदणी करण्यासाठी ९०४९९९२५६० किंवा ९४२२०२५०४९ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन रतनलाल गोयल आणि राजेश अग्रवाल यांनी केले.

### 'फॅबेक्स २०२५' राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**फेबर इंफायनाइट** कन्सल्टींग या संस्थेतर्फे व्यवसाय व्यवस्थापन क्षेत्रात होणाऱ्या महत्त्वपूर्ण बदलांचा वेध घेण्यासाठी 'फॅबेक्स २०२५' या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी, ७ फेब्रुवारीला हॉटेल ओ येथे हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संस्थेकडून देण्यात आली. या राष्ट्रीय परिषदेमध्ये अदानी ग्रुप, टाटा ग्रुप, ॲमनीयल फार्मास्युटिकल्स, याझाकी ग्रुप यांसह देशातील सुमारे १५० बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार आहेत.

### एमआयटी-एडीटी विद्यापीठात कायदाविषयक कार्यशाळा

**पुणे :** एमआयटी आर्ट, डिझाईन, टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लंडन येथील आंतरराष्ट्रीय कौन्सिल ऑफ ज्युरिस्ट्स यांच्यातर्फे 'व्यावसायिक नैतिकता आणि मानवी मूल्ये' या विषयावर कार्यशाळा नुकतीच झाली. कायदा



व्यवसायातील नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित करणे आणि विद्यार्थ्यांना न्याय व मूल्यांसाठी प्रेरित करण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा झाली.
विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. मंगेश कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी उपस्थित होते. कार्यशाळेत इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ज्युरिस्ट्सचे अध्यक्ष डॉ. आदिश अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. कायदा व्यवसाय समाज घडवण्याचे, न्यायासाठी लढण्याचे शक्तिशाली साधन आहे.
या व्यवसायात नैतिकता, समर्पण आवश्यक आहे. तसेच हा व्यवसाय व्यक्तीला समाजात नेतृत्व करण्यासाठी प्रेरित करतो, असे त्यांनी सांगितले. तर कायदा व्यवसाय हा केवळ एक करिअर नाही. न्याय, सत्यासाठी लढणारे हे श्रेष्ठ क्षेत्र आहे. त्याद्वारे व्यक्तीला समाजात मान आणि प्रतिष्ठा मिळते, असे डॉ. कराड यांनी नमूद केले.

## त गा दा
तक्रार गाऱ्हाणे दाद

# भटक्या श्वानांमुळे नागरिक त्रस्त

**शहरातील रस्तोरस्ती, तसेच टेकड्यांवरही भटक्या श्वानांनी उच्छाद मांडला आहे. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली असून, त्यांच्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. रात्री-अपरात्री ते नागरिकांच्या अंगावर धावून जातात किंवा गाड्यांचा पाठलाग करतात. त्यामुळे अपघात घडत आहेत. या भटक्या श्वानांचा कडक बंदोबस्त करावा, अशी अनेक नागरिकांची मागणी आहे. लोकसत्ताच्या वाचकांनी त्याबाबत कळविलेल्या या काही प्रतिक्रिया...**

### भटक्या श्वानांमुळे भीतीचे वातावरण

वडगाव शेरी भागातील साईनाथनगर परिसरात भटक्या श्वानांचा प्रश्न अधिकच सतावत आहे. गेल्या १५ ते २० दिवसांत या परिसरातील सात ते आठ जणांना भटक्या श्वानांनी चावा घेतला आहे. त्यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सकाळी, तसेच रात्रीच्या वेळीदेखील या भटक्या श्वानांचा त्रास नागरिकांना होतो. रात्री-अपरात्री हे भटके श्वान भुंकत असल्याने नागरिकांची रात्रीची झोप उडाली आहे. या श्वानांचा बंदोबस्त करावा, यासाठी महापालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनदेखील काहीही उपयोग झाला नाही.

**– रणजित कोरे,** वडगाव शेरी



### भूगावही त्रस्त

संपूर्ण भूगावमध्ये भटक्या श्वानांचा अक्षरशः सुळसुळाट आहे. वस्तुतः ग्रामपंचायतीने या भटक्या श्वानांचा बंदोबस्त करणे अपेक्षित आहे. मात्र, तसे होताना दिसत नाही. भटके श्वान स्त्रिया, मुले, ज्येष्ठ नागरिक यांच्यावर हल्ला करतात. रस्त्याने जाणाऱ्या वाहनांचा पाठलाग करणाऱ्या श्वानांमुळे अनेक अपघात होतात. रात्री-अपरात्री, पहाटे काळोखात या श्वानांची भुंकण्याची जणू जुगलबंदी सुरू असते. त्यामुळे झोपमोड होते. पावसाळ्यात या भटक्या श्वानांचे टोळीयुद्ध होते. भटक्या श्वानांना चुकीच्या पद्धतीने खायला देऊन त्यांचे लाड करणाऱ्या प्राणिप्रेमींमुळे ते सोकावतात. रेबीज इंजेक्शन वेळेवर देणे आवश्यक असते. मात्र, अनेकदा सरकारी रुग्णालयांमध्ये याचा तुटवडा असतो. याची जबाबदारी कोणतीही ग्रामपंचायत, नगर परिषद, महानगरपालिका घेत नाही. त्यामुळे भटक्या श्वानांचा योग्य बंदोबस्तही होत नाही. भटक्या श्वानांपेक्षा नागरिकांचा जीव अधिक मोलाचा नाही काय?

**– डॉ. वि. हे. इनामदार,** पौड रोड, भूगाव

### श्वान फिरविण्याबाबत नियमावली हवी

भांबुर्डा टेकडी परिसर आणि एआरएआय कंपनीजवळील टेकडी परिसर येथे फिरायला जाणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक आहे. यातील अनेक जण आपल्याबरोबर वेगवेगळ्या प्रकारचे, जातीचे, महागडे श्वान घेऊन येतात, त्यांच्यासाठी कठोर नियम तयार करून ठोस अंमलबजावणी गरजेची आहे. या श्वानांना पाहून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक घाबरतात. टेकडीवर फिरायला आलेल्या श्वानांच्या गळ्यात पट्टा असला, तरी ते अनेकदा नागरिकांच्या अंगावर धावून जातात, भुंकतात. मालकाला स्वतःचे श्वान सांभाळता आले पाहिजे. काही वर्षांपूर्वी या टेकडीवर श्वान आणायला बंदी आहे, असा फलक होता. मात्र, सध्या हा फलकच गायब झाला आहे. त्यामुळे श्वानांना घेऊन फिरायला येणाऱ्यांची मनमानी सुरू आहे. यासाठी कठोर नियमावली करून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे व दंड ठोठावला पाहिजे.

**– हरीश काळे,** आझादनगर, कोथरूड

### श्वानांचा त्रास आणि प्रशासनाचे दुर्लक्ष

विश्रांतवाडी, टिंगरेनगर परिसराचा अत्यंत झपाट्याने विस्तार झाला आहे. या भागात उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधींमुळे या परिसरात कामानिमित्त नागरिकांची ये-जा असते. मात्र, या भागात गेल्या काही महिन्यांपासून भटक्या श्वानांचा त्रास वाढतच चालला आहे. या परिसरात असलेल्या भटक्या श्वानांच्या त्रासामुळे सकाळी कार्यालयात जाताना नागरिकांना हा त्रास सहन करावा लागतो. काही दिवसांपूर्वी टिंगरेनगर भागातील एका सोसायटीमधील तीन ज्येष्ठ नागरिकांसह एका नागरिकाला भटक्या श्वानाने चावा घेतला. या भागात कामानिमित्त येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यांनाही भटक्या श्वानांचा त्रास सहन करावा लागतो. नागरिकांकडून वेगवेगळ्या पद्धतीने कर घेणाऱ्या महापालिकेला नागरिकांच्या सुरक्षिततेशी काही देणे-घेणे नाही, असेच चित्र सध्या आहे.

**– जयवंत आहेर,** टिंगरेनगर

**तुम्हीही मांडा गाऱ्हाणे**
तुमच्या भागात भटक्या श्वानांचा त्रास होतो का, याबाबत आम्हाला लिहून कळवा. त्यासाठी ई-मेल आयडी : lokpune4@gmail.com

(समन्वय : चैतन्य मचाले)

# डिसेंबरनंतर शहरात दररोज पाणीपुरवठा

## पिंपरी-चिंचवडचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** 'शहराची वाढती लोकसंख्या पाहता पाण्याचे स्रोत वाढविले जात आहेत. आंद्रा धरणातून शंभर आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी आणले जाणार आहे. या प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर असून डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर दररोज पाणीपुरवठा करण्याबाबतचा निर्णय शहराने घ्यावा,' अशी भूमिका महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मांडली.

आयुक्त शेखर सिंह यांनी सोमवारी 'द इंडियन एक्स्प्रेस' कार्यालयाला भेट दिली. त्या वेळी संपादकीय विभागाबरोबर झालेल्या संवादात ते म्हणाले, 'नागरीकरण झपाट्याने वाढत असून शहराची लोकसंख्या २७ लाखांच्या घरात गेली आहे. महापालिका प्रतिदिन पवना धरणातून ५२० दशलक्ष लिटर (एमएलडी), आंद्रा धरणातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १५ असे ६१५ दशलक्ष लिटर पाणी उचलते. परंतु, वाढत्या लोकसंख्येला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी हे पाणीही अपुरे पडत आहे. त्यामुळे दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागतो. आंद्रा धरणातून शंभर आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ दशलक्ष लिटर पाणी आल्यानंतर दररोज पाणीपुरवठ्याचा निर्णय शहराने घ्यावा. या प्रकल्पाचे काम डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण होईल.' 'पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पावरील स्थगिती शासनाने उठविली आहे. त्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. खासगी टँकरवर महापालिकेचे नियंत्रण नाही. उन्हाळ्यात पाणी वितरण कमी केले जात नाही. पाण्याची मागणी वाढते. महापालिकेच्या पाण्यावर शंभर टक्के प्रक्रिया केली जाते. मोठ्या गृहनिर्माण संस्था टँकरचे पाणी पिण्यासाठी वापरत नाहीत. पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर देण्यात येणार असून शंभर एमएलडी क्षमतेचे प्रकल्प उभारले जाणार आहेत,' असे सिंह यांनी सांगितले.



### आणखी एक कचरा डेपो आवश्यक

पुनावळे कचरा डेपोचा विषय संवेदनशील आहे. शहराला दुसऱ्या कचरा डेपोची आवश्यकता आहे. त्याला विरोध आहे. नागरिकांची समजूत काढण्यात यश आले नाही. डेपो रद्द झाल्याबाबत शासनाचे कोणतेही पत्र नाही. घर खरेदी करताना आसपास कोणते प्रकल्प येणार आहेत, याची माहिती नागरिकांनी घेतली पाहिजे. कोठे, कोणते आरक्षण प्रस्तावित आहे, याची माहिती विकास आराखड्यात असून हा आराखडा पालिकेच्या संकेतस्थळावर असल्याचेही त्यांनी सांगितले.

### आयुक्त उवाच...

- मिळकतकरात वाढ नाही
- ताथवडे, चिखली, किवळेत सांडपाणी प्रकल्पाचे काम सुरू
- विकास आराखड्यातील नवीन ३८ रस्त्यांचे काम हाती
- थेरगावात शंभर खाटांचे कर्करोग रुग्णालय
- देहूरोड कटक मंडळ महापालिकेत येणार नाही
- हिंजवडीचा महापालिकेत समावेश करण्याबाबत २०१६ मध्ये ठराव मंजूर
- मुळा नदी सुधारचे काम सुरू
- बीआरटी बंद केली जाणार नाही
- रेडझोन हद्दीचा अचूक नकाशा लवकरच
- हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी श्रेणीबद्ध कृती प्रतिसाद योजना
- रात्री दहानंतर बांधकामांवर बंदी
- जीबीएसच्या रुग्णांसाठी थेरगाव, वायसीएम रुग्णालयात खाटा आरक्षित

# अनधिकृत बांधकामांवर शुक्रवारपासून कारवाई

## कुदळवाडीतील बेकायदा बांधकामांबाबत पिंपरी महापालिका आयुक्तांची स्पष्टोक्ती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** चिखली, कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढून घेण्यासाठी व्यावसायिकांना सहा दिवसांची मुदत दिली आहे. मुदत संपल्यानंतर सात फेब्रुवारीपासून या भागातील सर्व अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जाईल. कारवाई थांबणार नाही. ही कारवाई करण्यासाठी कोणताही राजकीय दबाव नसल्याची स्पष्टोक्ती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने चिखली, कुदळवाडी परिसरातील भंगार दुकाने, गोदामे, तसेच हॉटेल, बेकरी, पत्राशेड, वर्कशॉप अशा पाच हजार अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांना नोटीस दिली होती.



विरोधानंतर व्यावसायिकांना सहा फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली आहे.

याबाबत आयुक्त सिंह म्हणाले, 'चिखली, कुदळवाडी परिसरात अनधिकृत बांधकामे वाढण्यात कोणाची चूक आहे की नाही, यात पडायचे नाही. अनधिकृत उद्योगांमुळे शहरातील प्रदूषण वाढत आहे.

बांधकामे सुरू असलेला परिसर आणि भंगार दुकाने असलेला कुदळवाडी, चिखली परिसर सर्वाधिक प्रदूषित आहे. ही भंगार दुकाने काढली जाणार आहेत. सात दिवसांची मुदत संपल्यानंतर येथील अनधिकृत आस्थापनांवर कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी कालमर्यादा (डेडलाइन) निश्चित केलेली नाही. पण, कारवाई होणारच आहे. गेल्या वर्षी आरक्षित जागेच्या अतिक्रमणांवर कारवाई केली आहे.'

'तळवडे परिसर रेड झोनमध्ये आहे. रेड झोन हद्दीत कोणतेही बांधकाम करता येत नाही. या परिसरातील औद्योगिक कंपन्या अनधिकृत आहेत. या भागात नवीन होणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जात आहे. तळवडेतील जुन्या कंपन्यांवरील कारवाईबाबतही निर्णय घ्यावा लागणार आहे. कुदळवाडीप्रमाणेच वाल्हेकरवाडीसह शहरातील सर्वच भागातील अनधिकृत आस्थापनांवर कारवाई केली जाईल,' असेही ते म्हणाले.

### एमआयडीसीतील घातक कचरा उचलणार नाही

भोसरीतील घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आहे, महापालिका घातक कचरा उचलत नाही. उद्योजकांनी रांजणगाव येथील प्रकल्पात कचरा द्यावा. एमआयडीसीत चार एकर क्षेत्रफळामध्ये २७ दशलक्ष लिटर (एमएलडी) क्षमतेचा समाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## 'नव ताझ धाम'चे रविवारी लोकार्पण

**पुणे :** लायन्स क्लब ऑफ पुणे, सारसबाग चॅरिटेबल ट्रस्टतर्फे तळेगाव एमआयडीसीजवळील आंबी येथे साकारण्यात आलेल्या 'नव ताझ धाम' या वृद्ध सेवा केंद्राचे लोकार्पण ९ फेब्रुवारी रोजी पालकमंत्री अजित पवार आणि खासदार सुनेत्रा पवार यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता करण्यात येणार आहे.

या प्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार सुनील शेळके उपस्थित राहणार आहेत. या प्रकल्पासाठी रुक्शाना आणि मेहेर अंकलेसरिया यांनी साडेचार कोटींची देणगी दिली आहे, अशी माहिती लायन्स क्लबचे अध्यक्ष फतेचंद रांका यांनी सोमवारी दिली. प्रकल्पाचे अध्यक्ष प्रशांत कोठाडिया, उपाध्यक्ष आशा ओसवाल, लायन्स क्लबच्या चैताली पटणी, केअरिंग हँड्स संस्थेचे उपाध्यक्ष सुधीर नाईक, सचिव अंबादास चव्हाण या वेळी उपस्थित होते.






# 'स्वस्त आयुष औषधी केंद्रांचे जाळे देशभर'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** आयुर्वेदात सर्व प्रकारच्या व्याधींवर परिणामकारक उपचारपद्धती आहे. आयुर्वेदाला जगभर सर्वमान्यता मिळू लागली आहे. आयुर्वेदासाठी संशोधनाची व्याप्ती वाढवण्यासह इनोव्हेशन व स्टार्टअप सुरू करण्यासाठी आयुष मंत्रालयामार्फत चालना दिली जाईल. देशभरात आयुष औषधी केंद्रांचे जाळे उभारण्यात येणार आहे, असे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले.

डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठ संचालित डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटर यांच्या पुढाकाराने नवी दिल्ली येथील ऑल इंडिया आयुर्वेद काँग्रेस, नेदरलँड येथील इंटरनॅशनल महर्षी आयुर्वेद फाउंडेशन व इंटरनॅशनल ॲकॅडमी ऑफ आयुर्वेद यांच्या सहकार्याने आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. स्मिता जाधव, खासदार श्रीरंग बारणे, अमेरिकास्थित शास्त्रज्ञ डॉ. टोनी नाडर, आयुष मंत्रालयाचे सल्लागार सचिव वैद्य मनोज नेसरी या वेळी उपस्थित होते.


**SWATANTRA THEATRE'S HINDI PLAYS** — 5th FEB. Tomm

**हमीदाबाई की कोठी** — 6.00pm — Written By Anil Barve

**ताजमहल का टेंडर** — Written By Ajay Shukla — 9.45pm

Produced by Yuwaraj Shah

VENUE: BALGANDHARV RANGMANDIR, J.M. Road Pune

बुकिंग : 9767178857 / 8329696186 BOOKMYSHOW



TITLE SPONSOR Fleetguard | Filtrum — ORGANISER

**गानसरस्वती महोत्सव**

७ ते ९ फेब्रुवारी २०२५ – महालक्ष्मी लॉन्स, राजाराम पुलाजवळ, पुणे

**शुक्रवार दि.७ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ५ वा.**
देवश्री नवघरे-भिडे - गायन ● तेजेंद्र नारायण मजुमदार - सरोद ● उल्हास कशाळकर - गायन

**शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ४ वा.**
कलापिनी कोमकली - गायन ● नंदिनी बेडेकर - गायन
शुजात खान - सतार ● राहुल देशपांडे - गायन

**रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५ सकाळी ८.३० वा.**
शौनक अभिषेकी - गायन ● अश्विनी भिडे-देशपांडे - गायन

**रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ४ वा.**
तेजस आणि राजस उपाध्ये - व्हायोलिन ब्रदर्स ● मंजुषा कुलकर्णी-पाटील - गायन
परंपरा के पदचिन्ह - संरचना : शमा भाटे ● रघुनंदन पणशीकर - गायन

निवेदक : विघ्नेश जोशी

दैनंदिन देणगी प्रवेशिका लॉन खुर्ची रु. १००/-
टिळक स्मारक मंदिर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे प्रवेशिका उलपब्ध
ऑनलाईन बुकींग : www.bookmyshow.com


## दैनंदिनी

- **रथसप्तमी महोत्सव :** व्यंकटेश्वरा देवस्थानम, नेहरू तरुण मंडळ, श्री बालाजी रथसप्तमी महोत्सव, सूर्यपूजन आणि सूर्यनमस्कार, (सकाळी ७), ध्वजपूजन, श्री बालाजींची पूजा, अभिषेक, (सकाळी ८), दिलीप सोनवणे लिखित 'एकच ते ब्रह्मांडनायक' पुस्तकाचे प्रकाशन, हस्ते - हेमंत रासने, महाआरती, (सकाळी ११), महाप्रसाद, (दुपारी १२), दीपोत्सव, (सायं. ६.३०), रथयात्रा, (सायं. ७), स्थळ - श्री बालाजी मंदिर, ११५, नाना पेठ
- **शिबिर :** कै.वैद्य रामचंद्र बल्लाळ गोगटे यांची जयंती, 'इंडियन ड्रग्स रिसर्च असोसिएशन अँड लॅबोरेटरीचे इंटिग्रेटीव्ह पेन मॅनेजमेंट क्लिनिक, गोगटे फाउंडेशनच्या, विनामूल्य अग्निकर्म आणि विद्धकर्म चिकित्सा शिबिर, स्थळ - महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाचे प्रादेशिक केंद्र, डॉ. घारपुरे बंगला, शिवाजीनगर, सकाळी १०.३० ते दुपारी १२.३०
- **महोत्सव :** महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महामाता रमाई महोत्सव, आडकर फाऊंडेशनच्या सहकार्याने विनोदी कवितांचा कार्यक्रम, सहभाग - भालचंद्र कोळपकर, अनिल दीक्षित, अध्यक्ष- प्रभा सोनवणे, स्थळ - रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, वाडिया महाविद्यालयासमोर, सायं. ६
- **आनंद मेळावा :** सहजानंद ॲकॅडमी, एकल महिला आणि पुरुषांचा आनंद मेळावा, प्रमुख उपस्थिती - मिलिंद जोगळेकर, इंद्रजित साळुंके, स्थळ - राजा मंत्री उद्यान, एरंडवणे, सायं. ६




## संक्षिप्त

### बडोद्याचा महाराष्ट्रावर १८६ धावांनी विजय

**बोईसर :** बडोदा संघाने 'बीसीसीआय'च्या १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत अखेरच्या दिवशी महाराष्ट्रावर १८६ धावांनी विजय मिळवला. पहिल्या डावात २२४ धावांची मजल मारल्यावर बडोद्याने महाराष्ट्राचा पहिला डाव ९८ धावांत गुंडाळला होता. त्यानंतर दुसऱ्या डावांत फलंदाजीचा निर्णय घेत बडोदा संघाने ६ बाद १७६ धावसंख्येवर दुसरा डाव घोषित करुम महाराष्ट्रासमोर ३०३ धावांचे आव्हान ठेवले होते. महाराष्ट्राचा दुसरा डाव ११७ धावांत संपुष्टात आला.

### तमिळनाडूवर फॉलोऑनची नामुष्की

**तिरुपूर :** सी. के. नायडू (२३ वर्षांखालील) क्रिकेट स्पर्धेतील सामन्यात महाराष्ट्राच्या ८ बाद ६२४ धावसंख्येला उत्तर देताना तमिळनाडूचा पहिला डाव ३०८ धावांत संपुष्टात आला. महाराष्ट्राने फॉलोऑन लादल्यानंतर तिसऱ्या दिवसअखेरीस तमिळनाडूने दुसऱ्या डावात बिनबाद २७ धावा केल्या होत्या. महाराष्ट्राकडून विकी ओस्तवालने १०१ धावांत ७ गडी बाद केले.

### फुटबॉल : आर्यन्स, व्हिजन स्पोर्ट्स विजयी

**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेच्या युवा लीग स्पर्धेत ७ वर्षांखालील गटात आर्यन्स स्पोर्ट्स फाऊंडेशन, व्हिजन स्पोर्ट्स, कॉन्शस स्पोर्ट्स, अशोका फुटबॉल क्लब, यंग स्टेप्स अकादमी यांनी विजय मिळवले. आर्यन्सने पुणे पायोनिअर्सचा ५-१, व्हिजनने अँड्रेलाईन स्पोर्ट्स क्लबचा २-०, कॉन्शसने साई अकादमीचा ३-२, अशोका संघाने सिग्मय एफसीचा ४-२ आणि यंग स्टेप्सने शॉ स्पोर्ट्स अकादमीचा ३-२ असा पराभव केला.

# प्रज्ञानंदला अजिंक्यपद

## गुकेशला नमवत टाटा स्टील बुद्धिबळात विजेता

**वृत्तसंस्था, विक ॲन झी**



**आपला जिवलग** मित्र जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशविरुद्ध अतिशय चुरशीच्या झालेल्या 'टायब्रेकर'मध्ये पहिला डाव गमावल्यानंतर दमदार पुनरागमन करून उर्वरित दोन डाव जिंकताना भारताच्या आर. प्रज्ञानंद याने प्रतिष्ठेच्या टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. ही स्पर्धा जिंकणारा प्रज्ञानंद हा विश्वनाथन आनंदनंतरचा दुसरा भारतीय बुद्धिबळपटू आहे.

टाटा स्टील स्पर्धेचा अखेरचा दिवस अतिशय रोमहर्षक ठरला. अखेरच्या १३व्या फेरीपूर्वी प्रज्ञानंद आणि गुकेश यांची संयुक्त आघाडी होती. या दोघांच्याही खात्यावर ८.५ गुण होते. गेल्या वर्षीच्या अखेरीस जगज्जेतेपद पटकावल्यानंतर आपली पहिलीच स्पर्धा खेळणारा गुकेश अपराजित होता. अखेरच्या फेरीत त्याच्यासमोर भारताच्याच अर्जुन एरिगेसीचे आव्हान होते. एरिगेसीला या स्पर्धेतील आपल्या पहिल्या विजयासाठी १२व्या फेरीपर्यंत वाट पाहावी लागली होती. त्यामुळे गुकेश त्याला पराभूत करत जेतेपदाच्या जवळ पोहोचेल असा अंदाज वर्तविण्यात येत होता. मात्र, काळ्या मोहऱ्यांनी खेळताना एरिगेसीने गुकेशला पराभवाचा धक्का देत जेतेपदाच्या शर्यतीत अधिकच चुरस निर्माण केली.

> माझ्या भावना शब्दांत मांडणे अवघड आहे. मला जेतेपदाची अपेक्षा नव्हती. मात्र, अखेरच्या दिवशी गोष्टी माझ्या बाजूने घडल्या आणि मी विजेता झालो. मला बहुतेक अर्जुनलाही (एरिगेसी) काहीतरी भेटवस्तू द्यावी लागेल. त्याने गुकेशला पराभूत केले म्हणूनच मला संधी निर्माण झाली. **– आर. प्रज्ञानंद**

दुसरीकडे, प्रज्ञानंदची गाठ जर्मनीच्या व्हिन्सेन्ट केमेरशी पडली. तब्बल सहा तास आणि ८० चालींच्या झुंजीनंतर प्रज्ञानंदला केमेरकडून हार पत्करावी लागली. त्यामुळे गुकेश आणि प्रज्ञानंद यांचे समान ८.५ गुणच राहिले. अखेर विजेता ठरविण्यासाठी जलद 'टायब्रेकर'चा अवलंब करावा लागला. यात प्रज्ञानंदने बाजी मारली.

### 'टायब्रेकर'चा थरार...

- 'टायब्रेकर'च्या पहिल्या डावात प्रज्ञानंदला पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळण्याची संधी मिळाली. काळ्या मोहऱ्यांसह गुकेशने बेनोनी बचावपद्धती अवलंबली. गुकेशने प्रज्ञानंदवर दडपण आणले. यावेळी प्रज्ञानंदकडून चूक झाली आणि त्याने हत्ती गमावला. त्यानंतर गुकेशने अचूक खेळ करत पहिला डाव जिंकला.
- दुसऱ्या डावात पुन्हा पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या प्रज्ञानंदने ट्रॉम्पोवस्की पद्धतीने सुरुवात केली. यावेळी त्याने घाई केली नाही. त्याने गुकेशकडून चूक होण्याची वाट पाहिली. गुकेश चुकला आणि प्रज्ञानंदने त्याचे प्यादे बाद केले. त्यानंतर त्याने तांत्रिकदृष्ट्या अतिशय उच्च दर्जाचा खेळ करत गुकेशला पराभूत केले आणि 'टायब्रेकर'मध्ये 1-1 अशी बरोबरी साधली.
- त्यानंतर 'सडनडेथ' सुरू झाले. यावेळी गुकेशला पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळण्याची संधी मिळाली. 'सडनडेथ'मध्ये दोघेही अचूक चाली रचत असल्याने आणखी एक डाव खेळावा लागणार असे चित्र निर्माण झाले होते. मात्र, वेळेचे गणित साधतानाच गुकेशकडून मोठी चूक झाली आणि त्याने प्रथम प्यादे, मग अश्वाला गमावले. प्रज्ञानंदने संधीचा फायदा घेत जेतेपद मिळवले.

# आदितीसह महिला तिरंदाजांचा सांघिक विक्रम

**डेहराडून :** महाराष्ट्राची युवा जगज्जेती तिरंदाज आदिती स्वामीच्या वैयक्तिक विक्रमासह महाराष्ट्राच्या महिला तिरंदाजी संघानेही सांघिक प्रकारात स्पर्धा विक्रमाची नोंद केली. जलतरणात सान्वी देशमुखने वैयक्तिक दुसऱ्या सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. ट्रॅक सायकलिंगमध्ये श्वेता गुंजाळने सोनेरी यश संपादन केले. महाराष्ट्राने १५ सुवर्ण, २६ रौप्य आणि २० कांस्य अशा एकूण ६१ पदकांसह तिसरे स्थान कायम राखले.



**आदितीचा अचूक वेध**

तिरंदाजीच्या कम्पाऊंड आणि रीकर्व्ह प्रकारात महाराष्ट्राने महिला सांघिक व मिश्र दुहेरीची अंतिम फेरी गाठून महाराष्ट्राची किमान चार पदके निश्चित केली. प्राथमिक फेरीत महाराष्ट्राच्या महिलांनी कम्पाऊंड प्रकारात २१०० गुणांचा, तर आदितीने वैयक्तिक ७०२ गुणांचा स्पर्धा विक्रम नोंदवला. रीकर्व्ह प्रकारात महाराष्ट्राने उपांत्य फेरीत झारखंड संघावर ५-३ अशी सनसनाटी मात केली.

**सान्वीचे दुसरे सुवर्ण**

महाराष्ट्राच्या सान्वी देशमुखने २०० मीटर वैयक्तिक मिडले शर्यतीत सुवर्णपदक पटकावले. स्पर्धेतील हे तिचे दुसरे सुवर्ण ठरले. यापूर्वी तिने ४०० मीटर वैयक्तिक मिडले प्रकारात सोनेरी यश मिळवले होते. सान्वीने २०० मीटर शर्यतीत २ मिनिटे २४.९० सेकंद अशी वेळ दिली.

**स्क्वॉशमध्ये दोन रौप्य**

स्क्वॉश प्रकारात राहुल बैठा आणि अंजली सेमवाल यांनी रौप्य, तर सूरज चंदाने कांस्यपदकाची कमाई केली. पुरुषांच्या सुवर्णलढतीत राहुलला अग्रमानांकित व्ही. सेंथिलकुमारकडून ११-६, ११-९, ११-७ असा पराभव पत्करावा लागला. महिलांच्या लढतीत अंजली गोव्याच्या आकांक्षा साळुंखेकडून ६-११, ५-११, ४-११ अशी पराभूत झाली.

**श्वेताला सुवर्ण**

ट्रॅक सायकलिंग स्पर्धेत श्वेता गुंजाळने एलिट स्प्रिंट प्रकारात सोनेरी यश मिळवले. तिने अंदमान निकोबारच्या सेलेस्टिनावर मोठी आघाडी घेत बाजी मारली.

### सॅमसनच्या बोटाला फ्रॅक्चर

**नवी दिल्ली :** भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज संजू सॅमसनच्या उजव्या हाताच्या बोटाला फ्रॅक्चर असून त्याला पाच ते सहा आठवडे मैदानाबाहेर राहावे लागणार आहे. त्यामुळे तो रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्यपूर्व लढतीत केरळचे प्रतिनिधित्व करू शकणार नाही. ८ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या लढतीत केरळची जम्मू-काश्मीरशी गाठ पडणार आहे. रविवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या इंग्लंडविरुद्ध पाचव्या ट्वेन्टी-२० सामन्यात फलंदाजीदरम्यान सॅमसनला दुखापत झाली. वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचा चेंडू त्याच्या उजव्या हाताला आदळला. तो क्षेत्ररक्षणासाठी येऊ शकला नाही.

## ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये धोका पत्करणे गरजेचेच -गंभीर

**मुंबई :** ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये धोका पत्करण्यावाचून पर्याय नाही. 'जितका अधिक धोका, तितक्या मोठ्या यशाची संधी' या मताचा मी आहे. त्यामुळे मी खेळाडूंना नैसर्गिक खेळ करण्याची पूर्ण मोकळीक दिली आहे. मी अपयशाला घाबरत नाही आणि खेळाडूंच्या मनावरही हेच बिंबवण्याचा माझा प्रयत्न आहे, असे वक्तव्य भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने केले.

गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाला कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करता आलेली नाही. ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये मात्र भारतीय संघ दमदार खेळ करत आहे. नुकत्याच झालेल्या पाच सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेत भारताने इंग्लंडला ४-१ अशी धूळ चारली. मुंबई येथे झालेल्या पाचव्या सामन्यात भारताने ९ बाद २४७ असा धावांचा डोंगर उभारला. ट्वेन्टी-२० क्रिकेटमधील भारताची ही चौथी सर्वोच्च धावसंख्या ठरली.

''ट्वेन्टी-२० प्रारूपात आम्हाला असेच क्रिकेट खेळायचे आहे. सातत्याने २५०-२६० धावांचे आव्हान उभे करण्याचे आमचे ध्येय आहे. इतकी मोठी धावसंख्या उभारण्याच्या प्रयत्नात कधीतरी आम्ही १२०-१३० धावांत गारद होऊ याचीही मला कल्पना आहे. मात्र, हेच ट्वेन्टी-२० क्रिकेट आहे. तुम्हाला धोका पत्करण्यावाचून पर्याय नाही,'' असे गंभीरने नमूद केले.


**बँक ऑफ महाराष्ट्र**

**तुमच्या स्वप्नातील मालमत्ता मिळवा**

**ई-लिलावासाठी आमंत्रण नोटीस**

बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या मालमत्तांच्या (निवासी आणि व्यावसायिक) विक्रीसाठी आयोजित ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदारांना आमंत्रित करत आहे.

**स्थाने:**

| | | |
|---|---|---|
| मुंबई | दिल्ली | पुणे |
| गोवा | शिर्डी | सोलापूर |
| बेळगाव | मालवण | बीड |

| | |
|---|---|
| पूर्व-बोली बैठक | :10/02/25 दुपारी 4 वाजता |
| EMD जमा करण्याची अंतिम तारीख | :27/02/25 संध्याकाळी 5 वाजेपर्यंत |
| ई-लिलावाची तारीख व वेळ | :27/02/25 सकाळी 11 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत |

**मालमत्तेची प्रत्यक्ष पाहणी:**
कामकाजाच्या दिवशी सकाळी 11 ते संध्याकाळी 5 दरम्यान 4 फेब्रुवारी 25, मंगळवार ते 27 फेब्रुवारी 25, गुरुवार याकाळात मालमत्ता पाहता येईल. कृपया पाहण्याच्या वेळेसाठी श्री. नितीश मेहरोत्रा - 750-3236-695 / श्री. रोहन पेंडके 797-7201-574 यांच्याशी संपर्क साधा.

ई-लिलाव BAANKNET पोर्टलद्वारे घेतला जाईल. EMD भरण्यासाठी कृपया www.baanknet.com/eauction-psb/home येथे नोंदणी करा.

**अधिक माहितीसाठी भेट द्या:**
www.bankofmaharashtra.in/tenders आणि https://baanknet.com/

**दिनांक: 04/02/25**

**सहाय्यक महाव्यवस्थापक**
**कॉर्पोरेट सेवा विभाग**



ADVERTORIAL

# आयुर्वेद व ॲलोपॅथी समन्वयात्मक उपचार - कॅन्सर रुग्णांसाठी वरदान



**डॉ. स. प्र. सरदेशमुख**
**अध्यक्ष**, भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट,
**संचालक**, इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटर, वाघोली, पुणे - ४१२२०७.

**भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट, वाघोली, पुणे ही धर्मादाय संस्था १९५४ पासून आरोग्य व शिक्षण यांत कार्यरत आहे. ४ वेद, ६ शास्त्र, ११ पुराणे, १४ विद्या व ६४ कला अशा संपन्न भारतीय संस्कृतिचा जगभर प्रचार व प्रसार करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. संस्थेतर्फे**

**आयुर्वेद रूग्णालय व संशोधन केंद्र, पंचकर्म रूग्णालय, आयुर्वेद महाविद्यालय, इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटर, संजीवनी वनौषधी उदयान, गोशाळा, केशव आबाजी इंग्लिश मिडियम स्कूल यांचे काम चालू आहे.**

ई-मेल : ictrcpunegmail.com
फोन नं.: ०२०-६७३४६००० / ९५४५५०८८९० (WhatsApp)

गेल्या ३० वर्षांपासून भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट संचालित इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटर, वाघोली, पुणे समन्वयात्मक कॅन्सर चिकित्सा क्षेत्रात कार्यरत आहे. १९९४ साली परमपूज्य प्रभाकर केशव सरदेशमुख महाराजांनी बॉम्बे हॉस्पिटलच्या रेडियेशन ऑन्कॉलॉजी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरविंद कुलकर्णी, सोलापूर येथील प्रसिध्द कॅन्सर सर्जन डॉ. शिरीष कुमठेकर आणि डॉ. सदानंद. प्र. सरदेशमुख यांच्या सहकार्याने कॅन्सर संशोधन प्रकल्पाचे काम सुरू केले. या प्रकल्पातंर्गत अनेक प्रकारच्या कॅन्सरग्रस्त रूग्णांना आयुष्याची गुणवत्ता व आयुर्मान उंचावण्यासाठी तसेच रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आधुनिक चिकित्सेबरोबरच समन्वयात्मक आयुर्वेदिक चिकित्सा देण्यात आली आहे.

इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटर भारत सरकारच्या Ministry of AYUSH व्दारा अनुदानित व प्रमाणित केंद्र आहे. या केंद्रात कॅन्सर चिकित्सेसाठी अद्ययावत कोबाल्ट रेडियेशन सेंटर सुरू करण्यासाठी भारत सरकारच्या ॲटॉमिक एनर्जी विभागाकडून अर्थसहाय्य देण्यात आले आहे. प्रथितयश टाटा ट्रस्टनेही विविध शास्त्रीय संशोधन उपक्रमांसाठी तसेच कॅन्सर रुग्णांकरिता पंचकर्म हॉस्पिटलच्या उभारणीसाठी इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटरला अर्थसहाय्य केले आहे. हे केंद्र इंडियन कॅन्सर सोसायटीव्दाराही प्रमाणित केंद्र आहे. हे केंद्र आधुनिक वैद्यकीय कॅन्सर चिकित्सेसाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठीही (PMJAY) प्रमाणित केंद्र आहे. आतापर्यंत या केंद्रात अनेक गरजू कॅन्सर रुग्णांनी या योजनांचा लाभ घेतला आहे. भारतातील तसेच जपान, जर्मनी, रशिया, ऑस्ट्रिया, ऑस्टेलिया, यु.एस.ए. येथील १४,००० पेक्षा अधिक कॅन्सर रुग्णांनी या केंद्रातील आयुर्वेदिक चिकित्सेचा लाभ घेतला आहे. इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटरतर्फे (आयसीटीआरसी) आतापर्यंत संपूर्ण भारतभर विविध ठिकाणी समाज प्रबोधनासाठी ५०० हून अधिक चिकित्सा शिबीरे, कार्यशाळा, व्याख्याने व प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले आहे. इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटरतर्फे कॅन्सर - आयुर्वेद विषयक अनेक लेख व ५० हून अधिक शास्त्रीय शोधनिबंध प्रसिध्द झाले आहेत.

या केद्रांतर्गत योग्य दस्तऐवजीकरणाव्दारे पध्दतशीरपणे शास्त्रीय संशोधन टाटा कॅन्सर सेंटरच्या इम्युनोलॉजी डिपार्टमेंटच्या माजी विभागप्रमुख कै. डॉ. सुधा गांगल, CSIR च्या माजी इमिरेटस संशोधिका व ACSIR च्या इमिरेटस प्राध्यापिका डॉ. विद्या गुप्ता, टाटा हॉस्पिटल संलग्नित ACTREC चे माजी संचालक डॉ. शुभदा चिपळूणकर व डॉ. राजीव सरीन यांसारख्या संशोधकांच्या मार्गदर्शनाखाली केले जाते. आम्ही ॲडव्हान्स सेंटर फॉर ट्रीटमेंट रिसर्च अँड एज्युकेशन इन कॅन्सर (ACTREC), खारघर - नवी मुंबई, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर (BARC) मुंबई, टाटा मेमोरियल हॉस्पिटल (ढचक), HCG मानवता कॅन्सर सेंटर - नाशिक, सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल - पुणे, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (NCL)

पुणे आणि इंडियन ड्रग रिसर्च असोसिएशन लॅब (IDARL) यांसारख्या प्रथितयश संस्थाबरोबर शास्त्रीय संशोधनाचे काम करीत आहोत.

भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्टच्या इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटरने गेल्या ३० वर्षांतील क्लिनीकल काम आणि संशोधनावर आधारित तसेच २०१५ पासून टाटा ट्रस्टव्दारे संशोधनासाठी मिळालेल्या अनुदानामुळे कॅन्सरवर प्रभावी ११ आयुर्वेदिक औषधी योगांची भारतीय व अमेरिकन पेटंटसाठी नोंदणी व प्रकाशन केले आहे.

इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट ॲण्ड रिसर्च सेंटरमध्ये कॅन्सरग्रस्त रुग्णांना एकाच छत्राखाली केमोथेरॅपी, रेडिओथेरॅपी, शस्त्रकर्म, कॅन्सर निदानात्मक तपासण्या यासह आयुर्वेदिक औषधोपचार, पंचकर्म, आहार चिकित्सा, जीवनशैली मार्गदर्शन, समुपदेशन, योग चिकित्सा यासारख्या प्रभावी चिकित्सापध्दती उपलब्ध आहेत. रेडिओथेरॅपीसाठी नुकतेच सेंटरने अद्ययावत व अत्याधुनिक Liniac रेडिओथेरॅपी मशिन सुरु करुन महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कॅन्सरग्रस्त रुग्णांना अत्याधुनिक कॅन्सर चिकित्सेचे नवे दालन खुले केले आहे.

केमोथेरॅपी व रेडिओथेरॅपी या सर्व प्रकारच्या कॅन्सरसाठी आवश्यक चिकित्सापध्दती असल्या तरी अनेक कॅन्सरग्रस्त रुग्णांमध्ये त्याचे दुष्परिणामही जाणवतात. इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट ॲण्ड रिसर्च सेंटरने यासाठी शास्त्रीय चाचण्यांवर प्रमाणित केलेले व अनुभवसिध्द असे २ केमो रिकव्हरी किट व १ रेडिएशन रिकव्हरी किट तयार केले असून अथर्व नेचर हेल्थकेअर प्रा. लि. या एफ.डी.ए. व जी. एम. पी. मान्यताप्राप्त फार्मसीने त्याचे उत्पदान केले आहे. केमोथेरॅपी व रेडिओथेरॅपीबरोबर व त्यानंतर काही काळ सदर आयुर्वेदिक औषधे रुग्णांनी नियमित घेतल्यास रुग्णांची रोगप्रतिकारशक्ती सुधारते, केमोथेरॅपी व रेडिओथेरॅपीच्या दुष्परिणामाची तीव्रता कमी









होते व आयुष्याची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते.

ट्रीपल निगेटिव्ह ब्रेस्ट कॅन्सर (TNBC), ब्रॅका १-२ जनुकीय बदलांमुळे उद्भवणारे ब्रेस्ट कॅन्सर, मस्तिष्काचा कॅन्सर (Malignant Brain Tumor), नॉन हॉजकिंग्ज व हॉजकिंग्ज लिंफोमा, प्रोस्टेट कॅन्सर, स्त्रीबीजांडाचा कॅन्सर, यकृताचा कॅन्सर यासारख्या घातक कॅन्सरमध्येही आधुनिक वैद्यक चिकित्सेसोबत आयुर्वेदिक चिकित्सा घेतल्यास जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास व आयुर्मान वाढण्यास मदत होते असे शास्त्रीय निकषांवर सिध्द झाले आहे.

आयुर्वेदीय चिकित्सेमध्ये दोष-धातू - मलांमध्ये साम्यता आणणारी आयुर्वेदिक औषधे, शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढविणारी च्यवनप्राशासारखी रसायन औषधे, शरीरशुध्दी करणारी पंचकर्म चिकित्सा, शरीराचे सुयोग पोषण करणारी आहार चिकित्सा, शरीराच्या चयापचयाचा समतोल राखणारी चांगली जीवनशैली व मनोबल व मानसिक स्वास्थ्य सुदृढ ठेवणारी मानस चिकित्सा अशा सर्वंकष चिकित्सापध्दतीचा समावेश होतो.

पंचकर्म म्हणजे शोधन चिकित्सा म्हणजे शरीरातील दूषित दोषांना विविध मार्गांनी शरीराबाहेर काढून शरीराची शुध्दी करणारी व पर्यायाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढविणारी चिकित्सा होय. यात वमन उलटीवाटे शरीरातील दूषित दोषांचे निस्सरण करणे, विरेचन - रेचक औषधी देऊन मलप्रवृत्तीव्दारे शरीरातील दोषांना बाहेर काढणे, बस्ति - औषधी तेल / तूप अथवा काढ्याचे गुदमार्गाने बस्ति - एनिमा देणे, रक्तमोक्षण - सिरेव्दारे अथवा जलौकांव्दारे दूषित रक्ताचे निर्हरण करणे व नस्य - औषधी तेल / तूप नाकात घालणे अशी ५ प्रधान कर्मे होत. यापैकी ज्या कॅन्सरग्रस्त रुग्णास जे पंचकर्म योग्य आहे ते विशिष्ट ऋतूमध्ये / नियमित केल्यास शरीरशुध्दी होऊन कॅन्सरचा पुनरुद्भव व प्रतिबंध होण्याची शक्यता कमी होते. या सर्व पंचकर्मांसाठी रुग्णास ७ ते २१ दिवसांपर्यंत रुग्णालयात प्रविष्ट करणे आवश्यक असते. इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर मधील २००० पेक्षा अधिक कॅन्सरग्रस्त रुग्णांमधील यशस्वी पंचकर्म चिकित्सेचा आढावा घेऊन टाटा ट्रस्टच्या अनुदानाने सर्व सुविधांनी सुसज्ज असे ६० बेडचे पंचकर्म रुग्णालय कार्यान्वित आहे. यात पंचकर्म तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कॅन्सर रुग्णांस पंचकर्म चिकित्सा, शिरोधारा-लेप-नाभिबस्ति-कटिबस्ति-योनिधावन-योनिपिचू यांसारखे उपक्रम, पथ्यकर आहार, सुयोग्य जीवनशैलीचे मार्गदर्शन, योगचिकित्सा अशी सर्वकष चिकित्सा केली जाते. शस्त्रकर्म, केमोथेरॅपी, रेडिओथेरॅपी यासारखी आधुनिक चिकित्सा संपल्यानंतर बलवर्धनानंतर कॅन्सर रुग्णांनी प्रतिवर्षी पंचकर्म चिकित्सा केल्यास घातक प्रकारच्या कॅन्सररुग्णांमध्येही पुनरुद्भव टाळण्यास मदत होते असे आढळून आले आहे.

२००५ मध्ये लहान आतडे, गर्भाशय, यकृत व उदर पोकळीत पसरलेला मेटास्टॅटिक कार्सिनॉईड कार्सिनोमा झालेल्या आस्ट्रेलियातील स्टेला मॅडम आमच्या रुग्णालयात २००७ मध्ये पंचकर्म चिकित्सेसाठी प्रविष्ट झाल्या. तत्पूर्वी त्यांचा केवळ लहान आतड्यातील ट्यूमर लॅप्रोस्कोपीक सर्जरीने काढून टाकला होता व केमोथेरॅपी किंवा रेडिओथेरॅपी देणे संयुक्तिक नसल्याने त्याही चिकित्सा पध्दतींचा त्यांनी अवलंब केला नव्हता. ५० वर्षाच्या स्टेला मॅडम या दुर्धर आजाराशी सामना करीत असूनही शरीराने व मनाने चांगल्याच कणखर होत्या. त्यामुळे आम्ही त्यांना २१ दिवसांची पंचकर्मातील बस्ति चिकित्सा दिली. काहीही खाल्ल्यावर पोटात होणारे गॅसेस, उजव्या बाजूला पोटात जाणवणारा जडपणा, अपचन, मंदावलेली भूक व अनुत्साह या गेले दोन वर्षे सतावणाऱ्या तक्रारी बस्ति चिकित्सेने लक्षणीयरित्या कमी झाल्या. त्यामुळे आयुर्वेदावरील विश्वास दृढ झालेल्या स्टेला मॅडमनी ४ वेळा आमच्या रुग्णालयात येऊन बस्ति चिकित्सा घेतली. जोडीला नियमित आयुर्वेदिक औषधे, शाकाहार, व्यायाम व सकारात्मक दृष्टिकोन यांचे पालन यांच्या जोरावर १५ वर्ष त्या गुणवत्तापूर्ण आयुष्य जगल्या.

अशा प्रकारे आधुनिक वैद्यक व आयुर्वेदिक चिकित्सा अशी समन्वयात्मक चिकित्सा हे कॅन्सर रुग्णांसाठी वरदान ठरत आहे.


हे पत्र वैदेही ठकार यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११४७. लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहिल्यानगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर* (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 56975/92
© द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.